ख्यापाड्यांतील **टोरी** गृहस्थ लोकांपैकीं पुष्कळांना **स्टयूअर्ट**वंशीय राजे माघारे यावयास पाहिजे होते त्यामुळें, सर्व देश फार अस्वस्थ-चित्त झालेला होता, हें तो **वाल्पोल** जाणून होता.

आतां, **वाल्पोल** हा जातीनें खेड्यापाड्यांतला गृहस्थ होता म्हणून, **हानोव्हर**च्या घराण्याला अनुकूल असलेलीं, **रस्सेल्स, काव्हेन्डिशिझ्** वगैरे उपनांवांचीं **व्हुइग्सां**चीं मोठमोठालीं कुलें त्याला आपल्याभोंवतीं जमवितां आलीं. **पार्लमेंटा**करितां प्रतिनिधि नेमण्यांत (निवडण्यांत नव्हे) ह्या कुलांच्या हातीं मोठी सत्ता होती; शिवाय **साल्झबरि** नजीकचीं **ओल्ड सारम** सारखीं शहरवजा गांवें मोडकळीस आलेलीं होतीं, तथापि तेथूनही, मतें देण्याला पुरते लोक राहिले नसतां, **पार्लमेंटा**ला सभासद निवडून पाठवीत, आणि मते देणारे म्हणून जे लोक राहिले असत, ते त्या प्रतिनिधींच्या जागा जो ज्यास्त पैसे देईल त्याला विकीत. ह्यामुळें **पार्लमेंटां**तील सभासदांपैकीं अर्ध्यांहून ज्यास्तीं सभासद वास्तविक पाहतां लोकांनीं निवडलेले नसून, **सरकारानें** नेमलेले असत, आणि **वाल्पोला**ला आवडे तसें फारकरून करणारें **हौस आफ् कामन्स** त्याला मिळालें होतें.

व्हुइग कुलें आणि पार्लमेंटाकरितां प्रतिनिधि नेमणारीं शहरें.

वाल्पोलानें देशाला स्वस्थपणा किंवा विश्रांति देण्याच्या कामीं त्या **पार्लमेंटा**चा उपयोग करून घेतला. **फ्रेंचां**शीं सख्यानें राहून, त्यानें **प्रिटेन्डरा**ला हालचाल करूं दिली नाहीं, आणि **डिस्सेन्टर्स** आणि **क्याथेलिक्स** ह्यांच्या विरुद्ध असलेले कायदे रद्द न करतां, त्यानें युक्तिप्रयुक्तीनें त्या कायद्यांचा अमल मात्र होऊं दिला नाहीं. १७२२ त एक लहानसा **जाकोबाइट्स**

वाल्पोल देशाला स्वस्थपणा देतो.

ह्यांचा संगनमत होऊन कट खरोखर झाला होता, आणि **राचेस्टर**चा **बिशप आट्टर्बरी** ह्याला त्या कटाला उत्तेजन दिल्याकारणानें देशपार केलें. **आयर्लंडांत** चलनाकरितां १०८००० पौंड किंमतीचीं फार्दिंग्स आणि हाफपेन्स (अर्ध्यापेनी) ही नाणीं पाडण्याचा **वाल्पोलानें वूड** नांवाचा एक **इंग्रज** लोखंडाचा कारखानदार होता त्याला मक्ता देऊन सनद दिली, त्या कारणानें **आयर्लंडांत** बखेडा उत्पन्न झाला. **आयर्लंडांतील पार्लमेंटानें**, त्या नव्या नाण्यांनीं आमचें नुकसान होईल, अशी त्या सनदेला हरकत आणली; आणि **स्वुइफ्ट** नांवाच्या ग्रंथकाराला **वाल्पोल** आवडत नव्हता, त्यानें त्या प्रकरणीं **आयरिश** लोकांना म्हणून लिहिलेलीं सात पत्रें छापून प्रसिद्ध केलीं, त्या पत्रांना **ड्रेपियर लेट्रर्स** (ड्रेपियर नांवच्या गृहस्थानें लिहिलेलीं पत्रें) असें नांव पडलें. त्या पत्रांनीं **आयरिश** लोकांचीं मनें अधिकच चेतलीं. **वाल्पोलानें** शाहणपण करून तो रागरंगपाहून, तीं हाफपेन्स नांवाचीं नाणीं चलनांतून काढून टाकलीं, त्यामुळें कांहीं अरिष्ट उद्भवलें नाहीं. ह्याप्रकारें **वाल्पोलानें** सर्वत्र स्वस्थता राखली, आणि स्थिर एकसूत्री राज्यपद्धति असली म्हणजे लोक तिच्याखालीं खुशाल राहून स्वस्थपणानें आपला कामधंदा करितात, तसल्या स्थिर एकसूत्री राज्यपद्धतीचें मोल ओळखण्याला त्यानें लोकांना शिकविलें.

वूडचीं हाफपेन्स नांवाचीं नाणीं, १७२३.

पहिला जार्ज, हानोव्हरांतील ऑस्नाब्रूक नांवाच्या गांवीं १७२७ त जूनच्या १० व्या तारिखेस आपल्या गाडींत बसून जात असतां, मार्गांत अंगभ्रंश करणाऱ्या वायूचा झटका येऊन त्यानें त्या गाडींतच वारला. तेव्हां त्याचा पुत्र कांहीं ब-

पहिल्या जार्जाचा मृत्यु, ता० १० जून १७२७.

खेडा उत्पन्न न होतां त्याच्यामागें गादीवर बसला; आणि त्या नव्या राजाला **वाल्पोल** आवडला नाहीं, तथापि तो अतिशय उपयोगी आहे असें त्याच्या प्रत्ययास आल्यामुळें त्याला त्यानें दूर केलें नाहीं. तेव्हां अर्थात् राजे पालटले म्हणून **इंग्लंडाला** पूर्व स्थितींत विपर्यास झाला असें बिलकूल वाटलें नाहीं.

दुसरा जार्ज, १७२७–१७६०.

दुसऱ्या जार्जाचे गुणदोष.

दुसरा जार्ज ह्याला **इंग्लिश** बोलतां येत होतें तरी, तो आपल्या बापासारखा पुरा **जर्मन** होता. तो हट्टी आणि रागीट असे, आणि तो वारंवार **हालंडासाठीं इंग्लंडचा** त्याग करण्याला देखील तयार होई. परंतु सुदैवानें, **आन्स्पाकची कारोलाइन** नांवाच्या त्याच्या बायकोचें त्याच्यावर भारी वजन असे, आणि ती शाहणी बायको असल्यामुळें **वाल्पोल** हा किती मोठ्या योग्यतेचा पुरुष आहे हें तिच्या ध्यानांत येऊन, १७३७ त ती वारली तोंपर्यंत, ती त्याचा कैवार घेत असे. नंतर **जार्जाच्या** कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास तो प्रतापी **पिट्ट** (ज्याला पुढें **लार्ड चाथम** हा किताब मिळाला) ह्यानें राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं, आणि एकंदरीनें **दुसऱ्या जार्जाची** कारकीर्द इतिहासांत मोठी महत्त्वाची झाली, हें पाहण्यांत येईल; ह्याचें कारण, त्याच्या इच्छेविरुद्ध, त्याला अगदीं आवडत नसलेल्या दोघां महासमर्थ प्रधानांच्या हातीं तो पडला.

पुढच्या दहावर्षांत सांगण्यासारख्या फारच थोड्या गोष्टी घडल्या. **वाल्पोल** हा मुख्यत्वेंकरून सरकारच्या खर्चांत काटकसर करून, **राष्ट्रीय कर्जाचा** कांहीं भाग फेडण्यांत गुंतलेला

होता, आणि त्याच वेळीं त्यानें इंग्लंडांत येणाऱ्या व इंग्लंडांतून बाहेर जाणाऱ्या पुष्कळ जिन्नसांवरील करही बंद केले. इंग्लंडच्या परमुलुखी वसविलेल्या राज्यशाखांना इतर देशांशीं व्यापार करण्याची मनाई केलेली होती तो मूर्खपणा आहे, ही गोष्ट लक्ष्यांत येणारा पहिला तोच पुरुष होता, आणि त्यानें जार्जिया आणि कारोलाइना ह्या दोन राज्यशाखांना यूरोपांतील वेगळाल्या भागांत तांदूळ विकावयास पाठविण्याला परवानगी दिली. त्यायोगें कारोलाइनांतील तांदूळ, इटलि आणि ईजिप्ट ह्या दोहों देशांतील तांदूळ फारच कनिष्ठ प्रतीचा होता त्याच्या जागीं, खपूं लागला, आणि सर्व देशांचा त्यापासून फायदा झाला.

वाल्पोलानें केलेला राज्यांतील महसुलाबद्दल बंदोबस्त.

शिवाय आमच्या बंदरीं जबर जकाती द्याव्या लागत त्या हलक्या करण्याविषयीं, आणि कांहीं जिन्नसांवर सायरबाब किंवा देशांतल्या देशांत जकाती किंवा कर बसवून वसूल करण्याविषयीं, त्यानें प्रयत्न केला. जर तो यत्न सिद्धीस गेला असता, तर जकात टाळून चोरूनछपून माल आणण्यानेण्याची वहिवाट होती ती बहुतेक बंद झाली असती, लंडन हें जकातींपासून मुक्त होऊन व्यापाराला खुलें असें बंदर झालें असतें, आणि इंग्लिशांचा व्यापार दुप्पट वाढला असता. परंतु लोकांची ह्या गोष्टींविषयीं समजूत पडली नाहीं, आणि सायरबाबी वसूल करणारे अधिकारी आपल्या दुकानीं येणें हें दुःसह आहे असें त्यांला वाटे, त्यामुळें त्या सायरबाबीच्या कायद्याचा मसुदा पार्लमेंटापुढें आणला त्याविरुद्ध इतकी मोठी चळवळ झाली कीं, वाल्पोलानें तो मसुदा माघारा घेतला. तथापि लोकप्रिय

सायरबाबीविषयीं कायद्याचा मसुदा नामंजूर होतो, १७३३.

झालेल्या प्रधानांकडून जी वारंवार चूक घडून त्यांचा नाश होतो, ती वाल्पोलाच्या हातून होईपर्यंत त्याचें वजन फार भारी राहिलेलें होतें. त्याला आपल्या हातीं सत्ता असावी ही गोष्ट फार आवडत होती, आणि तो दुसऱ्यांचा मत्सर करी म्हणून त्याच्या प्रधानमंडळापैकीं बहुतेक उत्तम उत्तम पुरुषांचा त्याचा हळू हळू वियोग झाला. ह्या गोष्टीचा परिणाम असा झाला कीं, त्याच्याविरुद्ध एक जबरदस्त "विरोधी पक्ष किंवा प्रतिपक्ष" उत्पन्न झाला. त्यांत **पुल्टेनी** (हा पुढें बाथचा अर्ल हा किताब पावला), **कार्टेरे,** आणि **चेस्टरफील्ड** ह्यांसारखें पोक्त पुरुष अग्रणी असून, त्यांतील तरुण लोकांमध्यें सर्वांत मोठा वक्ता आणि आस्थेवाईक असा पुरुष म्हटला म्हणजे, **वुइलियम पिट्ट** हा होता. तो तुरूकस्वारांच्या पलटणींतील एक **कार्नेट** (अमलदार) असून, **मद्रासच्या** एका माजी गव्हर्नराचा नातू होता. ह्या प्रतिपक्षांतील लोकांनीं आपणाला "**पेट्रियट्स**" (स्वदेशभक्त) असें नांव घेतलें होतें, आणि **वाल्पोलाच्या** राज्यकारभाराचें सर्वत्र स्वस्थता राखण्याचें धोरण, आणि **पार्लमेंटच्या** सभासदांना लांच रुषवत देऊन त्यांची संमति मिळवण्याची त्याची वहिवाट, ह्या दोन गोष्टींविषयीं त्याच्याविरुद्ध त्यांनीं मोठा हाकाटा केला. **फ्रेडरिक, प्रिन्स आफ वेल्स,** ह्यानें आपल्या मातापितरांशीं तंटा केलेला होता, त्याचें त्या प्रतिपक्षांतील लोकांना पाठबळ होतें, तथापि **वाल्पोल** विनोदपूर्वक त्यांचा तिरस्कार करी. जेव्हां ते स्वदेशभक्ति आणि आब्रू ह्यांविषयीं बोलत, तेव्हां त्यांना हांसून तो म्हणे, "ते अधिकाधिक शाहणे

वाल्पोलावरून त्याच्या मित्रांचें मन उठतें.

पेट्रियट पार्टि, म्हणजे स्वदेशभक्तांचा पक्ष, १७३७.

होत जातील तसतसे तीं बोलणीं ते सोडून देतील." स्पेनदेशाशीं १७३९ त तंटा उत्पन्न होऊन त्याच्या पडत्या काळाला आरंभ झाला तोंपर्यंत, तो टिकाव धरून राहिला होता.

वस्तुतः इंग्लंडावर एक गुप्त संकट येऊं पाहत होतें, कारण फ्रान्साला इंग्लंडचा व्यापार आणि वसविलेल्या राज्यशाखा ह्यांविषयीं पराकाष्ठेचा मत्सर वाटत होता. पंधराव्या लूईला आतां मुलें झालेलीं होतीं, त्यामुळें त्याचा मामा, स्पेनचा पांचवा फिलिप, ह्याची त्याला आतां बिलकूल भीति वाटत नव्हती. म्हणून त्या पंधराव्या लूईनें त्या पांचव्या फिलिपाशीं एक "फामिली काम्प्याक्ट," म्हणजे गृहसंकेत घरकरार किंवा घरतह, केला. त्यांत, स्पेनानें आपल्या दक्षिण अमेरिकेंतील मुलुखाशीं व्यापार इंग्लंडच्या हातीं होता तो त्याकडून हळू हळू काढून फ्रान्साला द्यावा, असा करार होता. फ्रान्सानें त्या गोष्टीच्या मोबदला जिब्राल्टर परत मिळविण्याच्या कामीं स्पेनाला साहाय्य करण्याचें वचन दिलें होतें. तो तह झाला त्या वेळीं कोणा दुसऱ्याला कळला नाहीं, परंतु पृथ्वींतील मुख्य वसाहती (राज्यशाखा) आणि मुख्य व्यापार इंग्लंड आणि फ्रान्स ह्या दोहोंतून कोणाच्या हातीं असावा ह्या गोष्टीच्या संबंधानें त्या दोहों देशांच्या दरम्यान फार काळपर्यंत चालणाऱ्या झगड्याची त्या तहापासून खरोखर सुरवात झाली.

फामिली काम्प्याक्ट नांवाचा तह, १७३३.

इंग्लंडाशीं कलागत करण्याला स्पेनाला कांहीं तरी निमित्त किंवा सबब पाहिजे होती, ती त्याला मिळणें फारसें कठीण नव्हतें. ही गोष्ट स्मरणांत असेलच कीं, यूट्रेक्टच्या तहाप्रमाणें (५४१ वें पृष्ठ पहा) दक्षिण समुद्रांतील मुलुखांशीं दरसाल

६०० टन्स ओझें वाहणाऱ्या एकाच **इंग्लिश** जहाजाला व्यापार करण्याविषयीं परवानगी होती. हें जहाज तो करार निक्षीनें पाळीत नव्हतें. दुसरीं लहान लहान जहाजें त्या जहाजाभोंवतीं घिरट्या घालीत जवळच असत, आणि रात्रीच्यावेळीं त्या मोठ्या जहाजाला आपल्यावरील माल पोहोंचवीत, तेणेंकरून जमिनीवर माल एका जहाजाच्या भरताडाहून ज्यास्त उतरला जाई. ह्याशिवाय **अमेरिकें**तील **स्पानिश** (स्पानियर्ड्सांच्या ताब्यांतील) बंदरांत **इंग्लंडां**तील माल चोरून छपवून जकाती टाळून जात असे, म्हणून समुद्रांत जहाजांचा झाडा घेण्याचा आपला हक्क **स्पानियर्ड्स** लोक बजावूं लागले. त्यामुळें वारंवार त्यांकडून जुलूमजबरदस्ती होऊं लागली, तो जुलुमाचा प्रकार **फ्रान्स**देशाशीं वर सांगितलेला वरकरार झाल्यापासून फारच वाढला, त्यामुळें **इंग्लिश** लोक फार संतापले. १७३८ त **जेन्किन्स** नांवाचा एका जहाजाचा कप्तान (मालीम) ह्यानें **पार्लमेंटा**पुढें येऊन फिर्याद केली कीं, १७३१ त **स्पानियर्ड्सां**नीं माझे कान कापले होते, आणि **इंग्लंड**ला आणि राजाला शिव्या दिल्या होत्या. ह्या गोष्टी खऱ्या होत्या किंवा नाहीं ह्याविषयीं फार संशय आहे, आणि **वाल्पोला**नें सल्ला किंवा समेट राखण्याविषयीं पराकाष्ठेचा यत्न केला. परंतु **स्वदेशभक्तां**नीं, देशांतील लोकांना चेतविण्याच्या कामीं त्या कप्तानाच्या फिर्यादीचा उपयोग केला, आणि त्यांनीं **वाल्पोलाला**, त्याच्या मताच्या विरुद्ध, **स्पेन** देशाशीं युद्ध करणार असा जाहीरनामा लावण्याला भाग पाडलें. लोक युद्धाविषयीं जाहिरात लागलेली पाहून आनंद पावले, तो पाहून तो **वाल्पोल** म्हणाला, " ते आतां आनंदानें आपल्या घंटा हव्या

जेन्किन्साचे कान कापल्यावरून उद्भवलेलें युद्ध, १७३९.

तितक्या वाजवोत, परंतु ते लवकरच आपले हात पिळवटूं किंवा चोळूं लागतील."

हें वाल्पोलाचें म्हणणें रास्त होतें. परंतु त्याला युद्ध आवडत नव्हतें तर त्यानें राजीनामा द्यावयाचा होता, आणि ज्यांना तें युद्ध पसंत वाटत होतें त्यांनाच तें चालवूं द्यावयाचें होतें. त्या युद्धाचा आरंभ चांगलासा झाला नाहीं, तेव्हां लोक म्हणूं लागले कीं, वाल्पोल त्या युद्धाला प्रतिकूल आहे म्हणून तसें झालें. शिवाय १७४० त त्याहून मोठें युद्ध उत्पन्न होऊन तें साऱ्या यूरोपभर पसरलें. त्या मोठ्या युद्धांत त्या स्पेनाशीं आरंभलेल्या युद्धाची मिसळ होऊन गेली. इतक्यांत १७४० च्या हिंवाळ्यांत पाणी थिजून बर्फ होऊन जाई इतका भयंकर थंडीचा कडाखा पडला, आणि त्याच्या पुढल्या उन्हाळ्यांत सुगी फार वाईट झाली, त्यामुळें इंग्लंड व आयर्लंड ह्या दोहोंवरही मोठी आपत्ति गुदरली. भाकरीचें मोल दुष्काळांतल्या मोलाइतकें झालें, आणि लोक तर सरकाराला दोष लावण्याला नेहमी तयार होतेच, त्यांनीं वाल्पोलाविरुद्ध मोठा हाकाटा केला. शेवटीं १७४२ त त्याला राजीनामा देणें भाग पडलें. वहिवाटीप्रमाणें त्याचे शत्रु त्यावर दोषारोप करून खटला करण्याची इच्छा करीत होते, परंतु, अझूनही त्याचे दोस्त पुष्कळच होते. त्याला ऑर्फर्डचा अर्ल हा किताब, आणि दरसाल ४००० पौंड पेन्शन (बैठें वेतन) देऊन, बडे लोकांच्या दर्जांत चढविलें. काम सोडल्यावर शिर गमावण्याच्या धोक्यांत पडण्याच्या बदली, किताब मिळालेला मुख्य प्रधान असा तोच पहिला होय. असो, ह्या गोष्टीवरून हौस आफ कामन्स ही सभा आतां राज्यावर आपला अमल कसा करूं

वाल्पोलचा, अपकर्ष, माहे जान्युअरी १७४२.

लागली होती, हें कळून येतें. पूर्वीच्या काळांत कोणीही प्रधान लोकांना अप्रिय झाला तर त्याच्या पासून मुक्त होण्याला, त्यावर दोषारोप करून खटला करण्याशिवाय, दुसरा उपाय नव्हता. परंतु आतां वास्तविक सत्ता **कामन्सां**च्या हातीं आलेली होती म्हणून, कोणाही प्रधानाला कामावरून दूर करून, त्याच वेळीं त्याच्या मागल्या नौकरीबद्दल त्याची प्रतिष्ठा किंवा सन्मान करून, त्यांना त्याला **लार्डसां**च्या सभेंत पाठवून देतां येऊं लागलें.

वालपोलाचा अपकर्ष झाल्याबरोबर, **फ्रान्सा**शीं सलयानें राहावयाचें हें जें राजकारणाचें धोरण सतत पंचवीस वर्षें चालू होतें, त्याचाही लय झाला. आतां जें नवीन प्रधानमंडळ झालें, तें (**दुसऱ्या जार्जा**ला फार दिवसांपासून पाहिजे होतें त्याप्रमाणें) **हानोव्हर**चें रक्षण करण्यासाठीं **यूरोपां**त चाललेल्या युद्धांत सामील होण्याला राजी होतें. हें युद्ध ज्या कारणानें उत्पन्न झालें होतें तें येणेंप्रमाणें. **आस्ट्रियाचा बादशाहा, सहावा चार्लस,** ह्याला पुत्रसंतान नव्हतें, त्यामुळें **यूरोपां**तील सर्व मोठमोठ्या राजांना समजूत करून, **"प्रागमाटिक सांकशन"** (राज्यप्रकरणीं महत्त्वाच्या गोष्टींविषयीं राजाचें शासन, ठराव, किंवा निर्णय) ह्या नांवाच्या तहनाम्यावर सह्या करण्यास त्यानें प्रवृत्त केलें होतें. त्या तहांत, त्या बादशाहाचें सर्व राज्य त्याच्या पश्चात् त्याची कन्या **मेरिया थेरेसा** हिला मिळावें ह्या गोष्टीला आम्ही हरकत करणार नाहीं, अशीं सह्या करणाऱ्या राजांनीं वचनें दिलीं होतीं. परंतु तो **बादशाहा** १७४० त वारला तेव्हां, ज्यांनीं त्या तहनाम्यावर सह्या केल्या होत्या त्यांपैकीं **इंग्लंड** आणि **हालंड** ह्या

आस्ट्रियाच्या गादीवर कोणी बसावें ह्या संबंधानें होणारें युद्ध, १७४०–१७४८.

दोहों देशांच्या राजांखेरीज इतर कोणीही आपलें वचन पाळण्याला राजी नव्हता. **प्रुशियाचा दुसरा फ्रेडरिक** ह्यानें **सैलिशिया** हा प्रांत बळकावला, **बव्हेरियाचा इलेक्टर** ह्यानें **आस्ट्रियावर** दावा मांडला, आणि **फ्रान्स** आणि **स्पेन** ह्या देशांच्या राजांनीं त्या **इलेक्टरचा** पक्ष धरला. **आस्ट्रियाची आर्चडचेस** आणि **हंगरीची राणी, मेरिया थेरेसा,** ही आपल्या हक्कांकरितां फार शौर्यानें लढली, आणि "**आस्ट्रियाच्या** गादीवरील वारशाच्या संबंधानें उत्पन्न झालेलें तें युद्ध" जवळ जवळ नऊ वर्षें चाललें. वस्तुतः "**बालन्स आफ् पाउअर,**" म्हणजे सत्तेचें समतौल्य, ह्याकरितां जो निरंतरचा झगडा, त्याचा तें युद्ध हा एक अंश होता. त्या झगड्यामुळें **यूरोप** खंडांतील राष्ट्रांपैकीं प्रत्येक राष्ट्र, दुसरें कोणतेंही राष्ट्र सर्वांपेक्षां अति बलाढ्य होईल कीं काय, अशी भीति बाळगून असतें.

इंग्लंड त्या **प्राग्माटिक सांकशन** नांवाच्या तहनाम्यावर सही करणाऱ्या राष्ट्रांपैकीं एक असल्यामुळें, त्याला त्या संबंधानें उत्पन्न झालेल्या युद्धांत सामील होण्याला योग्य सबब किंवा निमित्त होतें, आणि **दुसऱ्या जार्जानें** आतां स्वतः लढावयास जाऊन १७४३ च्या जून महिन्यांत, **मेन** नदीच्या कांठीं **डेटिंगेन** एथील लढाईत **फ्रेंचांचा** पराभव केला. परंतु ह्या लढाईपासून, जें अरिष्ट **वाल्पोल** टाळण्याविषयीं यत्न करीत होता, तें अरिष्ट **इंग्लंडावर** आलें. **फ्रेंच** लोकांनीं, **प्रिटेन्डरचा** पुत्र, **चार्लस एड्वर्ड,** ह्याच्या हुकमतीखालीं १५००० फौज समुद्रावरून जाऊन **इंग्लंडांत** उतरण्याकरितां रवाना करून, एकदम उसनें फेडलें. ती फौज **इंग्लंडांत** कधींही पावली

डेटिंगेन एथील लढाई, १७४३; फॉन्टेनॉय एथील लढाई, १७४५.

नाहीं, कारण ज्या जहाजांच्या समुदायावरून ती फौज रवाना केली होती, त्या समुदायाची वादळानें वाताहत केली; परंतु पुढील सालीं जेव्हां **मार्शल साक्स** नांवाच्या विख्यात सेनापतीच्या हाताखालीं **फ्रेंचांनीं फॉन्टेनॉय** एथें **इंग्लिशांचा** पराभव केला, तेव्हां त्या **प्रिन्स चार्लस एड्वर्डानें** आपल्या बापाकरितां **इंग्लंडची** गादी परत मिळविण्यासाठीं दुसऱ्यानें प्रयत्न केला, आणि तो समुद्रावरून येऊन १७४५ च्या जूलईत **हाइलंड्स**मध्यें जमिनीवर उतरला.

बॉन्नी (सुंदर) प्रिन्स चार्ली, १७४५.

त्यासमयीं **वाल्पोलानें** केलेल्या साऱ्या कामगिरीचा जणू नाश होणार असा पहिल्यानें रंग दिसूं लागला. **चार्लस एड्वर्ड** हा रूपानें सुंदर, साहसी, तरुण पुरुष होता, आणि **हाइलंडर्स** लोक त्याच्या भोंवतीं एकदम जमले. आगस्टची २९ वी तारीख येई तों त्याच्या हाताखालीं मोठी फौज जमली. पुढें एका पंधरवड्यांत तो **एडिंबरो** शहरांत शिरला, आणि त्यानें आपला बाप राजा झाला असा डांगोरा पिटला, आणि सेप्टेंबरच्या २१ व्या तारिखेस त्याचे ते रानवट **हाइलंडर्स** ह्यांनीं, **सर जान कोप** ह्याच्या हाताखालच्या **इंग्लिश** फोजेची **एडिंबरो**पासून सुमारें नऊ मैलांवर **प्रेस्टन्पान्स** नांवाच्या ठिकाणीं कत्तल करून तुकडेतुकडे केले. **"बॉन्नी (सुंदर) प्रिन्स चार्ली"** (प्रिन्स चार्लस) हा आतां **स्कॉट्लंडचा** बहुतकरून धनी झाला, आणि पुढें सहा आठवड्यांनीं ६००० फौज बरोबर घेऊन तो **इंग्लंडांत** आपल्या दैवाची परीक्षा पाहण्याकरितां निघाला.

असें असतां, **इंग्लंडांत** लवकरच त्याची भ्रांति फिटून डोळे उघडले. **इंग्लिशांनीं जार्ज** नांवाच्या दोघांही राजांच्या अमला-

खालीं शांति, आणि स्वस्थता, भोगिली होती, आणि त्यांना पुनः झगड्याची सुरवात नको होती. तो तरुण राजपुत्र आणि त्याचे ते हाइलंडर्स लोक, ह्यांना पाहण्याला इंग्लिशांची दाटी जमली.

इंग्लिश लोक बंड करून उठले नाहींत.

परंतु ते त्याला मिळाले नाहींत, आणि तो डर्बी एथें पोहोंचला, तेव्हां इंग्लिशांच्या फौजा फार बलाढ्य असल्यामुळें त्यांच्यापुढें त्याचा टिकाव लागणार नाहीं असें पाहून, त्याच्या मसलतदार लोकांनीं त्याला बोध करून ग्लास्गो एथें माघारें जाण्याविषयीं त्याचें मन वळविलें. त्यानें १७४६ च्या जान्युअरींत, फाल्कर्क एथें एक जय मिळविला, परंतु पुढें थोड्या महिन्यांनीं, म्हणजे एप्रिलांत, त्याच्या हाइलंडर्सांच्या फौजेचा इन्व्हर्नेस्सच्या हद्दीवर कल्लोडन एथें कंबर्लंडच्या ड्यूकानें पुरा पराभव केला. पुढील पांच महिन्यांमध्यें तो प्रिन्स (राजपुत्र) चार्ली साऱ्या हाइलंड्स प्रदेशांत भटकत होता. तेथें त्याच्या दोस्तांनीं, आणि मुख्यत्वेंकरून फ्लोरा माक्डॉनल्ड नांवाची बाई त्याच्या पक्षाला राहिलेली होती तिनें, त्याला इमानीपणानें छपवून ठेवून त्याचा जीव वांचविला. शेवटीं सेप्टेंबर महिन्यांत तो निसटून फ्रान्स देशीं माघारा पळून गेला.

फाल्कर्क आणि कल्लोडन एथील लढाया, १७४६.

हें जाकोबाइट्स लोकांनीं केलेलें शेवटचें बंड होय. त्यानंतर स्टयुअर्ट–वंशीयांनीं गादी परत मिळविण्याविषयीं पुनः कधींही यत्न केला नाहीं. वृद्ध प्रिटेन्डर हा १७६६ त मृत्यु पावला, आणि प्रिन्स चार्ली हा १७८८ त रोम एथें मरण पावला. तेथें त्याचा एकुलता एक भाऊ कार्डिनल (रोमन क्याथलिकपंथांतील एक धर्माधिकारीविशेष) होऊन राहिलेला होता. कंबर्लंडच्या

ड्यूकानें **कलोडन** एथील लढाईनंतर त्या **हाइलंडर्स** लोकांना फारच क्रूरपणानें वागविलें, आणि तिघां **स्काच लार्डां**चा शिरच्छेद केला. शिवाय, **हाइलंड्स**मधील नायकवडे किंवा सरदार ह्यांची आपआपल्या पोटरयतेच्या जमातीवरील सत्ता काढून घेण्यासाठीं, आणि प्राचीन जाहगीरदारीचे रिवाज मोडून टाकून त्या रयत लोकांना प्रत्यक्षतया राजाच्या ताब्यांत आणण्यासाठीं, कायदे केले. **हाइलंडर्स** लोकांना शस्त्रें बाळगण्याची किंवा त्यांचा विशेष प्रकारचा पोशाक करण्याची मनाई केली. त्यामुळें, पुढें बारा वर्षांनीं युद्धांत लढण्यासाठीं **हाइलंडर्स** लोकांच्या पलटणी बनवाव्या ही हितकर कल्पना **जान डंकन** नांवाच्या एका **स्काच** गृहस्थानें सुचविली ती **पिट्** नांवाच्या प्रधानानें स्वीकारून अमलांत आणली तोंपर्यंत, ते **हाइलंडर्स** लोक फार दुःखी होऊन तडफड करीत राहिले होते. ह्या प्रकारें **हाइलंडर्स** लोकांच्या पलटणी बनविल्यापासून, त्या **हाइलंडर्सां**हून शूर आणि इमानी अशी रयत आजवर दुसरी कोणचीही झाली नाहीं.

हाइलंडर्स लोकांचीं शस्त्रें काढून घेतलीं, १७४६.

ह्या सर्व सालांमध्यें लढाया आणि बंडें ह्यांपासून देशाला पीडा होत होती, परंतु धर्म अथवा धर्माधिकारी ह्यांविषयीं यत्किंचितही वार्ता ऐकूं येत नाहीं. **वाल्पोला**ची मुख्यत्वें काळजी सर्व गोष्टी निवांत राखण्याविषयीं होती. वरिष्ठ वर्गांतील लोक धर्माविषयीं किंवा नीतीविषयीं फारच थोडी परवा करणारे झाले होते; आणि खेड्यापाड्यांतील व्हिकार, म्हणजे वृत्तीच्या उपभोक्त्या धर्माधिकाऱ्यांनीं लावलेले वेतनी गुमास्ते धर्माधिकारी, ह्यांपैकीं पुष्कळ **जाकोबाइट्स** होते, त्यांना लोकांना धर्मोपदेश करण्याची कळकळ होती तीहून राजकारस्थानाविषयीं कळकळ फार होती. लोकांची संख्या

वाढत जाऊं लागली तसतसे ते दुष्टपणा व दुर्व्यसनें ह्यांत बुडूं लागले. लोकांच्या ह्या दुःखकारक स्थितीनें प्रवृत्त होऊन, **जार्ज व्हाइट्फील्ड** आणि **जान वेस्ली** ह्या नांवांचे दोघे धर्माधिकारी होते त्यांना कळकळ वाटून ते देवळांतूनच केवळ नव्हे, परंतु उघड्या हवेंत देखील, जे कोणी श्रवणास येतील त्या सर्वांना उपदेश करूं लागले. **ब्रिस्टल** एथील दगडी कोळशांच्या खाणींत काम करणारे अडदांड मजूर, शहरांतील दुःखीकष्टी गरीबलोक, दूरदूरच्या खेड्यांतील गांवढळ लोक, हे, शेतांतून आणि उघड्या जागांतून, जे धर्मपरायण पुरुष त्यांना सुमार्गाला लावण्याकरितां फार उत्सुक आणि आस्थेवाईक होते, त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं एकत्र जमत.

व्हाइट्फील्ड आणि वेस्ली ह्यांचे धर्मोपदेश, १७३९.

तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दीतील **फ्रायर** (जोगी) लोक व **आठव्या हेन्रीच्या** कारकीर्दीतील धर्मसुधारक ह्यांसारखे, **व्हाइट्फील्ड** आणि **वेस्ली** ह्या दोघांनीं धर्माधिकारीमंडल ज्या कामाची हेळसांड करीत होतें तें काम केलें. त्यांच्या धर्मशिक्षणापासून **"मेथडिस्ट्स"** (कर्मठ खिस्ती) आणि **"वेस्लीयन्स"** (वेस्लीचे अनुयायी) असे दोन नवीन पंथ उत्पन्न झाले. त्या दोहों पंथांत मिळून **डिस्सेन्टर्स**, म्हणजे सरकारानें स्थापलेल्या धर्माला अमान्य लोक, ह्यांचा मोठा आणि आस्थेवाईक समुदाय असून ते दोन्ही पंथ **इंग्लंड** आणि **अमेरिका** ह्या दोन्ही देशांत अद्यापि आहेत. परंतु त्या पंथांचे स्थापक हे सरकारानें स्थापलेल्या धर्मांतील अधिकारी होते, आणि त्यांनीं जें काम केलें त्याचा उत्तमांश म्हटला म्हणजे हा होता कीं, त्यांनीं इंग्लंडच्या सर्व धर्माधिकारी मंडलाला जागृत केलें, त्यामुळें, आमचे **इंग्लिश** धर्माधिकारी हे दाट वस्तीच्या शहरांतील व नि-

वांत खेड्यांतील लोकांमध्यें, एकनिष्ठ कळकळीचे धर्मशिक्षक, आणि धर्माची कामगिरी बजावणारे, झाले आहेत.

पुढील आठ वर्षें, राजकारस्थानें निवांत राहिलीं होतीं. **हेन्री पेल्हम** नांवाचा समर्थ पुरुष हा मुख्य प्रधान होता, आणि त्यानें खंबिरीनें आणि चांगल्या प्रकारें अमल केला. १७४८ त

ए-ला-शापेल्ल एथील तह, १७४८.

यूरोपांत चाललेलें युद्ध **ए-ला-शापेल्ल** एथें सख्य होऊन झालेल्या तहनाम्यानें संपलें. त्या युद्धासंबंधानें **इंग्लंडाला** अमर्याद खर्च लागला; आणि **स्पानियर्ड्सांना** लुटण्याकरितां **काम्मोडोर** (अरमाराच्या तुकडीचा अधिकारी) **आन्सन** ह्याला पाठविलें होतें, त्यानें पृथ्वीप्रदक्षिणा करून दहा लक्ष **डालरांच्या** (डालर हें एक नाणें आहे) किंमतीचें सोनें, रुपें, हिरे वगैरे धन माघारी आणलें, त्याशिवाय त्या युद्धापासून **इंग्लंडाला** प्रतिफल म्हणून कांहीं मिळालें नाहीं. तथापि त्या युद्धानें **स्त्यूअर्ट**वंशीयांच्या फंदफितुरांची समाप्ति झाली, आणि समुद्रावर **ग्रेट ब्रिटनाचें** प्राबल्य फार वाढलें.

१७५१ त **फ्रेडरिक, प्रिन्स आफ् वेल्स,** वारला, आणि त्याचा तरुण पुत्र **जार्ज** हा गादीचा वारस झाला. त्याच १७५१ व्या सालीं, वर्षाचे दिवस किंवा तारिखा मोजणें मांडणें किंवा लिहिणें ह्याची **न्यू स्टाइल** म्हणजे नवीन पद्धति स्वीकारण्याविषयीं एक **आक्ट** (कायदा) पसार झाला.

इंग्लिश पंचांगाची सुधारणा, १७५१.

जुन्या पद्धतीनें प्रत्येक चार शतकांच्या अखेरीस वर्षाचे दिवस तिहींनीं वाढून वर्ष लांबट होई, म्हणून ती जुनी पद्धति निर्दोष करण्यासाठीं **तेरावा ग्रेगरी** ह्या नांवाच्या **पोपानें** १५८२ त ही नवीन पद्धति **रोमन**

क्याथलिक देशांत चालू केलेली होती. ह्या नव्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक शतकाच्या अखेरीस, ह्या वाढीच्या तीन दिवसांपैकीं एक दिवस (लीप-ईयर, म्हणजे ज्या वर्षांत एक दिवस फेब्रुअरी महिन्यांत वाढतो तें वर्ष, तसलें एक लीप–ईयर सोडून देऊन म्हणजे त्यांतील एक वाढीचा दिवस न मानतां इतर सालांप्रमाणें तें साल मानून) कमी करितात, आणि प्रत्येक चौथ्या शतकाच्या अखेरीस दिवस बाद करण्याची जरूर राहत नाहीं म्हणून तें शतक तसेंच राहूं देतात. इंग्लंडानें ही पद्धति १५८२ त स्वीकारली नाहीं, म्हणून १७५१ त तें फ्रान्स आणि जर्मनी ह्या देशांच्या अकरा दिवसांनीं मागें पडलें होतें; म्हणजे इंग्लंडची सेप्टेंबरची ३ री तारीख ही, जर्मनी आणि फ्रान्स ह्या देशांची सेप्टेंबरची १४ वी तारीख झालेली होती. म्हणून वर सांगितलेल्या कायद्यानें, १७५२ त ते कमी पडलेले अकरा दिवस गाळून किंवा सोडून देऊन ती नवी पद्धति स्वीकारावी असा ठराव झाला. लोकांना हें समजणें कठीण पडलें, आणि जेव्हां त्यांना त्यापुढें १७५२ च्या सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारिखेला सेप्टेंबरची १४ वी तारीख म्हटली पाहिजे असा हुकूम केला, तेव्हां आपले अकरा दिवस वास्तविक गमावणार अशी कल्पना करून लोकांचे खरोखर कांहीं दंगे झाले. पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणें नवीन सालाचा आरंभ मार्चच्या २५ व्या तारिखेस होत असे, त्याच्याबदली त्याच १७५२ व्या सालीं त्या सालचा आरंभ जान्युअरीच्या १ ल्या तारिखेपासून व्हावा असें ठरविलें. ह्याच्या पुढलें साल, म्हणजे १७५३ हें, लार्ड हार्डवुइक ह्यानें लग्नप्रकरणी एक आक्ट (कायदा) त्या सालांत पसार करविला त्या कारणानें, स्मरणांत ठेवण्यास योग्य

हार्डवुइक ह्याचा लग्नप्रकरणी आक्ट, १७५३.


आहे. **फ्लीट प्रिझन** नांवाच्या एका दिवाणी तुरुंगाजवळ, त्या तुरुंगांत कर्जाबद्दल कैदेंत टाकलेले बेआब्रूचे धर्माधिकारी किंवा पाद्री, त्यांच्याकडे जीं कोणी स्त्रीपुरुषांचीं जोडपीं येऊन त्यांना पुष्कळ पैसा देत, त्यांचीं, कांहीं प्रश्न न विचारतां किंवा त्यांच्याविषयीं कांहीं चौकशी न करतां, संस्कारपूर्वक लग्नें लावून देत, तीं लाजिरवाणी लग्नें त्या कायद्यानें बंद केलीं.

परंतु, जरी १७४८ पासून १७५६ पर्यंतच्या ह्या आठ वर्षांत घरीं (इंग्लंडांत) स्वस्थता होती, तरी एकमेकापासून फार दूर असलेल्या पृथ्वीच्या दोहों भागांत **इंग्लंडचा फ्रान्साशीं** झगडा चाललेला होता. हें स्मरणांत असेलच कीं, **एलिझाबेथ राणीनें**

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी.

इंग्लिश व्यापाऱ्यांच्या एका कंपनीला, **ईस्ट इंडिझ** नांवाच्या देशांत १५९९ त व्यापार करण्याला परवानगी देऊन एक सनद दिली (३४७ वें पृष्ठ पहा); आणि आतां त्या सालापासून सुमारें १५० वर्षें लोटलेलीं होतीं, तितकीं वर्षें ती **ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्ताना**च्या किनाऱ्यांच्या वेगवेगळ्या भागांत फाक्टरिझ, म्हणजे अडत्यांच्या कोठ्या, आणि व्यापाराचीं ठाणीं स्थापीत होती. १६१३ त त्या **कंपनी**च्या गुमास्त्यांनीं **हिंदुस्ता**-**नाच्या** पश्चिम किनाऱ्यावर **सुरत** एथें एक अडत्याची कोठी बांधली, आणि १६४० त पूर्व किनाऱ्यावर **फोर्ट** (किल्ला) **सेन्ट जार्ज** ह्या नांवाची दुसरी एक कोठी बांधली. त्या किल्ल्याभोंवतीं **मद्रास** नांवाचें शहर वसून वाढलें (नकाशा नंबर ६ हा पहा). १६६२ त **सुरते**नजीकचें **मुंबई** नांवाचें बेट **दुसऱ्या चार्लसाच्या राणीचें** आंदण म्हणून **पोर्टुगलनें इंग्लंडाला** दिलें; आणि १६९८ त **तिसऱ्या वुइलियमाच्या** कार-

नकाशा नं ६



अफगाणिस्तान
तिबेट
नेपाळ
भूतान
अयोध्या
अलाहाबाद
पाटणा
बनारस
नर्मदा नदी
नागपूर
कटक
जगन्नाथ
सुरत
मुंबई
पुणे
सातारा
बेदर
हैदराबाद
विजापूर
गोदावरी
श्रीकाकालम
विशागपट्टण
मच्छलीपट्टण
म्हैसूर
पांडिचेरी
कालीकोट
कन्याकुमारी
क्लाइव्हच्यावेळचे
हिंदुस्तान

कीर्दीत, दुसऱ्या एका **इंग्लिश कंपनीनें हुगळी** नांवाच्या नदीच्या कांठीं **फोर्ट वुइलियम** नांवाचा किल्ला बांधला, त्या किल्ल्याभोंवतीं **कलकत्ता** नांवाचें शहर वसलें. शेवटीं त्या दोन्ही कंपन्यांची मिळून १७०२ त एक कंपनी झाली. वर सांगितलेल्या तिन्ही ठाण्यांपैकीं प्रत्येकांत एक एक गव्हर्नर (सुभेदार) आणि त्यांतील अडत्यांच्या कोठ्यांच्या संरक्षणासाठीं मुख्यत्वेंकरून तद्देशीय शिपायांची एक एक लहान फौज ठेवली, आणि ते व्यापारी त्यांच्या ताब्यांत असलेल्या जमिनीबद्दल, त्या त्या परगण्याचा **नवाब** किंवा तद्देशीय राजा ह्याला, दरसाल धारा किंवा भाडें देत. ह्या **नवाबांच्या** डोकीवर **निजाम** किंवा प्रांताप्रांताचे गव्हर्नर (सुभेदार) असत, आणि ते सर्व **नवाब** आणि **निजाम** ह्यांवर वरिष्ठ **हिंदुस्तानाचा ग्रेट मोगल** (मोठा मोगल बादशाहा) होता.

फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी.

आतां **फ्रेंचांचीही** एक **ईस्ट इंडिया कंपनी** होती, तिनें **मद्रासेच्या** दक्षिणेस सुमारें शंभर मैलांवर **पॉंडिचेरी** एथें एक किल्ला बांधला होता, आणि त्या **पॉंडिचेरीच्या** दक्षिणेस **इंग्लिशांचें फोर्ट** (किल्ला) **सेन्ट डेव्हिड** नांवाचें एक ठाणें होतें. **इंग्लिश** ठाणेदार आणि **फ्रेंच** ठाणेदार परस्परांचा फार मत्सर करीत, आणि १७४६ आणि १७४८ ह्या दोहों सालांच्या दरम्यान, जेव्हां त्या दोन्हीं राष्ट्रांचें स्वदेशीं युद्ध चाललेलें होतें, तेव्हां त्या ठाणेदारांच्या दरम्यान **हिंदुस्तानांत** प्रखर युद्ध मातलें, आणि **फ्रेंचांनीं मद्रास** घेतली, परंतु **ए-ला-शापेल्ल** एथील तहानंतर त्यांनीं ती माघारी दिली.

१७४८ सालीं हिंदुस्तानचा मोगल बादशाहा आणि द-

क्षिणेचा **निजाम** हे दोघेही वारले, आणि सारे **नवाब** आपआपसांत कलह करूं लागले. त्यासमयीं **पॉंडिचेरीचा** गव्हर्नर **डूप्ले** नांवाचा होता, तो महत्त्वाकांक्षी होता. हे कलह चेतविले असतां आपण **दक्षिण हिंदुस्तानाचे** धनी होऊं अशी त्याला उमेद होती. त्यानें, आपण निवडलेल्या पुरुषांला **दक्षिणेचा निजाम**, आणि **मद्रासे**जवळील **अर्कोटचा नवाब** करून, कांहीं काळपर्यंत सर्व **दक्षिण हिंदुस्तान** खरोखर आपल्या मुठींत आणलें होतें.

डूप्ले हा सर्व दक्षिण हिंदुस्तानावर अमल करण्याविषयीं यत्न करतो, १७४९.

त्यावेळीं **इंग्लिश** व्यापाऱ्यांना **मद्रासें**तून हाकवून देतात कीं काय असा रंग दिसूं लागला, कारण त्यांचा दोस्त **नवाब महंमद अली** ह्याला **फ्रेंचांनीं त्रिचिनापल्लीं**त कोंडून वेढा घातला होता. ह्या संकटांतून **इंग्लिशांना** कंपनीच्या **राबर्ट क्लाइव्ह** नांवाच्या एका तरुण कारकुनानें सोडविलें, आणि त्यानें **हिंदुस्तानांतील इंग्लिशांच्या बादशाही** राज्याचा पाया घातला. तो **क्लाइव्ह** अति उनाड असल्यामुळें त्याला घरीं ठेवून दावांत राखतां येणार नाहीं म्हणून त्याच्या आईबापांनीं त्याला १७४४ त **हिंदुस्तानांत** पाठवून दिलें होतें. त्या **क्लाइव्हनें** ह्यापूर्वीच १७४६ त **फ्रेंचांशीं** लढाई मारलेली होती, आणि त्यानें आतां **महंमद अलीला** वेढ्यांतून सोडविण्याचा साहसाचा बेत केला. १७५१ च्या आगस्ट महिन्यांत फक्त २०० इंग्लिश सोजीर आणि ३०० शिपाई ह्यांची एवढी लहानशी टोळी बरोबर घेऊन, तो **अर्कोटवर** चाल करून गेला, तेथील रखवालीस असलेल्या शिपायांच्या तुकडीवर त्यानें एकाएकीं छापा घातला,

क्लाइव्ह इंग्लिशांचें तें व्यापाराचें ठाणें वांचवितो, १७५१.

आणि तें शहर हस्तगत करून, **महंमद अलीचे** दोस्त **मराठे** लोक येऊन त्याला मिळून त्यांनीं शत्रूंना पळवून लावलें तोंपावेतों, पन्नास दिवसपर्यंत, त्यानें तें **अर्काट** शहर राखून धरलें. **त्रिचिनापल्लीचा** वेढा उठून तें शहर शत्रूंपासून मुक्त झालें. पुढें लवकरच **क्लाइव्हचा** वरिष्ठ अधिकारी **मेजर लारेन्स** नांवाचा होता तो **इंग्लंडाहून** परत आला, आणि **इंग्लिशांचे** जयामागून जय होऊन **फ्रेंचांना** तो झगडा किंवा युद्ध सोडून देणें भाग आलें. **डुप्लेचे** सर्व प्रयत्न व्यर्थ जाऊन त्याच्या हातून आपली गमावलेली सत्ता पुन: मिळवणें झालें नाहीं. त्याला **फ्रान्स** देशीं माघारें बोलावून नेलें. १७५४ त एक तहनामा होऊन त्यावर सह्या झाल्या, आणि पुढें कांहीं काळपर्यंत **हिंदुस्तानांत** स्वस्थता होती.

हिंदुस्तानांत सल्ला होतो, १७५४.

ह्याप्रकारें **फ्रेंच** आणि **इंग्लिश** ह्यांच्या दरम्यानचा झगडा फक्त एका **हिंदुस्तानांतला** बंद झाला, परंतु तो दुसऱ्या एका देशांत उद्भवला. ज्या १७५४ व्या सालांत **हिंदुस्तानांत** तहनामा होऊन त्यावर सह्या झाल्या, त्याच सालांत **अमेरिकेंत** युद्ध सुरू झालें. आतां **इंग्लिशांच्या उत्तर अमेरिकेंत** तेरा आबादान बसविलेल्या राज्यशाखा होत्या. त्या प्रत्येकींत तिचे तिचे वेगळाले कायदे आणि उद्योगधंदे होते. ह्या वसाहती साऱ्या पूर्वकिनाऱ्यावर होत्या. त्यांच्या उत्तरेस **फ्रेंच** लोक होते. त्यांनीं **दक्षिण कानडा** नांवाच्या प्रदेशांत वसाहती केल्या होत्या. त्या प्रदेशाला आतां **क्विबेकचा** प्रांत असें म्हणतात. (सातव्या नंबरच्या नकाशा पहा); वायव्येस **उत्तर अमेरिकेंतील इंडियन्स,** म्हणजे मूळचे लोक, ह्यांची वस्ती होती; आणि नैर्ऋत्येस **फ्रेंचांचा लूइसियाना** नांवाचा मुलूख होता. फार दिवसां-

पासून, वायव्येस असलेला **रेड इंडियन्सांचा** (ताम्रवर्ण इंडियन लोकांचा) मुलूख हा कलहाचें मूळ झालेला होता. **फ्रेंचांचे गव्हर्नर्स** (सुभेदार, किंवा अमलदार) **आलेघनीझ** नांवाच्या पर्वतांच्या ओळीच्या पश्चिमेकडील सर्व मुलुखावर दावा सांगत असून, त्यांनीं त्या मुलुखांतून वसाहती करणाऱ्या **इंग्लिश** लोकांना हाकवून दिलें. **इंग्लिश** लोकांनीं आपल्यातर्फे **नोव्हास्कोशिया** नांवाच्या द्वीपकल्पांतून वसाहत करणाऱ्या **फ्रेंचांना** हाकवून देऊन, आणि १७४९ त **लार्ड हालिफाक्स** ह्यावरून जिचें नांव पडलें अशी **हालिफाक्स** नांवाची **इंग्लिशांची** वसाहत स्थापून, **फ्रेंचांचें** उसनें फेडलें. त्याच वेळीं **इंग्लिश** लोक **ओहैओ** नदीच्या खोऱ्यांतून वर तिच्या उगमाकडील मुलुखांत शिरले, आणि त्या नदीच्या दुबेळक्यांत ते एक किल्ला बांधीत होते. तेव्हां **डूकेन** नांवाचा **कानडाचा गव्हर्नर** ह्यानें १७५४ त तेथें मोठी फौज पाठविली. तिनें त्या **इंग्लिश** लोकांना पिटून लावलें, आणि **फोर्ट** (किल्ला) **डूकेन** नांवाचा तेथें एक मजबूत **फ्रेंचांचा** किल्ला बांधला. **जार्ज वाशिंग्टन** हा तेव्हां बेवीस वर्षांच्या उमरीचा तरुण पुरुष होता. त्याला तो किल्ला परत घेण्यासाठीं पाठविलें; परंतु त्या बरोबर माणसें दिलीं होतीं तीं शत्रूंच्या फौजेशीं तुलनेनें पाहतां इतकीं थोडीं होतीं कीं, एका लहानशा चकमकींत त्याची सरशी होऊन, त्याला माघारें परतणें भाग आलें. **डूकेनच्या** मागून **मान्टकामचा मार्किस** हा **कानडाचा** गव्हर्नर झाला. त्यानें **डूकेन, निआगारा,** आणि **टिकान्डेरोगा,**

अमेरिकेंत फ्रेंच आणि इंग्लिश ह्यांची परस्परांशीं वागणूक, १७५४.

फोर्ट डूकेन, म्हणजे डूकेन नांवाचा किल्ला, बांधला जातो, १७५४.

हे तीन किल्ले (नकाशा नंबर ७ हा पहा), **इंग्लिश** लोकांचा पश्चिमेकडे रिघाव अगदीं खुंटवून टाकावा ह्या हेतूनें, मध्यें मध्यें लहान लहान किल्ले बांधून, सांगडून टाकण्याचा निश्चय केला. **इंग्लंडां**तील **सरकाराला** हें वर्तमान कळतांच तें त्या गोष्टीचा गंभीरपणानें विचार करण्यास प्रवृत्त झालें, आणि **मेजर जनरल** (लष्करी अमलदार) **ब्राड्डॉक** ह्याला २००० फौजेनिशीं **इंग्लंडाहून** तिकडे रवाना केलें. **ब्राड्डॉक** ह्याला दैव प्रतिकूळ झालें. तो तेथें पोहोंचून जंगलांतून कूच करून जात असतां, त्यांत दबा धरून राहिलेल्या **फ्रेंचांनीं** आणि **इन्डियन्सांनीं** त्याच्या फौजेपैकीं ७०० लोक ठार मारले, आणि तोही ठार मारला गेला. आतां **इंग्लंड** आणि **फ्रान्स** ह्यांनीं लढून त्या गोष्टीचा निकाल केल्यावांचून गत्यंतर नव्हतें इतकें स्पष्ट झालें.

ब्राड्डॉकचा पराभव होतो, १७५५.

एवढ्यानेंच सर्व संपलें नाहीं, कारण **यूरोपांत** मागलें युद्ध पुनः उत्पन्न होऊं लागलें होतें. **ए-ला-शापेल्लचा** तह झाल्या दिवसापासून **मेरिया थेरेसा** ही **सैलिशिया** परत मिळविण्याची इच्छा करून होती; आणि **प्रुशियाचा राजा, दुसरा फ्रेडरिक,** ह्याला नुकतेंच कळलें होतें कीं, **फ्रान्स, स्वीडन, रशिया,** आणि **साक्सनी,** ह्या देशांचे राजे, आपल्या दिवसानुदिवस वृद्धिंगत होणाऱ्या ऐश्वर्याचा चुराडा करण्यासाठीं, त्या **मेरिया थेरेसाला** कुमक करण्याला राजी झालेले होते. तो शाहणा आणि दीर्घदृष्टि असल्यामुळें, त्यानें, **साक्सनीशीं** युद्ध करणार म्हणून जाहीर करून, आणि **इंग्लंडाशीं** सख्य करून, हल्ल्याला आरंभ केला. त्यामुळें अशी गोष्ट घडून आली कीं,

सात वर्षांचें युद्ध असें ज्याला म्हणतात तें सुरू होतें, १७५६.

इंग्लंड आणि **प्रुशिया** एका बाजूस, व **फ्रान्स, रशिया, आस्ट्रिया,** आणि **साक्सनी,** हीं दुसऱ्या बाजूस होऊन, "**सात वर्षांचें** युद्ध" ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला जो भयंकर झगडा, त्याला आरंभ झाला.

इंग्लंडाची बिलकूल तयारी नव्हती. फौजेची अतिशय हेळसांड झालेली होती, आणि फक्त तीन पलटणी काय त्या कामगिरीच्या योग्य होत्या. तेव्हां **फ्रान्स इंग्लंडावर** स्वारी करतो कीं काय अशी सर्व राष्ट्राला दहशत पडली, आणि **हेन्री पेल्हम** वारला तेव्हां त्याचा भाऊ **न्यूकास्टलचा ड्यूक** हा मुख्य प्रधान

इंग्लंडावर एक अरिष्ट येऊन कोसळतें, १७५६.

झालेला होता, तो गयाळ आणि रिकामा गडबड्या असल्यामुळें, असल्या संकटकाळाला तोंड देण्याला अगदीं अयोग्य होता. इतक्यांत पूर्वीच एक अरिष्ट येऊन पडलें होतें. **फ्रेंचांनीं** युद्ध करणार म्हणून जाहीर करण्यापूर्वीच **मिनॉर्का** नांवाचें बेट घेतलेलें होतें, आणि तेथून त्यांना घालवून देण्याकरितां **आड्मिरल**

फ्रेंच लोक मिनॉर्का बेट घेतात, तारीख १७ एप्रिल १७५६.

(अरमाराचा अधिपति) **बिंग** ह्याला माणसांची वर अपुरती भरती केलेलीं अशीं दहा जहाजें बरोबर देऊन पाठविलें. तो तेथें जाऊन पाहूं लागला तों **फ्रेंचांना** जिंकण्यापुरतें आपलें सामर्थ्य नाहीं असें त्याला वाटलें, म्हणून लहानशी चकमक झडून त्याला माघारें यावें लागलें. तेव्हां लोकांना जो क्रोध आला त्यानें **न्यूकास्टलाची** पांचांवर धारण बसून, **बिंग इंग्लंडास** परत येतांच कोर्ट-मार्शल, म्हणजे लष्करी कोडत, नेमून त्याची चौकशी करवितों असें त्यानें वचन दिलें. पुढील सालीं **न्यूकास्टल** हा कामावरून दूर झाला, तेव्हां खरोखरच

बिंगाची चौकशी झाली, आणि जरी कोडतानें, तो कायद्या-प्रमाणें अपराधी तर खराच परंतु नीतीनें तो निरपराध आहे असें ठरवून, त्यावर दया करावी अशी बळकट शिफारस केली तरी, त्या अरमाराच्या शूर अधिपतीला १७५६ त मार्चच्या १४ व्या तारिखेस गोळ्या घालून जिवें मारलें.

आडमिरल बिंग ह्याला देहांत शासन होतें, १७५६.

मिनॉर्का बेट गमावल्यानें राष्ट्रांतील लोकांना जो तैष आला होता तो शांत होतो न होतो तोंच, **हिंदुस्तानांतून** त्याहून घोर-अनर्थाची खबर **इंग्लंडांत** येऊन पोहोंचली. तद्देशीय राजांपैकीं, **सुराज–उद्दौला** नांवाचा एक राजा, **बंगालचा व्हाइसरॉय** (राजप्रतिनिधि किंवा नवाब) होता, त्याचा **कलकत्ता** एथील **इंग्लिश** व्यापाऱ्यांशीं तंटा झालेला होता. म्हणून तो **कलकत्त्या**-वर चाल करून गेला, त्यानें तें शहर घेतलें, आणि १४६ **इंग्लिश** लोक हातीं सांपडून कैदकेलेले होते, त्यांना जून महिन्यांतील एका उकाड्याच्या रात्रीं, त्या किल्ल्यांतील एका बंदिस्त कोठडींत त्यानें खचून भरून कोंडून ठेवलें. त्या कोठडीला तेव्हांपासून "**ब्लाक होल**" (अंधारबीळ किंवा अंधारकोठडी) असें नांव पडलें. ती कोठडी औरस चौरस २० फुटी सुद्धां नव्हती, आणि तींत हवा खेळण्याला अवघ्या गजांच्या दोन लहान जाळ्या मात्र होत्या. त्या कोठडींत कोंडमारा होऊन, ते हतभाग्य कैदी तींतून बाहेर काढण्यासाठीं किंकाळ्या फोडीत होते, परंतु त्यांना गुदमरून मरण्याला तेथेंच ठेवलें. दुसरे दिवशीं सकाळीं त्या १४६ सांपैकीं फक्त तेवीस जिवंत बाहेर आले. नंतर **सुराज–उद्दौला** ह्यानें **फोर्ट वुइलियम** नांवाच्या त्या किल्ल्यांत

कलकत्ता एथील ब्लाकहोल, म्हणजे अंधारकोठडी, जून १७५६.

हिंदुस्तानी शिपायांची तुकडी रखवालीस ठेवून, कोणाही **इंग्रे**-जाला **कलकत्त्यांत** राहण्याची मनाई केली, आणि त्या शहराला त्यानें **अलीनगर**, म्हणजे "**देवाचें समुद्रतीरचें नगर**" असें नांव दिलें.

१७५६-१७५७ ह्या दोन सालांत **इंग्लंड** जितकें खालावलें होतें, तितकें पूर्वी कधींही खालावलें नव्हतें. **यूरोपांत दुसऱ्या फ्रेडरिक**चा शत्रूंपुढें थोडाच किंवा क्वचितच टिकाव लागत होता. **कंबर्लंड**चा **ड्यूक फ्रेंचां**च्या फौजेपासून माघारीं हटला होता. आणि **क्लॉस्टर्झेव्हेन** एथें त्यांना **हानो-व्हर**चा मुलूख व्यापूं देण्याला कबूल झालेला होता. **कानडा** देशांत **फ्रेंच** जिकडेतिकडे विजयी झाले. **हिंदुस्तानांत इंग्लिशांना** दंग्यानें जिवें मारलें होतें, आणि **चेस्टर्फील्ड** नांवाचा एक महासमर्थ राजकारणी पुरुष होता तो देखील एका समयीं मोठ्यानें म्हणाला, " आमची आतां एकलोकता देखील उरली नाहीं."

यूरोपांत पराभव, १७५७.

अशी स्थिति झाली होती तथापि, आतां दैवानें उलट मारण्यास आरंभ केलेला होता. जो पूर्वी एकदा तरुण "स्वदेश-भक्तांचा" प्रमुख होता, व जो पुढें **लार्ड चाथम** ही पदवी पा-वून त्या नांवानें प्रसिद्ध झाला, तो **वुइलियम पिट्ट** ह्याच समयीं उजागऱ्यास आला. पुष्कळ वर्षांपासून तो **पिट्ट** आपल्या स्वदेशभक्तीनें, निष्कपट कळकळीनें, आणि (विग ह्याला वांचवण्याकरितां त्यानें आवेशानें भाषण केलें त्या समयीं जसा) तसा अन्यायाला आडवा येऊन, त्यानें लोकांचीं मनें हरण केलेलीं होतीं. परंतु **दुसऱ्या जार्जाला, हानोव्हरला** प्रतिकूल अशा त्याच्या भाषणांनीं, तो आवडत

वुइलियम पिट्ट.

नव्हता. १७५६ त **डेव्हनशायरचा ड्यूक** हा **मुख्य प्रधान** होता, त्यानें **पिट्ट**ला पसंत करून राज्याच्या सेक्रेटरीच्या जाग्यावर नेमलें, परंतु राजानें पुढें थोड्याच महिन्यांनीं त्याला त्या कामावरून दूर केलें. त्यापासून परिणाम असा झाला कीं, **डेव्हनशायर**चें प्रधानमंडल मोडलें, आणि **न्यूकास्टल** ह्याला पुनः मुख्य प्रधान नेमल्यामुळें त्याला आपलें नवीन प्रधानमंडल जुळावें लागलें तेव्हां, **पिट्टा**वांचून माझ्यानें राज्यकारभार करवणार नाहीं असें त्यानें राजाला साफ सांगितलें. म्हणून **जार्जा**ला आपला हेका सोडावा लागला, आणि **"धि ग्रेट कामोनर"** (तो प्रतापी सामान्य दर्जाचा माणूस, असें त्या पिट्टाला राष्ट्रांतील सारे लोक म्हणत असत) पुढील चार वर्षें **राज्याचा सेक्रेटरी** झालेला होता. त्या चार वर्षांत, जरी **न्यूकास्टल** हा **मुख्य प्रधान** होता, आणि **पार्लमेंटा**च्या सभासदांकडून **सरकार**तर्फे संमति देवविण्यासाटीं, त्याकाळीं वहिवाट पडली होती तीप्रमाणें, त्यांना लांचरुषवत देण्याचें सारें काम करीत होता, तरी राज्यांत खरी सत्ता म्हटली म्हणजे **पिट्ट** ह्याच्या हातीं होती. तो एकदा म्हणाला, "मी देशाला वांचवीन अशी माझी खातरी आहे, "आणि दुसरा कोणींही वांचवूं शकणार नाहीं." आणि हाच जो त्याचा जातीचा भरवसा, त्यानेंच, **इंग्लंडा**ला चार वर्षांत निराशेच्या अधस्तलापासून ऐश्वर्याच्या कळसाला चढविण्याला, त्याला समर्थ केलें.

पिट्ट ह्याचा राज्यकारभार, १७५७ –१७६१.

पिट्टाच्या आंगीं दोष पुष्कळ होते. तो जालीम, खुनशी, आणि वारंवार कृतघ्न असे, परंतु तो तसाच स्वार्थपराङ्मुख, स्वदेशभक्त, आणि **धैर्यवान**, होता. त्यानें धन मिळवून स्वतः श्रीमान होण्याविषयीं एकसा-

रखा नकार धरिला होता, आणि त्यानें आपल्या देशाची सेवा चांगली केली.

त्याच्या हातीं सत्ता १७५७ त आली, आणि फारच थोडक्या वेळांत त्यानें सर्व देशभर शिबंदीची व्यवस्था केली, अरमार सुदृढ केलें, आणि **हाइलंडर्स** लोकांच्या पलटणी बनविल्या. **पिट्ट** ह्यानें, **क्लॉस्टर्झेव्हेन** एथील अपमानकारक संकेत, करार, किंवा तह, बिलकूल मान्य केला नाहीं; **कंबर्लंड**च्या **ड्यूका**ला माघारीं बोलावलें, आणि **इंग्लिश** व **हानोव्हीरियन्स** ह्या लोकांच्या फौजेवर आधिपत्य करण्याला, **ब्रन्स्वुइक**चा **ड्यूक फर्डिनांड** नांवाचा एक समर्थ सरदार होता त्याला, त्याच्या जागीं पाठविलें. **फ्रेडरिक** राजाला दरसाल ७००००० पौंड इतकी पैक्याची कुमक करीत जावी अशी **पार्लमेंटा**नें संमति दिली. **फ्रेडरिका**ला आतां कुमकेविषयीं भरवसा येऊन त्याला धैर्य आलें, आणि त्यानें १७५७ त नोव्हेंबरच्या १५ व्या तारिखेस **साक्सनींत रॉस्बाक** एथें **जर्मन्स** आणि **फ्रेंच** ह्यांच्या एकत्र झालेल्या फौजेची धुळधाण करून तिला पिटून लावलें. पुढें एका महिन्यानें त्यानें **सैलिशियां**त **लायथेन** एथें एका मोठ्या **आस्ट्रियन** फौजेचा पराभव केला. ह्या जयांनींच, आणि इतक्या पुष्कळ शत्रूंविरुद्ध ज्या परमावधीच्या शौर्यानें त्यानें आपला टिकाव काढला त्या शौर्यानें, त्या **प्रुशिया**च्या राजाला **फ्रेडरिक धि ग्रेट** हा किताब मिळाला, आणि ज्या त्याच्या देशाची अजून **यूरोपां**तील बलाढ्य राज्यांत क्वचितच गणना होत होती, तो देश त्या दोहों गोष्टींनींच त्या अवलीच्या दिवसांत चुरडला गेला नाहीं.

रॉस्स्बाक आणि लायथेन एथील लढाया, १७५७.

पिट्ट यूरोपांत चाललेल्या युद्धाला ह्या प्रकारें नवा जीव आणीत असतां, ज्या **अमेरिकेंत इंग्लंडाचें** नफानुकसान फार होणार होतें त्या **अमेरिकेकडे** मुख्यत्वें त्यानें आपलें लक्ष्य वळविलें.

कानडा देशांतील युद्ध, १७५७–१७६०.

तेथें वसाहत करणाऱ्या लोकांना **क्विबेक** आणि **मांस्ट्रियाल** ह्या दोहों शहरांवर हल्ला करण्यासाठीं आणि पश्चिमेडील मुलूख जिंकण्यासाठीं फौजा जमविण्याकरितां त्यानें विनवणी केली; आणि राजाकडील रणांत असलेल्या लष्करी अमलदारांच्या बरोबरीचे दर्जे त्या लोकांनीं नेमिलेल्या अमलदारांना देऊन, त्यानें त्या लोकांचा कन्हवाळा संपादला. **इंग्लंडांतून** त्यानें, दारूगोळा वगैरे युद्धसामग्री, हत्यारें, आणि अन्नसामग्री, व तशाच नवीन बनविलेल्या **हाइलंडर्स** लोकांच्या पलटणीही, पाठविल्या. **जनरल आबरक्रॉंबी** हा मुख्य सेनापति होऊन तिकडे गेला, परंतु **पिट्ट** ह्यानें **आम्हर्स्ट, वूल्फ,** आणि **हाउ,** ह्या तिघां त्याहून तुलनेनें तरुण परंतु मोठ्या काबिल माणसांना निवडून त्याच्या हाताखालीं काम करण्यासाठीं नेमून पाठविलें. शिवाय त्यानें **आड्मिरल** (अरमाराचा अधिपति) **बॉस्कावेन** ह्याला, उत्तरेकडील **लूइस्बर्ग** नांवाच्या शहरावर हल्ला करण्यासाठीं, आणि **कानेडियन** लोकांना समुद्रावरून कुमक बिलकूल होऊं नये ह्यासाठीं, बरोबर अरमार देऊन पाठविलें.

पुढलीं तीन वर्षें **कानडा** देशाच्या संबंधानें वर्णन करण्यायोग्य

डूकेन नांवाचा किल्ला परत घेतला, १७५८.

उलटापालटीचीं झालीं. १७५८ त जूलईच्या २७ व्या तारिखेस **लूइस्बर्ग** आणि **केप ब्रेटन** नांवाची सर्व भूशलाका, हीं **इंग्लिशांच्या** हातीं आलीं. नोव्हेंबरच्या २५ व्या तारिखेस **डूकेन**

नांवाचा किल्ला, **जनरल फार्ब्स** आणि **वाशिंग्टन** ह्या उभय-तांच्या हुकमतीखालीं **हाइलंडर्स** आणि **अमेरिकन्स** ह्यांच्या एका तुकडीनें परत घेतला. तो किल्ला हातीं येतांच त्याचें नांव पालटून, त्या **पिट्ट** नांवाच्या प्रतापी प्रधानाच्या नांवावरून **पिट्टस्बर्ग** असें नांव ठेवलें (नकाशा नंबर ७ हा पहा). **इंग्लिशांना टिकान्डेरोगा** एथें खरोखर ठोकर बसली; तेथें **लार्ड हाउ** ठार मारला गेला, आणि **जनरल आबरक्रॉंबी** ह्याचा पराभव झाला; परंतु पुढील सालीं, म्हणजे १७५९ त, **टिकान्डेरोगा, क्रौनपॉइन्ट,** आणि **निआगारा** हीं सर्व **इंग्लिशांनीं** घेतलीं.

दरम्यानच्या वेळांत, तो **मान्टकाम** नांवाचा **फ्रेंचांचा** शूर सेनापति, **फ्रान्सांतून** फारच थोडी कुमक मिळाली असतांही, **कानडाचें** मुख्य शहर, **क्विबेक, वूल्फ** नांवाचा **इंग्लिशांकडील** सरदार तें घेण्याविषयीं प्रयत्न करीत असतांही, बळकट धरून राहिला होता. तें **क्विबेक** शहर **सेन्ट लॉरेन्स** नांवाच्या नदीच्या डाव्या किनाऱ्यावर ओथंबून राहिलेल्या उंच खडकाच्या डगरीवर वसलेलें असून, त्याच्या मागल्या आंगास **सेन्ट चार्लेस** नांवाची दुसरी एक नदी आहे. त्या शहराच्या उत्तरेस एक उंच खडकळ मैदान आहे, त्याला **एब्राहामचें मैदान** असें म्हणतात, आणि त्या शहराच्या दक्षिणेस सखल किंवा बदखल जमीन आहे तिजवर **मान्टकाम** ह्यानें आपली फौज तळ देऊन बंदोबस्तानें ठेवलेली होती. १७५९ त **जनरल वूल्फ** ह्याचे शिपाई किंवा फौज वर वाहून आणणारें मोठें अरमार **सेन्ट लॉरेन्स** नदीच्या मुखावाटे वर हकारून गेलें; आणि **वूल्फानें** त्या शहरावर कुलपी गोळ्यांचा भडमार केला, व शिपायांकडून हल्लाही करविला; त्यांत त्याचे कित्येक लोक गमावले, इतकें करूनही तें शहर

त्याच्यानें घेववलें नाहीं. तेव्हां त्याची हिम्मत खचली, तशांत तो तापानें बीमार झाला. त्याच तापानें त्याच्या फौजेपैकीं पुष्कळ माणसें दगावलीं. तेव्हां हिंवाळा संपे तोंपर्यंत तें शहर घेण्याचा यत्न सोडून द्यावा लागेल असें त्याला वाटलें. परंतु एका दिवशीं

क्विबेक शहर घेतलें, सेप्टेंबर, १७५९.

क्विबेकच्या वरल्या बाजूस त्या नदीच्या उत्तरेकडील कांठाची टेहळणी करीत असतां, **एब्राहाम**च्या उंच मैदानाला जाणारी अरुंद आणि त्या कड्याभोंवतीं वांकणावांकणांनीं जाणारी पाऊलवाट त्यानें पाहिली, आणि त्या वाटेनें आपली फौज रात्रीची वर नेऊन त्या शहरावर छापा घालण्याचा त्यानें निश्चय केला. सेप्टेंबरच्या १२ व्या तारिखेस मध्यरात्रीं त्याची सर्व तयारी होऊन, पुढें एका तासानें त्याचे शिपाई दोघेदोघे मिळून तो कडा त्या पाऊलवाटेनें चढून वर जाऊं लागले. **वूल्फ** तेव्हां, थोड्या वर्षांपूर्वी **ग्रे** नांवाच्या **इंग्लिश** कवीनें रचलेलें "**शोकगीत**," हलक्या स्वरानें तोंडानें म्हणत त्यांमागून चालला होता. इतक्यांत, खालीं लिहिलेल्या अर्थाचा एक चरण म्हणून, तो अमळ थांबून विचार करूं लागला,

"जयश्रीचे मार्ग निधनाप्रतच नेतात."

आणि मोठ्यानें म्हणाला "हे **क्विबेक** घेण्याचे आयास करण्यापेक्षां, त्या (शोकगीत नांवाच्या) काव्याचा कर्ता होणें मला पुरवेल." दिवस उजाडतांच ती लहान फौज त्या मैदानावर पोहोंचून उभी राहिली, आणि **मान्टकाम** जरी तिला पाहून दंग झाला, तरी त्यानें तिला हटविण्याचा उद्योग त्वरेनें आरंभला. जेव्हां **फ्रेंच** आंगावर तुटून आले, तेव्हां **इंग्लिशांनीं** त्यांवर प्राण घेणारा

गोळ्यांचा ताशेरा झाडला. **मान्टकाम** ह्यानें आपल्या शिपायांना पुष्कळ धीर दिला. परंतु ते फारच थोडे असून अगदींच कवाईत शिकलेले नव्हते, त्यामुळें, **इंग्लिशांनीं** जेव्हां त्या ताशेऱ्यानंतर संगिनांनीं त्यांवर हल्ला केला, तेव्हां त्यांची फळी फुटून मोड झाला. **वूल्फ**ला असाध्य जखम लागून तो एका अमलदाराच्या वेंगेंत पडलेला होता, तो अमलदार त्याला म्हणाला, "अहो ते पळूं लागले, अहो ते पळूं लागले!" तें ऐकून **वूल्फनें** पुसलें "अहो कोण पळूं लागले?" आणि जेव्हां कोण पळूं लागलें हें त्यानें ऐकलें तेव्हां तो म्हणाला, "**देवाचा** जयजयकार होवो, मी आतां सुखानें मरतों." तो शूर **मान्टकाम**ही जखमा लागून त्यांनींच मरण पावला; आणि जेव्हां आपण मरणार असें त्यानें ऐकलें, तेव्हां तो आपल्याशींच दुःखानें गुणगुणला, "तर फारच चांगलें झालें, क्विबेक शत्रूंच्या हातीं गेलेलें पाहण्याला मी जिवंत राहणार नाहीं." आतां

वूल्फ आणि मान्टकाम, ह्यांचे मृत्यु.

एब्राहाम नांवाच्या त्या उंच कड्यावर एक छत्री आहे, तिजवर एकमेकाच्या जवळ अशीं त्या दोघां शूर सेनापतींचीं नांवें कोरलेलीं आहेत. ते दोघेही आपापलीं कर्तव्यें करतांना मरण पावले. पुढें १७६० त सेप्टेंबरच्या ८ व्या तारिखेस **मॉन्ट्रियाल** शहर हस्तगत होई तोंपर्यंत जरी आणखी एक वर्षभर युद्ध चाललेंच होतें, तरी ज्याच्या योगें **अमेरिकें**तील **फ्रेंचांच्या** सत्तेचा चुराडा झाला, तें **कानडा** जिंकून घेण्याचें खरोखर काम, **क्विबेक**च्या तटा खालींच झालें, म्हणजे **क्विबेक** हातीं येतांच **कानडा** देश हातीं आला.

पिट्ट ह्याला ती वेळ गर्व करण्यासारखी होती. त्यानें निवडलेल्या तरुण सेनापतींच्या इतक्या यशाला त्याची स्वतःची धमक, आणि

पाठबळ, हीं कारण झालीं; आणि त्याच वर्षी **यूरोपांत** दुसरे जय मिळाले. **वेस्ट फेलिया** प्रांतांत **मिन्डेन** एथें **ड्यूक फर्डिनांड** ह्याच्या हुकमतीखालीं **इंग्लिशांच्या** आणि **हानोव्हेरियन्सांच्या** एकत्र झालेल्या फौजेनें १७५९ च्या आगस्टांत **फ्रेंचांचा** पराभव केला, आणि त्याच महिन्यांत **आड्मिरल बॉस्कावेन** ह्यानें **पोर्टुगलांतील लेगॉस** नांवाच्या बंदराबाहेर **फ्रेंचांचीं** पांच जहाजें समुद्रांत बुडविलीं. नोव्हेंबरांत, **आड्मिरल हॉक** ह्यानें, **फ्रान्सच्या** पश्चिमेकडील किनाऱ्यावर **क्विबेरॉन** नांवाच्या अखाताच्याबाहेर वाऱ्याच्या मोठ्या वावटळींत, **फ्रेंचांच्या** बाकी राहिलेल्या अरमाराचा पराभव केला. **वाल्पोल** नांवाच्या माजी प्रधानाचा पुत्र, **हॉरेस वाल्पोल,** ह्यानें एका ठिकाणीं लिहिलें आहे, "आम्हांला दररोज प्रातःकाळीं आज कोठें जय झाला म्हणून विचारावें लागतें, नाहींतर भीति वाटते, आम्ही एकाद्या जयाच्या खबरेला अंतरूं."

यूरोपांतील जय, १७५९.

त्याच वेळीं **इंग्लंडाकरितां** दुसरा एक मुलूख जिंकला जात आहे, असें पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूकडून वर्तमान आलें. **क्लाइव्ह** हा १७५३ त प्रकृति बिघडून स्वदेशी आलेला होता, आणि तो आतां नुकताच **फोर्ट सेन्ट डेव्हिडचा गव्हर्नर** होऊन **मद्रासेस** माघारा गेलेला होता. इतक्यांत तेथें त्या **ब्लाक होल** मधल्या (अंधारकोठडीमधल्या) आकांताची भयकारक खबर पोंहोंचली. तेव्हां **आड्मिरल वाट्सन** आणि **क्लाइव्ह** ह्या दोघांना **कलकत्ता** परत घेण्यासाठीं पाठविण्याचा तत्काल निश्चय झाला; आणि सहा महिने पुरते गुदरले नाहींत तों, **फोर्ट वु-**

क्लाइव्ह कलकत्ता परत घेतो, १७५७.

इलियम नांवाच्या किल्ल्यावर **इंग्लिशांचें** निशाण पुनः फडकूं लागलें, आणि **सुराज-उद्दौला** ह्याला तहनामा करून त्यावर सही करावी लागली. परंतु त्यानें आपलें वचन पाळलें नाहीं, आणि तो **बंगाल्यांतून इंग्लिशांना** पिटून लावण्याकरितां **फ्रेंचांशीं** कारस्थान करीत आहे, व त्यानें **प्लासी** एथें मोठी फौज जमा करून ठेवलेली आहे, असें जेव्हां **क्लाइव्ह** ह्याला वर्तमान कळलें, तेव्हां त्याला पदच्युत करून त्याच्या जागीं त्याच्या सरदारांपैकीं **मीर-जाफीर** नांवाचा एक सरदार होता त्याला बसविण्याचा **क्लाइव्हनें** निश्चय केला. त्यावेळीं **नवाब सुराज-उद्दौला** ह्याची ६०००० फौज होती, आणि **क्लाइव्ह**जवळ अवघी ३००० माणसांची लहानशी फौज होती, तरी **क्लाइव्हनें प्लासी** एथें १७५७ त जूनच्या २३ व्या तारिखेस, त्या **नवाबाशीं** लढाई करण्याचें साहस केलें. **इंग्लिशांनीं हिंदुस्तानांत** पहिली मोठी लढाई केलेली तीच होय, आणि तींत धुळधाणी किंवा वाताहत हीं शिवाय दुसरें वृत्त थोडेंच घडलें. तद्देशीय शत्रूंच्या फौजेंत **इंग्लिशांच्या** तोफांच्या माऱ्यानें अव्यवस्था होऊन एकच घप्पाघोळ उडाला. **सुराज-उद्दौला** दहशत घेऊन पळाला, आणि **मीर-जाफीर** ह्याला **इंग्लिशांच्या** अभयवचनाखालीं त्याच्या गादीवर बसविलें. ह्या **प्लासीच्या** लढाईनें **हिंदुस्तानाच्या** दैवगतीचा निकाल झाला. **क्लाइव्ह**, त्यापुढें तीन वर्षें त्या देशांत बंदोबस्त करण्यासाठीं राहून, नंतर **इंग्लंडास** माघारा आला. तेव्हां त्याला **लार्ड क्लाइव्ह** असा किताब देऊन, **आयर्लंडचा** बडालोक केलें. दरम्यानच्या वेळांत **मद्रास** एथें युद्ध चालूच होतें. **कर्नल आयर कूट** ह्यानें १७६० त **वान्डिवाश** एथें **फ्रेंचांचा** पराभव

प्लासीची लढाई, तारीख २३ जून, १७५७.

केला, आणि १७६१ त **इंग्लिशांनीं पाँडिचेरी** घेतली. जरी पुढें १७६४ त तेथील कोट किंवा तटबंदी पाडून टाकून तें शहर **फ्रेंचांना** परत दिलें, तरी तद्देशीय राजे तेव्हांपासून आश्रय आणि संरक्षण ह्यांकरितां **इंग्लिशांकडे** पाहूं लागले. पुढें १७६५ त जेव्हां **लार्ड क्लाइव्ह** पुनः **हिंदुस्तानांत** गेला तेव्हां **दिल्ली** एथील **मोगल बादशाहा** ह्यानें, दरसाल आपणाला अडीच लक्ष पौंड खंडणी देत जावी अशा करारानें, **ईस्ट इंडिया कंपनीला बंगाल, बहार,** आणि **ओरिसा,** ह्या तीन प्रांतांचा **"दिवाण,"** म्हणजे महसूल वसूल करणारा कामगार, हा अधिकार दिला. त्यायोगें **इंग्लिशांच्या** हातीं मोठी सत्ता आली.

इंग्लिशांची सत्ता हिंदुस्तानांत सर्व श्रेष्ठ होते.

मधल्या अवधींत **इंग्लंडांत** मोठमोठे पालट होत होते. **दुसरा जार्ज** १७६० त आक्टोबरच्या २६ व्या तारिखेस मृत्यु पावला, आणि त्याचा नातू, **तिसरा जार्ज,** त्याच्या मागें गादीवर बसला. त्या नव्या राजाची सल्ला करावा अशी इच्छा होती, परंतु **पिट्ट** ह्याच्या मनांत, मागला क्रम पुढें चालवावा, आणि **स्पेनच्या** राजानें **फ्रान्सला** कुमक करतों असें गुप्त वचन दिलेलें होतें म्हणून **स्पेन** देशाशीं युद्ध करावें, असें होतें. परंतु **हौस आफ् कामन्स** ही सभा युद्धाच्या खर्चानें आधींच अगदीं जिकिरीस आली होती, आणि नवीन लढाईचें तिला भय वाटत होतें. **वाल्पोलाहून पिट्ट** शाहणा होता, आणि आपल्या मताविरुद्ध वर्तन करण्यापेक्षां काम सोडणें बरें असें मानून त्यानें आपलें काम सोडलें. नंतर १७६१ त आक्टोबरच्या ५ व्या तारिखेस **ब्यूटचा अर्ल** ह्याला राजानें त्याच्या जागीं ने-

पिट्ट काम सोडतो, १७६१.

मलें. अखेरीस पिट्टचें म्हणणें रास्त होतें असें प्रत्ययास आलें, कारण, त्यानें राजीनामा दिल्यानंतर फक्त तीनच आठवड्यांनीं, म्हणजे १७६२ च्या जान्युअरींत, स्पेन देशाशीं युद्ध करणार असें इंग्लंडला जाहीर करणें भाग पडलें. पुढें आणखी एकवर्षभर युद्ध चालू होतें, आणि जी फौज आणि जें अरमार, पिट्ट ह्यानें इतकें कार्यक्षम केलें होतें, तें अरमार आणि ती फौज ह्यांनीं फ्रान्स आणि स्पेन ह्यांच्यावर दिव्य जय मिळविले. परंतु ब्यूट ह्यानें फ्रेडरिक धि ग्रेट ह्याला पुढें बिलकूल पैसा देणार नाहीं म्हणून साफ सांगितलें; आणि त्या फ्रेडरिकाला आतां रशियाकडून आश्रय किंवा पाठबळ मिळालें, म्हणून त्यानें मेरिया थेरेसा हिच्याशीं ह्यूबर्ट्स्बर्ग एथें वेगळा तह केला, त्या तहांत त्यानें सैलिशिया आपणाकडे ठेवली. शेवटीं इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, आणि पोर्टुगल, ह्यांच्या दरम्यान पारिस एथें १७६३ त तहनामा होऊन, त्या तहानें तें "सात वर्षांचें युद्ध" समाप्त झालें. त्या तहानें इंग्लंडाला कानडा, फ्लॉरिडा, आणि न्यू ऑर्लीन्स खेरीज करून मिस्सिसिपी नदीच्या पूर्वेस असलेला फ्रेंचांचा सारा मुलूख, मिळाला, आणि हिंदुस्तानांत तर आतां इंग्लंड राजसत्ताधीश झालें. फ्रेंचांनीं मिनॉर्का बेट इंग्लंडाला परत दिलें, परंतु पुढें थोड्याच वर्षांनीं तें बेट फ्लॉरिडासह स्पेनाकडे गेलें.

स्पेनाशीं युद्ध, १७६२.

ह्यूबर्ट्स्बर्ग एथील तह, फेब्रुअरी १७६३.

त्यावर सह्या झाल्या.

पारिस एथील तह, फेब्रुअरी, १७६३.

प्रकरण २३.

अमेरिकेंतील वसविलेल्या राज्यशाखांचें स्वातंत्र्य

तिसरा जार्ज, १७६०–१८२०–खंड १, १७६०–१७८४.

पारिस एथील तहनाम्यावर जेव्हां १७६३ त सह्या झाल्या तेव्हां **तिसरा जार्ज** राजा होऊन तीन वर्षें होऊन चुकलीं होतीं. ज्या राज्यावर तो आधिपत्य करूं लागला तें राज्य आतां एक प्रतापी साम्राज्य बनून राहिलेलें होतें. **हारेस वालपोल** ह्यानें आपल्या एका मित्राला एका वेळीं लिहिलें होतें; "तुम्ही स्वदेशाला आतां "ओळखणार नाहीं, तुम्ही त्याचा त्याग करून गेलां तेव्हां तें आ-"पल्या उत्पन्नावर निर्वाह करणारें आडवळणी लहानसें एक बेट "होतें, परंतु आतां तें साऱ्या दुनियेचें नाक झालेलें आहे असें "तुमच्या प्रत्ययास येईल." दुसऱ्या पक्षीं, जरी **तिसरा जार्ज** वारशानें बलाढ्य राज्याचा मालक झाला, तरी तो, अधिकारबल ज्यांना फारच थोडें होतें, अशा राजांच्या मागून गादीवर बसला. **दुसरा जार्ज** एका वेळीं म्हणाला होता, "इंग्लंडांत राजा म्हणून जो काय ते प्रधान आहेत." हे प्रधान मोठमोठ्या बलाढ्य **व्हुइग** कुलांतले होते. तीं कुलें **पार्लमेंटाच्या** सभासदांपैकीं निमे सभासद निवडून नेमून पाठवीत, आणि एकाद्या कायद्याचा मसुदा पसार केला पाहिजे अशी त्यांना इच्छा झाली, म्हणजे ते प्रधान **पार्लमेंटाच्या** बाकी राहिलेल्या निमे सभासदांच्या संमति पैसा देऊन विकत घेत. राजाच्या धूळभेटीसाठीं जीं दरबारें भरत त्यांच्या बहुतेक तोडीचीं ते प्रधान दरबारें भरीत. त्या दरबारांना, ज्या लोकांना सरकारी हुद्दे आणि तसल्या प्रकारच्या इतर मेहरबानीच्या गोष्टी

इंग्लंड प्रतापी साम्राज्य होतें.

संपादावयाच्या असत, ते सर्व लोक जात; कारण, राजे परदेशीय असत त्यामुळें ते मुख्यत्वें प्रधानांच्या लगामींत असत. त्यामुळें असा प्रकार घडून आला होता कीं, पार्लमेंटाच्या सभासदांची निवडणूक लोकांकडून अनिर्बंध किंवा स्वतंत्र रीतीनें होत नसे, आणि पार्लमेंटावर राजाचा पुष्कळसा अधिकार किंवा हुकमत राहिली नव्हती. वार्स आफ धि रोझिझ, (गुलाबांचीं युद्धें) ह्यांच्यापूर्वी, जेव्हां मोठमोठाले बडे लोक देशांत अमल करीत, तेव्हां जी वस्तुस्थिति होती, त्या प्राचीन वस्तुस्थितीला इंग्लंड हळू हळू माघारें लोटत चाललें होतें. ह्यास्तव तिसऱ्या जार्जाच्या कारकीर्दीच्या पहिल्या वीस वर्षांतील राजकारणांचा इतिहास, त्या राजानें प्रधानांवरील आपली गमावलेली हुकमत परत मिळविण्याविषयीं केलेले प्रयत्न, आणि इंग्लंड व अमेरिका ह्या उभय देशांत राष्ट्रांतील प्रजाजनांनीं आपल्या स्वातंत्र्यावर झालेल्या हल्ल्यांचा केलेला प्रतिकार, ह्या दोन गोष्टींनीं मुख्यत्वें आटोपलेला आहे.

पार्लमेंट हें लोकनियुक्त प्रतिनिधींचें नव्हे असें होतें.

दरम्यानच्या काळांत खुद्द राष्ट्रांतील लोकांच्या स्थितींत मोठाच पालट होऊं लागलेला होता; कारण, नवीन शोध आणि कृति ह्यांच्या युगाचा नुकताच आरंभ झालेला होता त्या युगानें हातकामाच्या जागीं यंत्रें काम करण्याला उत्पन्न केलीं, आणि त्यांच्या योगें नवीन पदार्थ तयार करण्याचे कारखाने आणि उद्योगधंदे इतक्या त्वरेनें वाढले कीं, जेथें पूर्वी एकही शहर नव्हतें तेथें पुढल्या पंन्नास वर्षांत मोठमोठीं शहरें अनेक निर्माण झालीं. १७६१ त, फ्लाइ-शट्ल, म्हणजे कळीनें फेंकलें आ-

यंत्रें आणि वाफेची शक्ति.

णारें* धोटें, निघालें त्यानें कोष्ट्यांना पूर्वीहून दुप्पट विणकाम करतां येऊं लागलें. १७६७–१७६८ त हार्ग्रीव्ह्स नांवाच्या पुरुषानें स्पिन्निंग-जेन्नी (अनेक सूत कांतण्याच्या चात्या एकदम ज्यानें फिरतात असा चरक) नांवाचें सूत कांतण्याचें यंत्र, आणि आर्कराइट नांवाच्या पुरुषानें स्पिन्निंग-फ्रेम (सूत कांतण्याचा सांचा) नांवाचें यंत्र, कृतीनें बनविलें. ह्या कृतींनंतर पुढें थोड्या वर्षांनीं डाक्टर कार्टराइट, ह्यानें पाउअर-लूम, म्हणजे वाफेनें, पाण्यानें, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी शक्तीनें, चालणारा माग, कृतीनें बनविला, त्याच्यायोगें हातानें विणण्याचे श्रम वांचले. जरी अज्ञान बंडाळ लोकांनीं वारंवार हीं यंत्रें मोडलीं, आणि गिरण्या जाळल्या, तरी सूत कांतणें आणि कापड विणणें हे दोन धंदे थोड्याच वर्षांत अमर्याद भरभराटीस आले. नंतर लोखंडाचा रस करण्याच्या कामीं खाणींतला दगडी कोळसा उपयोगीं पडतो हा शोध, आणि १७६९ त वाट्ट ह्यानें कल्पनेनें बनविलेलें वाफेचें यंत्र, ह्या दोहों गोष्टींनीं उत्तरेकडील प्रदेशांतील दगडी कोळशांच्या खाणींनजीक मोठमोठे लोखंडाचे कारखाने स्थापले गेले. इंग्लंड हा शिल्पानें अनेक प्रकारचे पदार्थ तयार करण्याच्या कारखान्यांचा देश त्वरित होत चालला. आतां तयार झालेला माल ठिकठिकाणीं किंवा बंदरांत नेण्याची मात्र काय ती अडचण उरली, आणि ती अडचण बहुतेक ब्रिज्जवाटरचा ड्यूक ह्याच्या उद्योगानें व हिंमतीनें दूर झाली. १७५८ त त्या ड्यूकानें, वर्स्ली एथें त्याच्या दगडी कोळशाच्या खाणी होत्या तेथून मांचेस्टरपर्यंत सहा मैल लांबीचा कालवा बांधण्याला त्याला परवानगी देणारा असा एक आक्ट (कायदा), पार्लमेंटाकडून मिळविला. त्याचें तें अचाट कृत्य वेडेपणाचें होतें असें पहिल्यानें

लोकांस वाटलें, कारण तो कालवा मर्सी आणि इर्वेल ह्या दोहों नद्यांचीं खोरीं २०० यार्ड लांबीचा नहर बांधून ओलांडून न्यावयास पाहिजे होता. परंतु ब्रिन्डूली नांवाच्या प्रख्यात इंजनेरानें ती अडचण दूर केली, तेव्हां तो कालवा इतका पूर्णपणें सिद्ध झाला की, दुसरे तसले कालवे लवकरच बांधले, आणि साऱ्या इंग्लंडभर पडावांवरून माल नेऊं आणूं लागले.

पहिले कालवे, १७५८-१७६०.

ह्या उद्योगधंद्यांच्या अतिशय ऊताचा परिणाम हा झाला कीं, लोकांची संख्या फारच त्वरेनें वाढली, आणि अन्न (खाण्याचे पदार्थ) पूर्वींहून पुष्कळ महाग झालें. आतां जसा धान्याचा आणि इतर खाण्याच्या पदार्थांचा परदेशांहून मोठा पुरोठा येतो, तसा तेव्हां येत नव्हता, कारण त्या काळीं जबर जकाती व कर होते, त्यांनीं परदेशचें धान्य व इतर खाण्याचे पदार्थ इंग्लंडांत येण्याची अगदीं बंदीच झाल्यासारखें होतें. म्हणून १७६० पासून १७६४ पर्यंतच्या पांच सालांत धान्याची दर चौदाशेरी मणी सरासरी ३० शिल्लिंग धारण होती, ती पुढील पांच सालांत सरासरी ४५ शिल्लिंग झाली, आणि पुढें पन्नास वर्षें ती धारण झपाझप वाढत चालली होती. ज्या धारेकऱ्यांना पिकें उत्पन्न करण्याचे उत्तम मार्ग ठाऊक होते, त्यांची चंगळ होती, आणि प्रतिवर्षीं धान्य, क्लोव्हर (गवताची एक जात), शलगम, आणि इतर कंदमुळें, ह्यांचीं पिकें करण्यासाठीं पड जमिनीपैकीं अधिकाधिक जमीन आवाडें घालून कुडीत. १७६० आणि १७७४ ह्या दोहों सालांच्या दरम्यान आवाडांसंबंधी ७०० हून कमी नाहींत इतके आक्ट (कायदे) पसार झाले. ह्या का-

जमिनींना आवाडें पडतात, १७६०-१७७४.

यद्यांनीं कांहीं प्रकारांनीं हितच झालें, कारण त्या योगें जमिनीची मशागत पूर्वीपेक्षां चांगली होऊं लागली, आणि चांगले रस्ते होऊं लागले, त्यामुळें वाटमाऱ्या लुटारू लोकांचीं रहाळीचीं ठिकाणें किंवा बसण्याउठण्याचे अड्डे नाहींसे होऊन गेले. परंतु, दुसऱ्या पक्षीं, मजूर लोक एकादें घोडें किंवा गाय, ज्या पडसर जमिनीवर चरावयास पाठवीत ती पडसर जमीन उरली नाहीं; आणि त्यांना अन्नवस्त्राकरितां पूर्वीपेक्षां ज्यास्त मोल द्यावें लागे म्हणून, शंभर वर्षांमागें एकंदरीनें ते जितके खाऊनपिऊन सुखी असत तितके आतां सुखी नव्हते. श्रीमंत लोक जसजसे अधिकाधिक श्रीमंत होत जातात, तसतसे गरीब लोक अधिकाधिक गरीब होत जातात, ही जी मोठी अडचण आमच्या हालींच्या दिवसांपर्यंत वाढत आली आहे तिची सुरवात तेव्हांपासून झाली. जो **पूअर लॉ**, म्हणजे भिकाऱ्यांविषयीं कानू, **एलिझाबेथ** राणीच्या कारकीर्दीत फार उपयोगी झालेला होता (३२६ वें पृष्ठ पहा), तोच कानू ज्या उद्योगी लोकांना भिकाऱ्यांच्या पोषणार्थ कर द्यावा लागे त्यांना ह्या काळापासून ओझ्यासारखा जड वाटूं लागला.

दैन्य आणि भिकारी ह्यांची वृद्धि.

शेतकी हाच देशांतील मुख्य उद्योग होऊन राहिला नव्हता असें ज्या काळांत झालें तो काळ आतां आला. शिल्पानें नवीन नवीन पदार्थ तयार करविणारे लोक, खाणी खणविण्याचा उद्योग करणारे लोक, आणि उदीमधंदा करणारे लोक, ह्यांचे वर्ग आतां अमर्याद वाढले, आणि परकीयदेशसंबंधानें जकाती आणि व्यापारसंबंधी तह, आणि स्वदेशीं कर आणि पट्ट्या, ह्या गोष्टींसंबंधी प्रश्न, वाद, किंवा वाटाघाटी, केवळ श्रीमान् कारखानदार, व्यापारी, आणि शेतकरी, ह्यांसच महत्त्वाच्या वाटत होत्या असें नाहीं, तर कारखा-

ऱ्यांत किंवा दुकानांत खपणाऱ्या लोहार, सुतार, कोष्टी, करजगार वगैरे कसबी, आणि कारिगर ह्या लोकांनाही तशाच महत्त्वाच्या वाटूं लागल्या. आतां हे कर, जकाती, व्यापारसंबंधाचे तह, वगैरे गोष्टींचें नियमनकर्तें पार्लमेंट होतें. त्यांत, मुख्यत्वेंकरून मोठमोठे वतनदार, जमीनदार, व त्यांची ज्यांवर मेहेर नजर होई असे इतर लोक, होते. हे सर्व लोक, ज्या प्रजाजनांकरितां कायदे करीत, त्या प्रजाजनांनीं निवडलेले नसत हें पाहण्यांत आलेंच आहे. ह्या कारणानेंच ह्या कारकीर्दीत, कामन्सांनीं एकादा कायदा पसार केला म्हणजे, मोठीं मोठीं गाऱ्हाणीं आणि दंगे त्यामागून वारंवार होत, असें सतत पाहण्यांत येतें.

मध्यस्थित लोकवर्गाचें महत्त्व वाढतें.

तथापि पहिल्यानें मुख्य झगडा राजा आणि त्याचे प्रधान ह्यांच्या दरम्यानच होता. तिसरा जार्ज हा मी कुल मुखत्यार धनी होणार असा निश्चय करूनच गादीवर बसला. तो दुसऱ्या जार्जाचा नातू होता; त्याचा बाप फ्रेडरिक, प्रिन्स आफ वेल्स, हा १७५१त वारला. त्याची आई ही महत्त्वाकांक्षी जर्मन राजपुत्री होती. आपल्या पुत्रानें, सर्व अधिकार किंवा सत्ता पुनः आपल्या हातीं घ्यावी, आणि रयतेनें त्याला बापासारखें लेखावें अशी त्यानें करणी करावी, अशी तिला फार उत्कंठा होती. तिचें त्याला सतत म्हणणें असे, "बाळा जार्जा राजा हो," आणि आपल्या साठां वर्षांच्या दीर्घकालिक कारकीर्दीमध्यें त्यानें तिच्या उपदेशाला अनुसरून वागण्याविषयीं प्रयत्न केला. तो स्वभावानें साधा, नेकीचा, धर्मशील पुरुष असून, पति आणि पिता, ह्या दोहोंसंबंधांत मायाळू होता. त्याची राणी शार्लोट्ट, आणि त्या उभय-

तिसऱ्या जार्जाचे गुणदोष.

तांचीं पंधरा मुलें, ह्यांसहवर्तमान त्याचें निवांत गृहचरित्र, आणि वेडाचे किंवा उन्मत्त वायूचे त्याला दुःखकारक झटके येत त्यांत त्याचा सोशिकपणा, ह्या गोष्टींनीं त्यावर त्याच्या प्रजाजनांचें प्रेम आणि पूज्यबुद्धि जडली, आणि त्याच्याविषयीं, "प्रिय वृद्ध राजा जार्ज," असे वारंवार लोकांचे उद्गार निघत. परंतु इतके सर्व गुण असून दुर्दैवानें तो अनुदार किंवा संकुचित मनाचा, अज्ञान, दुराग्रही, आणि मनास येईल तसा वागणारा होता. म्हणून आपल्या इच्छेप्रमाणें अमल करण्याच्या त्याच्या निश्चयामुळें त्याच्या हातून मोठमोठ्या चुका झाल्या. त्याने लोकांच्या रीतिभाती पूर्वींहून निष्कलंक करून, धर्माविषयीं विशेष पूज्यबुद्धि उत्पन्न करून, आणि एकंदरीनें लोकांना विशेष स्वराजनिष्ठ करून, जरी इंग्लंडचें कल्याण केलें, तरी दुसऱ्या पक्षीं, त्याने पार्लमेंटावर विवेक किंवा तारतम्य न पाहतां बेधडक लांचरुषवतीनें सत्ता मिळविली, आयर्लंडाला सर्वथा न्याय देण्याच्या कामीं अडथळा केला, गुलामांच्या व्यापाराला पाठबळ दिलें, आणि अमेरिकेंतील वसविलेल्या राज्यशाखा गमावल्या.

टोरीपक्षाचें ब्यूटच्या अमलाखालीं पुनरुज्जीवन होतें.

पूर्वी पाहण्यांत आलेंच आहे कीं, गादीवर बसतांच जी पहिली गोष्ट त्यानें केली ती ही कीं, फ्रान्स देशाशीं तह करतां यावा म्हणून पिट्ट ह्याला कामावरून काढून, आपला शिक्षक, लार्ड ब्यूट, ह्याला मुख्य प्रधान केलें. युद्ध त्याला आवडत नव्हतें ह्या कारणानें त्यानें हें कृत्य केलें असेंच केवळ नाहीं; स्वदेशीं व्हुइग्स लोकांचें प्राबल्य होतें तें मोडण्याला त्याला मोकळीक पाहिजे होती म्हणून त्यानें तें केलें. टोरिझ लोकांनीं स्टयूअर्ट वंशीय राजे परत येतील ही आशा आतां सर्वथैव सोडली होती,

आणि ते जन्मानें खरा **इंग्लिश** अशा राजाचा पुरस्कार करण्याला राजी होते. म्हणून **तिसऱ्या जार्जानें** "राजाचे दोस्त" ह्या नांवानें प्रसिद्धीस आलेला पक्ष बनविण्याच्या कामीं, पदव्या आणि सरकारी हुद्दे देण्याचा त्याला अधिकार होता त्याचा उपयोग केला. **हेन्री फॉक्स** ह्या नांवाचा हुशार, परंतु, कसलेंही बरें वाईट काम करण्याला निःशंक असा एक मुतसद्दी पुरुष होता, तो **ब्यूट** ह्याचा साथी झालेला होता. त्यानें **फ्रान्सशीं** तह करण्यास संमति देण्याला राजी असा मी **कामन्सांच्या** सभेंत बहुपक्ष मिळवितों, म्हणून वचन दिलें. तें वचन त्यानें शेवटास नेलें. १७६२त ८२००० पौंडांहून कमी नाहीं इतकी रकम, सरकारच्या गुप्त खात्याच्या कामगिरीच्या खर्चाबद्दल म्हणून **पार्लमेंटानें** ठरवून दिलेल्या पैशापैकीं, लांच देण्याच्या कामीं खर्च झाली; 'आणि **पिट्ट** ह्यानें कानझाडण्या केल्या तथापि, त्या न जुमानून **पार्लमेंटांत** त्या तहाविषयीं ठराव, बहुमतानें, म्हणजे ३१९ अनुकूल, आणि ६५ प्रतिकूल, मतें पडून पसार झाला.

अर्से असतांही, **लार्ड ब्यूट** ह्यानें आपला अधिकार फार दिवस उपभोगला नाहीं. तो जातीनें **स्काच** होता, आणि १७४५ तील बंडापासून **इंग्लिशांचा**, **स्काच** लोक **जाकोबाइट्स** आहेत, अशा समजानें त्यांवरील विश्वास अगदीं उडाला होता.

लांचरुषवत आणि अन्याय; ब्यूट राजीनामा देतो.

शिवाय, **ब्यूट** हा राजाच्या आईच्या मर्जीतला होता, ती गोष्ट लोकांना आवडली नाहीं. **व्हुइग्सांनीं** (व्हुइग प्रधानांनीं) नेमलेले सरकारी नौकर, कारकून आणि जकातदार देखील, त्या **ब्यूटानें** काढून टाकले, आणि आपल नांवाच्या फळापासून केलेल्या दारूवर लोकांना अत्यंत अप्रिय असा त्यानें कर

बसविला. फार दिवसांपासून, तो पणांच्या कुस्त्या करणारे असे पहिलवान लोक ह्यांचा आपल्या शरीररक्षणासाठीं पहारा बरोबर घेऊन रस्त्यांतून जातयेत असे, आणि शेवटीं लोकांच्या अप्रीतीनें त्याला इतकी दहशत पडूं लागली कीं, त्यानें राजीनामा दिला.

त्याच्या पुढला मुख्य प्रधान जार्ज ग्रेन्व्हिल्ल नांवाचा एक व्हुइग होता. परंतु त्यानें ब्यूटाहून फारसें यश मिळविलें नाहीं, आणि त्यावर दाब ठेवणें सोपें नव्हतें असें राजाला कळून आलें. तो प्रामाणिक आणि नेकीचा होता, तरी इंग्लंडांत आणि अमेरिकेंत त्याच्या हातून अपकार किंवा नुकसानी झाली. त्याला पहिलीच अडचण आली ती त्याच्याच दोषानें आली असें क्वचित् म्हणवेल. पार्लमेंट तकूब करतांना राजानें केलेल्या भाषणावर नार्थ ब्रिटन नांवाच्या वर्तमानपत्राच्या ४५ व्या अंकांत मोठ्या आवेशानें कडक टीका केली होती. तें वर्तमान पत्र वुइल्क्स नांवाचा एक योग्यताहीन परंतु लोकप्रिय गृहस्थ चालवीत असे. तो ऐल्स्बरी गांवचा पार्लमेंटांत प्रतिनिधि होता. तेव्हां ग्रेन्व्हिल्लानें "त्या वर्तमानपत्राचे कर्ते, छापणारे, आणि प्रकाशक किंवा प्रसिद्धि करणारे" ह्यांना पकडून कैदकरण्याविषयीं एक मोघम, म्हणजे अमुक अमुक नांवांचे अमुक इतके लोक असें आंत लिहिलेलें नव्हतें असें वारंट, म्हणजे अधिकारपत्र, दिलें, आणि त्या वारंटाच्या आधारें वुइल्क्स ह्याला अठ्ठेचाळीस इतर लोकांसह पकडून तुरुंगांत टाकलें. वुइल्क्सानें हेबियस कॉर्पस (शरीर हाजीर कर) ह्या नांवाच्या आक्टाच्या (कायद्याच्या) आधारें लवकरच आपली कैदेंतून सुटका करून घेतली, आणि पार्लमेंटाच्या सभासदाला पकडून अटकेंत ठेवलें, व ज्या

ग्रेन्व्हिल्लचा राज्यकारभार, १७६३.

मनुष्यांस पकडावयाचें त्यांचीं नांवें आंत लिहिलेलीं नव्हतीं असें मोघम वारंट काढलें, ह्या दोन गोष्टी केल्याबद्दल त्यानें सरकारावर खटला उपस्थित केला. त्या खटल्याचा निकाल त्याच्या वतीं झाला. परंतु पार्लमेंटानें त्यावर निंदालेख लिहिल्याबद्दल खटला उभा केला, तेव्हां त्या संबंधानें मोठमोठे दंगे झाले. लोक "वुइल्क्स आणि स्वातंत्र्य" हे शब्द उच्चारून आरोळ्या ठोकूं लागले, आणि राजा आणि त्याची मातुश्री ह्या उभयतांविरुद्ध इतके पुष्कळ अपवादपर किंवा निंदापर लेख छापून प्रसिद्ध झाले कीं, २०० छापखानेवाल्या लोकांवर फिर्यादी करून खटले केले. वुइल्क्स हा एका द्वंद्वयुद्धांत जखम लागून घायाळ झाला, आणि त्याला पार्लमेंटानें न्यायरक्षणबाह्य केल्यामुळें तो समुद्र ओलांडून फ्रान्स देशीं गेला. त्या वेळेपासून मोघम वारंटें अशीं कधींही निघालीं नाहींत.

वुइल्क्सला धरून अटकावांत ठेवलें, आणि जनरल (मोघम) वारंटें.

हा झगडा संपतो तोंच ग्रेन्व्हिल्लानें दुसरी एक चूक केली, तीपासून अमेरिकेंतील वसविलेल्या राज्यशाखांशीं कलहाची सुरवात झाली. फार दिवसांपासून त्या राज्यशाखांतील लोकांनीं वस्तुत: आपला आपणच राज्यकारभार चालविला होता कारण इंग्लंडांतील प्रधान त्यांकडे फारच थोडें लक्ष्य देत. परंतु जशी त्या काळची एक नर्मोक्ति (खुबीचें भाषण) आहे तीप्रमाणें, "अमेरिकेहून सरकारी कामासंबंधीं गुजरत येणारीं पत्रें ग्रेन्व्हिल्ल वाची म्हणून त्यानें अमेरिका गमावली." त्या राज्यशाखांनीं व्यापार करणें तो फक्त इंग्लंडाशीं करावा अन्य देशांशीं करूं नये असा एक मूर्खपणाचा कायदा

अमेरिकेंतील वसविलेल्या राज्यशाखांशीं कलह सुरू होतो.

होता, त्याची फार दिवसांपासून त्यांनीं टाळाटाळ मांडली होती, आणि त्यांतील लोक स्पानिश (स्पेन देशच्या ताब्यांतील) अमेरिकेंतील मुलुखाशीं व्यापार करून मनस्वी द्रव्य मिळवीत. ग्रेन्व्हिलानें हा व्यापार बंद करण्याचा निश्चय केला, आणि मागल्या अमेरिकेंतील युद्धामुळें फार खर्च झालेला होता म्हणून, त्यानें, त्याच वेळीं, इंग्लंडांतल्या वहिवाटीप्रमाणें व्यवहारांतील कामकाजाप्रकरणीं कागदांवर सरकारी छाप टिकीट किंवा शिक्का अवश्य असलाच पाहिजे असा निर्बंध करणारा "स्टांप आक्ट" नांवाचा कायदा करून द्रव्य उत्पन्न करावें, असा उहू काढला. तें ऐकून त्या राज्यशाखांतील लोकांना फारच तैष आला. त्यांच्या हितासाठीं केलेल्या युद्धाच्या खर्चाचा बेवारा करण्याच्या कामीं त्यांनीं अवश्य मदत केली पाहिजे होती ही गोष्ट अगदीं रास्त होती खरी, परंतु आपणांवर कर बसविणें ते आपल्या संमतीनेंच बसविले पाहिजेत अशी त्यांना संवई झालेली होती, आणि त्यांचा त्यांना वसूल करूं दिला असता तर राजीपणानें त्यांनीं तो युद्धाचा खर्च दिलाही असता. असो, तेव्हां त्यांनीं त्या स्टांप आक्टाविरुद्ध अर्ज केला असतांही तो आक्ट १७६५ त पसार झाला. त्याचा परिणाम असा झाला कीं, व्हर्जिनिया नांवाच्या संस्थानानें प्रथम उदाहरण दाखविलें किंवा कित्ता घातला त्याला अनुसरून, अमेरिकन्सांनीं इंग्लंडापासून कसलाही माल विकत घ्यावयाचा नाहीं अशी आणभाक केली, त्यामुळें इंग्लंडांतील माल तयार करण्याचे कितीएक कारखाने बुडाले.

स्टांप आक्ट, १७६५.

ह्याच वेळीं राजाला उन्मत्तवायूचा किंवा वेडाचा पहिलाच ल्हानसा झटका आला. त्यापासून तो बरा झाला तेव्हां, मी पुनः

असाच वायूनें बीमार झालों तर राज्यकारभार चालविण्याकरितां कोणी तरी माझा प्रतिनिधि योजिला पाहिजे ह्यास्तव, राजप्रतिनिधि नेमण्याविषयीं आक्टाचा मसुदा तयार करून तो पसार करविला पाहिजे अशी त्यानें आज्ञा केली. तीप्रमाणें मसुदा तयार केला त्यांत राजाच्या मातुश्रीचें नांव गाळलें. त्यामुळें तो इतका नाखुश झाला कीं, ग्रेन्व्हिल्लाला राजीनामा देणें भाग पडलें. नंतर लार्ड रॉकिंग्हम ह्याला मुख्य प्रधान नेमलें. त्या नव्या प्रधानानें अमेरिकन्स लोकांच्या डोळ्यांत सलत असलेला तो स्टांप आक्ट रद्द करण्याचा निश्चय केला, आणि पिट्ट हा बीमार होता तरी, पार्लेमेंटच्या सभेला येऊन त्यानें भाषण केलें त्यांत आग्रह धरला कीं, "आपणांवर कर बसविले जातात ते रास्त किंवा गैररास्त हें पाहण्याला "त्या वसविलेल्या राज्यशाखांतील लोकांचे "पार्लेमेंटांत प्रतिनिधि नाहींत, ह्यास्तव "इंग्लंडाला त्यांवर कर बसविण्याला बिलकूल हक्क नाहीं," म्हणून तो स्टांप आक्ट "अटींवांचून, तमाम, आणि लागलाच, रद्द केलाच पाहिजे." त्याप्रमाणें तो आक्ट रद्द केला, आणि राजानें, ग्राफटनचा ड्यूक ह्याला मुख्य प्रधान करून नवें प्रधानमंडल केलें, त्यांत एका प्रधानाची जागा पत्करून मिळण्याविषयीं पिट्ट ह्याला आग्रह केला.

राजप्रतिनिधि नेमण्याविषयीं कायद्याचा मसुदा.

पार्लेमेंटांत प्रतिनिधि असणें आणि कर बसविणें. स्टांप आक्ट रद्द होतो, १७६६.

पिट्ट त्या प्रधानमंडलांत राजाज्ञेला अनुसरून मिळाला. परंतु त्याचें जुनें वजन आतां राहिलें नव्हतें. चाथमचा अर्ल हा किताब राजानें त्याला दिला तो स्वीकारून तो बडा लोक झाला,

त्यामुळें त्याला **हौस आफ् लार्ड्स**मध्यें सभासद होऊन बसणें प्राप्त झालें. “**प्रतापी कॉमोनर**” (सामान्य वर्गांतील माणूस) असें लोक त्याला म्हणत, तो **कॉमोनर** तो आतां राहिला नाहीं, तशांत बीमारीमुळें त्याच्यानें सरकारी कामाकडे लक्ष्यही देववत नसे. **टाउन्शेंड** नांवाचा त्या समयीं **एक्स्चेकर**चा (जमाबंदीच्या कचेरीचा) **चान्सेलर** (पंडितराव) होता, त्याला तो स्टांप आक्ट रद्द करण्यांत **पार्लमेंटा**नें नबळेपणा केला असें

टाउन्शेंडचा रेव्हेन्यू आक्ट, म्हणजे महसुलाच्या खात्याकडील कायदा, १७६७.

वाटलें, म्हणून, **पिट्ट** हा **लार्डसां**च्या सभेंतून गैरहाजीर असतां, चहा, कांच, शेंदूर, सफेता, चितान्याचे रंग, आणि कागद, हे जिन्नस बाहेरून **अमेरिकें**त जातील त्यांवर कर बसविण्यासाठीं एक नवीन रेव्हिन्यू (महसुलाच्या खात्याकडील) **आक्ट** त्या **टाउन्शेंडा**नें खराच पसार करविला. त्यायोगें मागली खवंडाळी पुनः जारी झाली.

तथापि त्या वसविलेल्या राज्यशाखांतील लोकांची आपल्या मूळच्या जुन्या देशावर भक्ति किंवा प्रीति होती, म्हणून अद्यापि कांहीं दंगा वगैरे उसळला नाहीं. **इंग्लंडां**तीलच लोकांच्या संबंधानें **हौस आफ् कॉमन्स** हें लागलेंच पुढें अडचणींत पडलें.

वुइल्क्सला मिडल्सेक्सचा प्रतिनिधि निवडलें, १७६९.

१७६९ त **वुइल्क्स** हा परदेशाहून माघारा आला, तेव्हां **मिडल्सेक्स** ह्या कौंटींतील निवडणूक करणारे लोक पुष्कळ इतर स्थलांतील निवडणूक करणाऱ्या लोकांहून स्वतंत्र होते त्यांनीं त्याला **मिडल्सेक्स**चा प्रतिनिधि किंवा सभासद निवडलें. ह्या कृत्यानें राजाला इतका त्रास वाटला कीं, त्यानें प्रधानमंडलाला त्या कामांत हात घालण्याला आग्रह केला, आणि

कांहीं वर्षांपूर्वी ज्या अपवाद–लेखाबद्दल **वुइल्क्सला फ्रान्स देशीं** पळून जावें लागलें होतें, त्याच अपवाद–लेखाबद्दल त्याला पकडून कैदेंत टाकलें. इतक्यांत **लंडन** शहरांत भयंकर दंगे उसळले. बंडाळ लोकांनीं, **वुइल्क्स**च्या झालेल्या निवडणुकीबद्दल उत्सव करण्या-साठीं, प्रत्येक माणसाकडून जबरीनें दोनरात्रीं आपआपल्या खिडक्यां-तून दिवे लावविले. **आस्ट्रियाच्या** राजाकडील वकीलाला, त्याच्या गाडींतून खालीं खेंचून काढून त्याच्या जोड्यांच्या तळांवर नंबर ४५ (वुइल्क्सच्या नार्थब्रिटन नांवाच्या वर्तमानपत्राच्या ४५ व्या अंकांत कडक टीका केली होती तो ४५ वा अंक) हीं अक्षरें खडूनें लिहिलीं, आणि **किंग्स बेन्च प्रिझन** ह्या नांवाच्या तुरुंगांत **वुइल्क्स**ला कैदेंत ठेवलेलें होतें, त्या तुरुंगावर असा आवेशानें हल्ला केला कीं, **रायट आक्ट** नांवाचा दंग्यासंबंधी कायदा प्र-सिद्ध रीतीनें वाचला, आणि कित्येक माणसांना गोळ्या घालून ठार मारलें. इतका प्रकार झाला तरी, **हौस आफ् कामन्स** ह्यांनीं **वुइल्क्स पार्लमेंटां**त बसण्याच्या लायकीचा नाहीं असें ठरविलें; आणि ही ताकीद न जुमानून जेव्हां लागोपाठ एकसारख्या चार वेळां त्याची निवडणूक झाली, तेव्हां त्यांनीं, जें करण्याचा त्यांना अधिकार नव्हता, तें केलें ही चूक केली. त्या **वुइल्क्सचा कर्नेल लट्रेल** नांवाचा प्रतिस्पर्धी उमेदवार होता त्याला, **वुइल्क्सा**च्या वर्ती पडलेल्या ११४३ मतांविरुद्ध, फक्त २९६ मतें पडलीं असतांही त्याची निव-डणूक झाली असें त्यांनीं ठरविलें. हा निव-डणूक करणाऱ्या लोकांच्या हक्कांचा धडध-डित अतिक्रम किंवा विच्छेद होता, कारण जर **पार्लमेंटच** आपले सभासद निवडूं लागलें तर राष्ट्रांतील लोकांना

सभासद निवडण्याचा अधिकार असलेल्या लो-कांच्या हक्कांचा पार्लमेंट अतिक्रम किंवा विच्छेद करतें.

आपले कायदे करण्यांत संमति देण्याचा म्हणून बिलकूल अधिकार उरणार नाहीं. लोकांना ह्या गोष्टीपासून इतकी चिरड आली कीं, राजा पार्लमेंटची ती बैठक समाप्त करण्यासाठीं गेला, तेव्हां त्यांनीं त्याचा अपमान केला; आणि जेव्हां १७७० च्या एप्रिल महिन्यांत वुइल्क्स कैदेंतून सुटून तुरुंगाबाहेर आला तेव्हां "लिबर्टि" (स्वातंत्र्य) हा शब्द तीन फुटी उंच अशा अक्षरांनीं लिहिलेला मान्शन हौस (लंडनचा लार्ड मेयर म्हणजे कोतवाल ह्याचा अधिकारपरत्वें राहण्याचा वाडा) ह्या नांवाच्या वाड्याच्या पुढल्या तोंडावर झळकत होता, आणि वुइल्क्सला त्या शहरचा आल्डर्मेन (सनदी गांवाचा एक अधिकारी) निवडून नेमलें.

पुढल्या वर्षी, म्हणजे १७७१ च्या फेब्रुअरींत, हौस आफ् कामन्स ह्यांची लोकांशीं दुसरी एक झटापट झाली, तींत वुइल्क्स आणि लोक ह्यांचा जय झाला. १६९५ त मुद्रणस्वातंत्र्य प्रथम दिलें तेव्हांपासून, वर्तमानपत्रांची संख्या अधिकाधिक वाढत आली. एकट्या लंडन शहरांत सतरा वर्तमानपत्रें छापून प्रसिद्ध होत असत; आणि हौस आफ् कामन्स ह्यांच्या चाललेल्या कामाची हकीकत छापून प्रसिद्ध करणें हें त्यांच्या एका "जागत्या किंवा चालत्या" हुकुमाविरुद्ध होतें, तरी पार्लमेंटांत होणाऱ्या महत्वाच्या भाषणांतून बहुतेक भाषणें पुष्कळ वर्तमानपत्रांतून नेमानें छापून प्रसिद्ध होत. त्या हौसांत (सभेंत) वर्तमानपत्रांचे बातमीदार ह्यांना जाण्याची मनाई होती, तीमुळें वर्तमानपत्रांत छापलेल्या हकीकती, अर्थात्, अयथातथ्य किंवा चुकीच्या आणि एकतरफी असत, आणि वारंवार सभासदांना अपमानकारक देखील असत. ह्यास्तव कामन्सांनीं त्या

पार्लमेंटांत चाललेल्या कामाची हकीकत छापणें, १७७१.

हकीकती बंद करण्याचा निश्चय केला, आणि त्यांचा **स्पीकर**, म्हणजे अध्यक्ष, ह्यानें त्या हकीकती छापून प्रसिद्ध करण्याच्या अपराधाबद्दल आठ छापखानेवाल्यांना कैदकरण्याचा हुकूम केला. त्यांपैकीं दोघां छापखानेवाल्यांनीं कोडतांत कायदेशीर प्रकारानें अपील केलें. तेव्हां त्यांच्या चौकशीकरितां त्यांना **वुइल्क्स** आणि **आलिव्हर** नांवाचा दुसरा एक **आल्डर्मन** ह्यांच्यापुढें नेलें. त्यांनीं, कायद्यांत सांगितलेल्या गुन्ह्यांपैकीं कोणताही गुन्हा त्या छापखानेवाल्यांनीं केला नव्हता म्हणून, त्यांना सोडून दिलें. त्या आठांपैकीं दुसरा एक **मार्टिन** नांवाचा त्या शहरचा **लिव्हरिमन** (हक्कदार, स्वतंत्र, आणि एका विशेष प्रकारचा पोशाक करणारा माणूस) होता, त्यानें तर त्याला पकडण्याकरितां वारंट घेऊन आलेल्या **स्पीकराच्या** शिपायालाच कैदकरविलें, कारण त्या वारंटावर शहरच्या माजिस्त्रेटाची सही नव्हती.

ह्या कृत्यांनीं तें शहर आणि **हौस आफ् कामन्स** ह्यांच्या दरम्यान एक आवेशाचा कलह मातला, त्यांत शहरचा **लार्ड मेयर** (कोतवाल) आणि तो **आलिव्हर** ह्या उभयतांना **टौअर**मध्यें कैदेंत ठेवण्यासाठीं पाठविलें. ते **टौअर**मध्यें चालले असतां त्यांचा जयजयकार करण्यासाठीं लोकांची एकच गर्दी जमली, आणि पुढें सहा आठवड्यांनीं त्यांना कैदेंतून सोडलें तेव्हां, साऱ्या **लंडन** शहरभर दीपोत्सव झाला. दरम्यानच्या वेळांत ते आठ छापखानेवाले कैदेंत न जातां खुलेच राहिले होते. त्यांनीं ती लढाई जितली, कारण **त्या वेळेपासून पार्लमेंटांत चाललेल्या कामाची हकीकत नेमानें वर्तमानपत्रांतून छापून प्रसिद्ध होते, आणि कोणीही त्या गोष्टीला आडवा आला नाहीं.** असो, ह्या झगड्याचा परि-

शहर आणि पार्लमेंट.

णाम असा झाला कीं पूर्वीहून चांगलीं वर्तमानपत्रें लवकरच निघूं लागलीं. १७७० त **धि मार्निंग क्रॉनिकल** नांवाचें वर्तमानपत्र पहिल्यानें छापून प्रसिद्ध होऊं लागलें, **धि मार्निंग पोस्ट** हें १७७२ त निघूं लागलें, आणि **धि टाइम्स** हें १७८५ त पहिल्यानें एका लहानशा चौरस तावाएवढें निघूं लागलें. १७७४ त **वुइल्क्स** ह्याला **मिडल्सेक्स**चा प्रतिनिधि पुनः निवडून नेमलें, तेव्हां त्याला **पार्लमेंटां**त बसण्याची परवानगी दिली; आणि १७८२ त **काम-न्सांनीं, कर्नल लट्रेल** ह्याच्यासाठीं निवडणुकीच्या कामांत आपण हात घातला हें गैर केलें, असें कबूल केलें, आणि त्यांनीं आपल्या दिनवृत्तांतून किंवा रोजनाम्यांतून तत्संबंधी हकीकत काढून टाकविली.

अर्वाचीनकाळचीं वर्तमानपत्रें.

ह्या सर्व कालावधींत, **अमेरिकें**तील तळमळ किंवा चळवळ बळकट वाढत होती. १७७० त **लार्ड नार्थ** हा मुख्य प्रधान झाला, आणि तो राजाची इच्छा होईल तसें हुबहू करण्याला राजी होता. आतां राजाच्या धूळभेटीबद्दल दरबारें होऊं लागलीं, त्यांत त्याची कृपा संपादन करण्याविषयीं झटणाऱ्या लोकांची गर्दी होऊं लागली, आणि **जार्जा**ला "मी शेवटीं खरा राजा झालों" असें वाटूं लागलें. **अमेरिकें**तील राज्यशाखांतील लोकांचा मुखत्यार धनी होईनच होईन असा त्याचा अधिकच दृढनिश्चय झाला, आणि ह्या गोष्टीला **पार्लमेंट** आणि लोक ह्यांचें पुरें अनुमोदन होतें. **इंग्लिश** लोक त्या राज्यशाखा आमच्या उपयोगाकरितां आहेत असें नेहमी मानीत असत, आणि ज्या माणसांनीं नवीं घरें दारें करण्यासाठीं वनवास हाल आणि उपास

अमेरिकेंतील वसविलेल्या राज्यशाखांतील तळमळ किंवा चळवळ वाढते, १७७०.

तहान ह्यांच्याशीं टक्कर मारली, त्यांना त्यांच्या श्रमाचें फल पहिल्यानें मिळणें योग्य होतें, ही गोष्ट ते **इंग्लिश** लोक विसरले होते. एकादा पुत्र उमरीनें मोठा झाला म्हणजे त्याला आपल्या प्रपंचाची हवीतशी व्यवस्था करण्याचा हक्क येतो, त्यासारखी आतां **अमेरिकेची** स्थिति झालेली होती, ही गोष्ट **लार्ड चाथम** आणि **आयर्लंडां**तील वक्ता **बर्क** ह्यांसारख्या महान् पुरुषांच्या मात्र ध्यानीं आलेली होती. १७७० त **लार्ड नार्थ** ह्यानें चहाखेरीज इतर सर्व जिन्नसांवरील कर काढून टाकले, आणि चहावरील कराचें उत्पन्न दरसाल ३०० पौंडांहून थोडेंच जास्त येत असतांही, राजानें तो कर तसाच ठेवण्याचा निश्चय केला. तथापि ज्या दिवशीं **लंडनां**त हा ठराव झाला, त्याच दिवशीं **बॉस्टन** शहरांत तेथील सरकारी शिपाई आणि त्या नगरांत राहणारे लोक ह्यांच्या दरम्यान कलह होऊन दंगा झाला होता, त्यांत कांहीं नगरवासी लोक ठार मारले गेले होते. ही खबर **इंग्लंडांत** पोहोंचली तेव्हां, त्या राज्यशास्त्रांतील लोकांना निष्कारण चिडविण्याचा हा योग्य काळ नव्हता, ही गोष्ट कोणाही विचारी किंवा शाहण्या माणसाच्या सहज लक्ष्यांत आली असती.

असें असतांही, अद्यापि आणखी तीन वर्षें भडाका न उडतां लोटलीं. **अमेरिकन्स** लोकांनीं चहा विकत घेण्याविषयीं एकसारखा नकार धरला, आणि शेवटीं तो चहाचा व्यापार गमावल्यामुळें **ईस्ट इंडिया कंपनीचें** फार नुकसान झालें. म्हणून **लार्ड नार्थ** ह्यानें **इंग्लंडांतून अमेरिकेंत** जाणाऱ्या सर्व चहावरील **इंग्लंडांत** घेत असत ती जकात किंवा कर काढून टाकला, परंतु तोच चहा **अमेरिकेंत** पावल्यावर तेथें त्यावर कर किंवा जकात घेत ती पूर्वींप्रमाणेंच ठेवली. ह्या गोष्टीचा परिणाम असा

झाला कीं, **ईस्ट इंडिया कंपनीनें** आपला चहा जुलुमानें **अमेरि-केंत** घुसविण्याचा प्रयत्न केला, आणि १७७३ त डिसेंबरच्या **१६** व्या तारिखेस, **मासाचूसेट्स** संस्थानांतील **बॉस्टन** बंदरांत चहाचें मोठें भरताड जाऊन पोहोंचलें. त्या राज्यशाखेंत राहणाऱ्या लोकांनीं तो चहा आंत येऊं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला,

बॉस्टन एथील बंदरांत चहा मारा लकटून देतात, १७७३.

आणि तीं चहाची जहाजें त्या बंदरांत शिरूं लागतांच **रेड इंडियन्सां**चा कपटवेष केलेल्या माणसांच्या एका टोळीनें त्या जहाजांवर उड्या घातल्या, आपल्या कुऱ्हाडींनी चहाच्या पेट्या फोडल्या, आणि त्यांतील सारा चहा समुद्राच्या पाण्यांत ओतून टाकून त्या रित्या केल्या. ह्या गुन्ह्याबद्दल सजा करण्यासाठीं १७७४ त **लार्ड नार्थ** ह्यानें तें **बॉस्टन** बंदरच बंद करण्याकरितां एका **आक्टा**चा मसुदा पसार केला, आणि त्या योगें त्या शहराशीं समुद्रावरून चालणारा सारा व्यापार बंद करून टाकला; आणि **मासाचूसेट्स** संस्थानाची सनद रद्द करून तेथील राज्यकारभार चालविण्यासाठीं राजानें निवडलेलें **कौन्सिल** नेमण्याकरितां, दुसऱ्या एका **आक्टा**चा मसुदा **लार्ड नार्थ** ह्यानेच पसार करविला.

ह्या वेळेपासून युद्ध तर खास होणार असें चिन्ह दिसूं लागलें, तथापि आणखी एक वर्षपर्यंत तें सुरू झालें नाहीं. त्या समयीं **फ्रान्क्लिन** नांवाचा एक तत्त्वमीमांसक आणि


अमेरिकेंत पहिली कान्ग्रेस्स (प्रतिनिधि मंडल) भरतें, १७७४.

राजनीतिविशारद **अमेरिकन** गृहस्थ यत्न करून हा बखेडा मोडावा म्हणून **इंग्लंडांत** आलेला होता, तो देखील निरुत्साह होऊन स्वदेशीं माघारा गेला. १७७४ च्या सेप्टेंबरांत तेरा राज्यशाखां-

पैकीं **जॉर्जिया** नांवाच्या राज्यशाखेखेरीज बाकीच्या राज्यशाखांतून पंचावन्न निवडलेल्या प्रतिनिधींचें कौन्सिल (मंडळ) **फिलाडेल्फिया** एथें भरलें, आणि त्यांनीं **मासाचूसेट्स** संस्थानाचे हक्क त्या संस्थानाला परत मिळत तोंपर्यंत **ग्रेट ब्रिटनाशीं** व्यापार अगदीं बंद करावा असा ठराव केला. त्याच वेळीं त्यांनीं, लढण्याचा प्रसंग येईल तर फौजेची गरज लागेल म्हणून, अमलदार लोक नेमून शिबंदी तयार करण्याची व्यवस्था केली. इतकें झालें तरी राजा आपला हेका सोडीना. **पार्लमेंटानें** १७७५ त **मासाचूसेट्स** संस्थानांत बंड झालें आहे असें उघड ठरविलें, आणि **जनरल गेज** नांवाचा **गव्हर्नर** झाला नवीन तजविजी अमलांत आणण्याकरितां पाठविलें होतें, त्यानें जेव्हां एप्रिलच्या १९ व्या तारिखस **बॉस्टन** नजीक **लेक्सिंग्टन** एथें (सातव्या नंबरचा नकाशा पहा) त्या राज्यशाखांतील लोकांचें हत्यारांचें कोठार होतें त्याचा नाश करण्यासाठीं कांहीं शिपाई पाठविले, तेव्हां प्रथम रक्तपात झाला. त्या राज्यशाखांतील शेतकरी, आणि सुतार, लोहार वगैरे कारिगर, ह्यांनीं झगडा होणार म्हणून फार दिवसांपासून भाकीत केलेलेंच होतें, ते लोक तयार होते. त्यांपैकीं निश्चयी लोकांची एक लहानशी टोळी, **कॉन्कॉर्ड** नांवाच्या नदीजवळ एक लहान टेंकडी होती तीवर जमली, तिनें त्या शिपायांच्या तुकडीला गांठून माघारें पिटून लावलें. ह्या चकमकीच्या जागीं १८३६त एक स्मारक छत्री बांधली, तिजवर, **एमर्सन** नांवाच्या एका **अमेरिकन** कवीनें एक **कॉन्कॉर्ड हिम्न** नांवाचें गीत रचलेलें आहे, त्याचें पहिलें पद्य कोरलेलें आहे, तें पुढील अर्थाचें आहे.

युद्धाला आरंभ होतो, तारीख १९ एप्रिल, १७७५.

नकाशा नं. ७



उत्तर अमेरिकेंतील
वसविलेल्या राज्यशाखा
स्वातंत्र्याविषयीं जाहीरनामा लागला
त्या वेळच्या.
स्टाट्यूट माइल्स.
नोव्हास्कोशिया
सेबलबेट
अटलांटिक
महासागर
सेंटलॉरेन्स नदी
सेन्टजॉन्स
केपब्रिटन
लुइसबर्ग
बास्टन
कपकाड
व्हर्जिनिया
नॉर्थ कारोलाइना
साउथ करसोलाइना
जॉर्जिया
मिसिसिपी न.
मिसूरी न.
ओहैओ नदी
पिट्सबर्ग
फिलाडेल्फिया
डेलावेर
अनापोलिस
बाल्टिमोर
मार्कटाउन
चेसापीकबे
पिटर्सबर्ग
केप हाटेरास
न्यूबर्न
विलमिंग्टन
कामडेन
चार्लस्टन
सव्हाना
नाचिटोशेस
मेक्सीकोचें अखात
मिसिसिप्पीचें मुख
सेन्ट आगस्टिन
बर्म्यूडा बेटें
१००
९०
८०
७०
६०
५०
४०
३०

त्या नदीवर कमानीचा धोबड पूल आहे
त्याच्या बाजूस त्यांचा बावटा एप्रिलांतील
वाऱ्याच्या झुळकीवर मोकळा सोडला होता.
एथें एका वेळीं ते शेतकरी शिपाई रांगेनें
उभे राहिले, आणि ज्याचा प्रतिध्वनि
सर्व दुनियेभर ऐकूं गेला असा गोळ्यांचा
भडिमार त्यांनीं केला.

पुढील आठ वर्षें **इंग्लिशांची** फौज आणि त्या राज्यशाखांतील लोक **अमेरिकेंत** एकामेकाशीं लढत होते. **कॉन्कॉर्ड** एथील लढाईनंतर एका महिन्यानें, **कान्ग्रेस्सनें**, **व्हर्जिनियांतील** ज्या **जार्ज वाशिंग्टनानें** १७५८ त **पिट्ट्सबर्ग** घेतलेलें होतें (५८६ वें पृष्ठ पहा), त्याच **वाशिंग्टनाला कमान्डर-इन्-चीफ** (मुख्य सेनापति) केलें. त्यानें त्या वेळेपासून पुढें क्लेश आणि उपासतहान ह्यांना टक्कर दिली, तो जय झाला असतां जसा, तसाच पराभव झाला असतांही शांत राहून जातीवर भरवसा ठेवून असे, आणि त्यानें आपल्या सैन्याच्या कल्याणासाठीं आणि आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं इतर हरएक गोष्टींवर पाणी सोडलें. तो "युद्धांत पहिला, स्वस्थतेंत पहिला, "आणि आपल्या देशबांधवांच्या अंतःकरणांत पहिला," असा असून आपल्या देशाची **इंग्लंडाशीं** सांगड काईम राहणें अशक्य होई तोंपर्यंत तो तिला बिलगून राहिला होता, आणि तो १७८९ त स्वतंत्र **युनायटेड स्टेट्स** (संयुक्त संस्थानें) ह्यांचा पहिला **प्रेसिडेन्ट** (अध्यक्ष) झाला.

जार्ज वाशिंग्टन.

युद्धाला आरंभ झाला होता तरी, **संयुक्त संस्थानें** स्वतंत्र

होण्याचा काळ अझून फार दूर होता. **वाशिंग्टन** फौजेंत जाऊन पोहोंचण्यापूर्वी **बॉस्टन** नजीक **बंकर्स हिल्ल** ह्या नांवाच्या टेंकडीवरील लढाई होऊन गेलेली होती. तींत **कालोनिस्ट्स,** म्हणजे राज्यशाखांतील लोक, ह्यांचा पराजय तर झाला खरा, तथापि "**यांकीझ** (यूरोपांतील सांकेतिक भाषेंत **युनायटेड् स्टेट्स**मधील लोकांना **यांकीझ** असें म्हणतात, हें कांहींसें निंदापर नांव आहे) हे भित्रे नव्हते" ही गोष्ट त्या **कालोनिस्ट्स** लोकांनीं जय मिळवीत **इंग्लिशां**च्या प्रत्ययास आणून दिली. पुढल्या वर्षी एकदा एका पक्षाचा जय तर दुसऱ्या वेळीं त्या पक्षाचा मोड आणि दुसऱ्या पक्षाचा जय अशा प्रकारानें एकमेकांचे जयापजय होऊन युद्ध चाललें. **इंग्लिशांनीं** १७७५ त, **अमेरिकन्सांनीं कानडा** देशावर केलेल्या स्वारीचा पराभव केला. परंतु दुसऱ्या पक्षीं, १७७६ त **बॉस्टन**चा समुद्रांतून नाकेबंदी करून **लार्ड हाउ** ह्यानें कोंडमारा केला होता तो उठविण्याला **वाशिंग्टनानें** त्याला भाग पाडलें. पुढें हळू हळू त्या **कालोनिस्ट्स** लोकांनीं आपल्या जनक देशापासून (ग्रेटब्रिटनापासून) आपला राजकीय संबंध तोडण्याविषयीं निग्रहानें निश्चय केला, आणि तो निश्चय, **इंग्लंडानें** तें युद्ध पुढें चालविण्याकरितां **जर्मन** फौज ठेवली आहे, हें वर्तमान कळतांच सुदृढ झाला.

बंकर्स हिल्ल एथील लढाई, मे १७७५.

१७७६ त जूलईच्या २ ऱ्या तारिखेस, **जान आडम्स, फ्रान्क्लिन,** आणि **शर्मन,** ह्यांसारख्या थोर आणि कळकळीच्या पुरुषांनीं पुढाईतपणा करून मन वळविल्यामुळें **कांग्रेस्स** ह्यांनीं, त्या संयुक्त राज्यशाखा, मोकळीं आणि स्वतंत्र संस्थानें झालीं पाहिजेत, अशा ठरावाला संमति दिली, आणि **व्हर्जिनिया** सं-

स्थानांतील **टॉमस जेफर्सन** ह्यानें **" डेक्लरेशन आफ् इंडिपेंडेन्स "** (स्वातंत्र्याचें प्रकटीकरण किंवा जाहीरनामा) ह्या नांवाचें एक प्रसिद्धिपत्र तयार केलें. त्याच्या शेवटीं हे गंभीर किंवा इब्रतीचे शब्द होते; **"आम्हीं अमेरिकेंतील " युनायटेड स्टेट्सचे** (संयुक्त संस्थानांचे) **कान्ग्रेस्सांत** (प्रति- " निधिमंडलांत) **एकत्र जमलेलों प्रतिनिधि, आमच्या आ- " शयांच्या सरळपणाविषयीं पृथ्वीचा सर्वश्रेष्ठ न्याया- " धीश ह्याला साक्षी ठेवून, गंभीरपणानें प्रसिद्ध करतों " आणि स्पष्टपणें सांगतों कीं, ह्या संयुक्त वसविलेल्या " राज्यशाखा अनन्याधीन आणि स्वतंत्र संस्थानें आहेत, " आणि हक्कानें तशा असणें योग्यच आहे. "** पुढल्या वर्षी, म्हणजे १७७७ त आक्टोबरच्या १७ व्या तारिखेस, **जनरल बर्गॉइन** ह्याच्या हुकमतीखालच्या **इंग्लिश** फौजेला **साराटोगा** एथें वेढून शरण येण्याला भाग पाडलें, आणि **फ्रान्स सात वर्षांच्या युद्धांत** झालेल्या पायमल्लीचा किंवा मानभंगाचा सूड उगविण्याविषयीं उत्सुक होताच, ह्यास्तव त्या **कालोनिस्ट्स** लोकांशीं त्या देशानें साहाय्य-संकेती कट केला.

डेक्लरेशन आफ् इंडिपेंडेन्स, तारीख ४ जूलई १७७६.

बर्गॉइन ह्याची फौज साराटोगा एथें शत्रूला शरण जाते, ता. १७ आक्टोबर १७७७.

हा प्रकार होणार असें **लार्ड चाथम** ह्यानें फार दिवसांपासून भविष्य केलेलें होतें, आणि म्हातारपण आणि रोग ह्यांनीं तो दुळाखुडा झालेला असतांही, १७७८ त फेब्रुअरीच्या ६ व्या तारिखेस, त्या **कालोनिस्ट्सांच्या** दुःखांचा किंवा जाचांचा पूर्ण परिहार केला पाहिजे असा आग्रह करण्यासाठीं, तो **पार्लमेंटांत** आला. परंतु तो त्याचा प्रयत्न व्यर्थ गेला! नंतर एप्रिलच्या ७ व्या तारि-

खेस त्या **लार्ड्सांच्या** सभेंत **अमेरिकेशीं** समेट करणेंच उचित आहे असें प्रतिपादन करण्याकरितां, व त्याचा प्राचीन शत्रु **फ्रान्स** हा क:पदार्थ आहे त्याला जुमानण्याचें कारण नाहीं असें सांगण्याकरितां, तो वृद्ध राजनीतिविशारद पुरुष उभा राहिला. तेव्हां स्मरणांत राहण्यासारखा एक विचित्र प्रकार झाला. त्याला **रिच्मंडच्या ड्यूकानें** नबळ्या किंवा मळमळीत भाषणानें उत्तर दिलें. त्या वेळीं **चाथम** ह्यानें पुनः भाषण करण्यासाठीं उठण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याची वाचा खुंटली, आणि तो मूर्च्छा येऊन मागें पडला. त्यानंतर पुढें एका महिन्यानें १७७८ त मे महिन्याच्या ११ व्या तारिखेस तो मरण पावला, आणि त्याच्या मृत्यूनें **अमेरिकेशीं** सल्ला होण्याची आशा सर्व संपली.

चाथमचा मृत्यु, १७७८.

इंग्लंडाचीं पुढलीं चार वर्षें भारी दगदगींत गेलीं. १७७९ त त्याच्या विरुद्ध **स्पेनचा** राजा **फ्रान्साला** मिळाला, आणि त्यानें **जिब्राल्टरला** वेढा घातला. त्या **जिब्राल्टरचें** त्या वेढ्यापासून तीन वर्षें रक्षण यशस्कर प्रकारानें **जनरल एलियट** ह्यानें केलें. शेवटीं त्या **एलियटनें** १७८२ त सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारिखेस, तापून रसरशीत झालेल्या गोळ्यांनीं शत्रूंच्या अरमाराचा नाश केला, इतक्यांत **लार्ड हाउ** ह्यानें येऊन त्याची सोडवणूक केली. १७८० त **रशिया, स्वीडन,** आणि **डेन्मार्क,** ह्या तिहीं राष्ट्रांनीं, आपल्या जहाजांचा, "**कॉन्ट्राबान्ड आफ् वार**" (युद्धाच्या समयीं निषिद्ध), म्हणजे शत्रूंचा माल, वर आहे कीं काय हें पाहण्यासाठीं, **इंग्लिश** लोक झाडा घेत त्याची बंदी करण्यासाठीं **आर्म्ड न्यूट्रालिटी,** म्हणजे शस्त्रास्त्रसज्य राहून तटस्थपणा किंवा तिऱ्हाईतपणा

जिब्राल्टरचा वेढा, १७७९–१७८२.

राखण्याविषयीं कट केला, आणि **प्रुशिया** आणि **हालंड** हीं दोन्हीं राज्यें त्या कटांत पुढें लवकरच मिळालीं.

बाहेरूनच संकट ह्या प्रकारें ओढवलेलें होतें असें नाहीं, कारण, **अमेरिकें**तील युद्धासाठीं **आयर्लंडां**तील सैन्य नेलेलें होतें, आणि अशावेळीं **फ्रेंच** लोकांनीं **आयर्लंडा**वर स्वारी करण्याची भीति घातली, म्हणून **आयरिश** लोकांनीं त्या देशाचें संरक्षण करण्यासाठीं **व्हालंटीयर्स**, म्हणजे आपण होऊन शिपायाची फुकट नौकरी करण्यास तयार, अशा लोकांची एक फौजेची तुकडी (मुख्यत्वें प्राटेस्टंटधर्मी लोकांची) तयार केली. ती तुकडी फारच त्वरेनें वाढत जाऊन १००००० एक लक्ष माणसांची फौज जमली. **आयरिशां**च्या व्यापाराला अटक किंवा प्रतिबंध वगैरे करून आजपर्यंत फार दिवस त्यांवर जुलूम केलेला होता. तेव्हां एवढी मोठी फौज त्यांच्या जवळ जमल्यामुळें **अमेरिकें**तील कित्ता **आयरिश** वळवूं म्हणते तर तसें त्यांकडून होण्याजोगें होतें. **हेन्री ग्राट्टन** नांवाचा एक मोठ्या कोटींतला बृहस्पतितुल्य वक्ता होता, त्यानें **आयरिश** लोकांना अन्य देशीं आपला माल पाठविण्याचा अनिर्बंध हक्क असला पाहिजे असा **आयरिश पार्लमेंटां**त उहू काढला, आणि **लार्ड नार्थ** ह्यानें, चहूंकडून गांजणूक झाल्यामुळें, १७८० त **आयरिशांना** लोंकर आणि कांच हे दोन जिन्नस अन्य देशीं पाठविण्याचा अनिर्बंध हक्क देण्यासाठीं एका **आक्टा**चा मसुदा पसार करविला.

ग्राट्टन आयर्लंडाला अन्य देशीं माल पाठविण्याचा अनिर्बंध हक्क मिळवितो, १७८०.

इंग्लंडांतही असमाधानाची वृत्ति उत्पन्न झालेली होती, परंतु ती एका भलत्याच मार्गानें प्रकट झाली. १७७८ त **पार्लमेंटानें क्याथलिक्सां**विरुद्ध फारच जुलमाचे असे कांहीं पूर्वी केलेले कायदे

रद्द केले होते. त्या कृत्यानें जे परमावधीचे **प्राटेस्टंट्स** होते त्यांना फार चीड आली. **लार्ड जार्ज गॉर्डन** नांवाचा एक कमअक्कल धर्मपिसा पुरुष होता. त्यानें **क्याथलिक्सां**विरुद्ध असलेले कायदे रद्द करणाऱ्या **आक्टाच्या** मसूद्याविरुद्ध अर्ज करण्यासाठीं ६०००० लोकांना प्रवृत्त करून **पार्लमेंटाच्या** सभागृहांत नेलें. आजपर्यंत **पार्लमेंटाला** केलेल्या अर्जांत एवढा सनाटा अर्ज हाच पहिला होता, आणि तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां त्या बेबंद बंडाळ लोकांनीं **लार्ड्स** ह्यांचा अपमान केला, आणि ते **कामन्सांच्या** सभागृहाच्या सदरेच्या पुढच्या खोलींत दांडगाईनें शिरले, तेथून त्यांना निवळ बळजोरीनें घालवून द्यावें लागलें. ते माघारे परतले तेव्हां वाटेंत दंगे उसळले, आणि **लंडन** चार दिवस त्या बंडाळ लोकांच्या हातीं होतें. **क्याथलिक्सांचीं** देवळें जाळलीं, आणि **होल्बोर्न** नांवाच्या महल्ल्यांत तर एक भयंकर तमाशा झाला. तेथें एका कलालाची भट्टी होती तिचे दरवाजे फोडून ते लोक आंत शिरले, आणि त्यांनीं तिला आग लावली, आणि त्या आगीच्या ज्वाळांत ते दंगेखोर लोक दारूनें झिंगून झोके खात लोळत पडले होते. शेवटीं १०००० लष्करी शिपायांच्या मदतीनें पूर्ववत् बंदोबस्त झाला.

गॉर्डन ह्याने उपस्थित केलेले दंगे, १७८०.

लार्ड नार्थ ह्याचा राज्यकारभार लोकांना फार अप्रिय होत चालला होता, कारण, युद्धांचा खर्च भारी वाढला, व्यापार अगदीं बंद झाला, आणि **बर्क** हा **पार्लमेंटांत सरकार** पेनशनें देण्यांत आणि लांचरुषवतींत पैशाची उधळपट्टी करतें असें मोठमोठ्यानें गाऱ्हाणें करूं लागला. नंतर

यॉर्कटाउन एथें इंग्लिशांची फौज शत्रूंला शरण जाते, ता. १८ आक्टोबर, १७८१.

१७८१ त **अमेरिकें**तील **इंग्लिशांच्या** फौजेवर दुसरें एक भयंकर अरिष्ट गुदरल्याची खबर आली. **लार्ड कॉर्नवालिस** ह्याच्या हाताखालीं असलेल्या ४००० फौजेला, जमिनीवरून **वाशिंग्टनानें**, आणि समुद्रांतून **फ्रेंचांच्या** अरमारानें, अन्नसामग्री बिलकूल मिळूं नये असें केलें, तेव्हां अन्नाच्या तुटवड्यामुळें **लार्ड कॉर्नवालिसाला** १७८१ त आक्टोबरच्या १८ व्या तारिखेस **यॉर्कटाउन** एथें त्या फौजेनिशीं शत्रूला शरण जाणें भाग पडलें.

अनेक शत्रूंच्या तडाख्यांखालीं **इंग्लंड**चा जणू चुराडा होणार असा रंग दिसूं लागला. **लार्ड नार्थ** हा एका वेळीं तर निराशेनें म्हणाला, "सर्व कारभार संपला," आणि त्यानें १७८२ च्या मार्चांत राजीनामा दिला. नव्या प्रधानांनीं **पॉयनिंग**चा कायदा (२७० वें पृष्ठ पहा) रद्द करून **आयरिश** लोकांना निवांत करण्याची त्वरा केली. त्या कायद्यानें **आयर्लंडांत** पसार केलेले कायदे मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार **इंग्लिश पार्लमेंटाला** होता. त्या नव्या प्रधानांनीं आणखी **अमेरिका, फ्रान्स,** आणि **स्पेन,** ह्या देशांशीं तह करण्याची एकदम तजवीज मांडली. हा तह होणें सोपें नव्हतें, कारण, **स्पेन**चा राजा **जिब्राल्टर**वर हक्क सांगूं लागला, आणि **फ्रान्स**चा राजा **बंगाला** मागूं लागला, आणि तीं दोन्हीं तर **इंग्लंडाला** मोठ्या मोलाचीं होतीं. इतक्यांत कोणतीही गोष्ट ठरावांत येण्यापूर्वी, सुदैवानें, **इंग्लंड**च्या सर्वोत्तम नाविकांपैकीं **आड्मिरल रॉडने** नांवाच्या एका अरमाराच्या अधिपतीनें, **कौंट ला ग्रास्स** नांवाचा **फ्रेंचांच्या** अरमाराचा सरदार **फ्रेंच** अरमार घेऊन **जमेका**

पॉयनिंगचा कायदा रद्द केला, १७८२.

रॉड्नेनें मिळविलेला अरमारांच्या लढाईतील जय, १७८२.

भेट घेण्यासाठीं चालला असतां त्याला मार्गांत गांठून १७८२ त एप्रिलच्या १२ व्या तारिखेस त्याचा पूर्ण पराभव केला, आणि पुढें थोड्याच महिन्यांनीं **जिब्राल्टरला** **स्पानिशांनीं** घातलेला वेढा **इंग्लिशांनीं** उठविला. ह्या जयांनीं **इंग्लंडाला** आब्रूरक्षण होई असा तह करण्याचा योग आला, आणि पुढें १७८३ च्या जान्युअरींत **व्हर्सेल्स** एथें तह झाला, त्यांत **फ्रान्सला** कांहींच लाभ झाला नाहीं, आणि **स्पेनाला** फक्त **मिनॉर्का** आणि **फ्लॉरिडा** हीं मिळालीं. **इंग्लंडानें** **भूमध्यसमुद्राची** किल्ली, असा जो **जिब्राल्टरचा** मजबूत किल्ला, तो त्या तहांत आपल्याकडे ठेवला. १७८२ च्या नोव्हेंबरांत **इंग्लंड** आणि **युनायटेड् स्टेट्स** ह्यांच्या दरम्यान तहाचीं कलमें ठरून त्यांवर सह्याही होऊन चुकल्या होत्या. त्या तहानें, **इंग्लंडानें**, फक्त **नोव्हा स्कोशिया, कानडा,** आणि **न्यूफौन्डलंड,** इतकीं तीन आपणाकडे ठेवून, **युनायटेड् स्टेट्स** (संयुक्त संस्थानें) ह्यांचें स्वातंत्र्य स्वसंतोषानें कबूल केलें. **फ्रान्स** देशाशीं **व्हर्सेल्स** एथील तह होऊन चुकल्यावर, १७८३ त सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारिखेस हा **युनायटेड् स्टेट्स** ह्यांच्याशीं केलेला तह बहाल किंवा मंजूर केला.

व्हर्सेल्स एथील तह, जान्युअरि, १७८३.

एका बलाढ्य बसविलेल्या राज्यशाखेवर जुलुमानें कर बसविण्याविषयीं **तिसरा जार्ज** आणि त्याचा प्रधान ह्यांनीं केलेल्या प्रयत्नाचा ह्या प्रकारें परिणाम झाला. तेथील **कालोनिस्ट्स** लोकांना नेमस्त किंवा यथायोग्य स्वातंत्र्य देण्यापुरतें त्या दोघांनीं शाहणपण केलें असतें तर, **अमेरिका** कदाचित् अद्यापपर्यंत **ब्रिटिशांच्या** साम्राज्याचा किंवा बादशाही राज्याचा भाग म्हणून मोडली

इंग्लंड अमेरिकेचें स्वातंत्र्य कबूल करतें, १७८३.

असती. ह्या काळापासून पुढें तिचा इतिहास **ग्रेट ब्रिटना**च्या इतिहासापासून पृथक् झाला आहे; तथापि **अमेरिकन्सां**च्या अंतःकरणांत त्यांच्या मूळच्या प्राचीन देशाविषयीं भक्ति बळकट राहिली आहे, आणि **इंग्लंड**ही, आपल्या तर्फें, आपल्या किनाऱ्यांपासून पहिल्यानें लोक जाऊन उत्पन्न झालेल्या बलाढ्य राष्ट्राविषयीं अभिमान बाळगतें.

अमेरिका ह्या प्रकारें तुटून पृथक् किंवा स्वतंत्र होत असतांना देखील, पृथ्वीच्या दुसऱ्या बाजूला नव्या वसाहती करून राज्यशाखा करण्याची आरंभाची तजवीज चालू होती, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. **टाउन्शेन्ड** ह्यानें आपला अपयशस्कर "**रेव्हेन्यू आक्ट**" (महसुलासंबंधी कायदा) पसार केल्यापासून थोड्याच काळानें, १७६८ त **काप्टन कूक** नांवाचा **यार्कशायरां**त राहणारा गृहस्थ, ह्याला **रॉयल सोसाएटी** (राजकीय मंडळी) ह्या नांवाच्या मंडळीनें **व्हीनस,** म्हणजे शुक्र, ह्या ग्रहाच्या सूर्याच्या बिंबावरून आरपार क्रांतीचे वेध घेण्यासाठीं, **पासिफिक** महासागरांतील **टाहिटी** नांवाच्या बेटांत पाठविलें. कूक तेथून माघारा येतांना **टास्मन** नांवाच्या पुरुषानें १६४२ त शोधून काढलेल्या आणि **न्यू झिलंड** (नवीन झीलंड) हें नांव दिलेल्या बेटांत गेला. त्या बेटांत कांहीं बीं-बियाणें पेरून, आणि कांहीं डुकरें मोकळीं सोडून देऊन, तो पुढें **आस्ट्रेलिया** (त्या काळीं त्याला न्यू हॉलंड असें म्हणत) नांवाच्या बेटांत गेला, आणि त्या बेटाच्या आग्नेयीकडील भागाची टेहळणी करून त्यावर **ब्रिटिशां**चा बावटा उभारून, त्यानें त्या मुलुखाला किंवा देशाला **न्यू साउथ वेल्स** (नवीन दक्षिण वेल्स)

कूक ह्याच्या सफरी किंवा जलपर्यटणें, १७६८–१७७९.

हें नांव ठेवलें. १७८७ त, म्हणजे **हवाई** नांवाच्या बेटांत **कूक** ह्याला दग्यानें ठार मारल्यानंतर आठ वर्षांनीं, **न्यू साउथ वेल्स** हें काळ्यापाण्याची सजा झालेल्या गुन्हेगार लोकांकरितां ठाणें किंवा वसाहतीची जागा करावी असा ठराव झाला; आणि १७८८ त **पिट्** ह्यानें **काप्टन आर्थर फिलिप** ह्याला ८५० गुन्हेगार काळ्यापाण्यावर जाणारे पुरुष व बायका मिळून कैदी बरोबर देऊन **न्यू साउथ वेल्स** एथें पाठविलें. तो पहिल्यानें **बॉटनी बे** नांवाच्या अखातांत गेला आणि तेथून पुढें **पोर्ट जाक्सन** नांवाच्या बंदरीं गेला, आणि तेथें त्यानें वसाहत केली, तिला, त्या वेळीं **व्हाइकौंट सिड्नी** नांवाचा **कॉलोनियल** (वसविलेल्या राज्यशाखांकडील) **सेक्रेटरी** (चिटणीस) **इंग्लंडांत** होता, त्याच्या नांवावरून **सिड्नी** असें नांव ठेवलें.

आस्ट्रेलियांत अपराधी ठरलेल्या गुन्हेगारांसाठीं वसविलेलें ठाणें, १७८८.

त्या कैदी लोकांचे पहिल्यानें त्या नवीन वसाहतींत फार भयंकर हाल झाले, त्यांना वारंवार अन्नावांचून देखील राहावें लागे; आणि जरी ते गुन्हेगारच होते, तरी, जो देश आतां **ब्रिटिशांच्या** सर्वोत्तम वसविलेल्या राज्यशाखांपैकीं एक राज्यशाखा झाला आहे, त्या देशांत मागून जाणाऱ्या वसाहत करणाऱ्या लोकांकरितां रान तोडून जमीन साफसफा करणाऱ्या बेलदारांचें, किंवा पुढें जाऊन मार्ग तयार करणारांचें, काम त्यांनीं केलें हें आपण विसरतां कामा नये.

दरम्यानच्या वेळांत **हिंदुस्तानांत** जे फेरफार होत होते त्यांनीं त्या देशांतील व्यापाराचीं ठाणीं **इंग्लंडांतील सरकाराच्या** सत्तेखालीं गेलीं. १७६७ त **लार्ड क्लाइव्ह** हा **हिंदुस्तानांतून** स्वदेशीं परत आल्यावर **इंग्लिश** व्यापाऱ्यांनीं (कंपनींतील व्यापाऱ्यांनीं) **हिंदुस्तानांतील** लोकांवर जुलूमजब-

रदस्ती करून त्यांच्यापासून द्रव्य हरण करण्याकडे आपल्या सत्तेचा उपयोग मांडला; आणि त्यांच्या अन्यायाविषयीं आणि जुलुमाविषयीं तद्देशीयांच्या इतक्या पुष्कळ फिर्यादी आल्या कीं, १७७३ त प्रधानांनीं त्या **कंपनीच्या** कारभारांत हात घातला, आणि त्यांनीं, **वारन हेस्टिंग्स** हा **बंगाल्याचा गव्हर्नर** होता, त्याला **बंगाला, मुंबई,** आणि **मद्रास,** ह्या तिन्ही इलाख्यांवर **गव्हर्नर जनरल** म्हणून नेमलें. **हेस्टिंग्सा**वर त्या योगें मोठें कठीण काम येऊन पडलें. त्याच्या अधिकाराच्या मर्यादा खुलाशानें ठरविलेल्या नव्हत्या, आणि **इंग्लंडांतील ईस्ट इंडिया कौन्सिल**च्या सभासदांपैकीं **सर फिलिप फ्रान्सिस** नांवाच्या एका सभासदाला **हेस्टिंग्सा**बरोबर मिळून राज्यकारभार करण्यासाठीं **हिंदुस्तानांत** पाठविलें होतें, तो **फ्रान्सिस** त्या **हेस्टिंग्साला** शक्य असेल त्या हरएक प्रकारानें अडथळा करूं लागला. एकंदरीनें **हेस्टिंग्सनें** न्यायानें आणि चांगल्याप्रकारें अमल केला. **जमीनदार** नांवाचे जुलुमानें पैसा वसूल करणारे तद्देशीय अधिकारी होते, त्यांच्या जागीं **इंग्लिश** लोक **कलेक्टर्स** नेमून त्यानें तद्देशीय लोकांचें रक्षण केलें, आणि न्यायाच्या कोडतांतील लांचरुषवत बंद करण्याविषयीं त्यानें फार प्रयास केला. त्यानें **दक्षिणें**तील **मराठे** ह्या नांवाचे बळ्या **हिंदु** बादशाही राज्यांतील लोक होते त्यांच्याशीं त्यानें मोठ्या संकटाचें युद्ध केलें; आणि त्यांच्याशीं १७८२ त तह केला; आणि त्याच वर्षी त्यानें, **हैदर अली** नांवाच्या एका शिपाईगिरीचा धंदा करणाऱ्या साहसी पुरुषानें **फ्रेंचांच्या** कुमकेनें **मद्रास**

वारन हेस्टिंग्स ह्याला हिंदुस्तानचा गव्हर्नर जनरल नेमलें, १७७३.

मराठ्यांशीं पहिलें युद्ध, १७७९–१७८२.

अगदीं जिंकल्यासारखी होती, तिच्या संरक्षणाकरितां, जलमार्गानें **सर आयर कूट** ह्याला पाठवून, खुषकीनें एक तद्देशीय शिपायांची फौज, रवाना केली. **हैदर अली** पुढील सालीं वारला आणि १७८३ सालीं **व्हर्सेल्स** एथें तह होऊन **इंग्लंड** आणि **फ्रान्स** ह्यांच्या दरम्यानचें युद्ध समाप्त झालें, तोंपर्यंत **कूट** ह्यानें, शत्रूचा सर्वप्रकारें मोठा उपराळा असतांही, **मद्रासेचें** रक्षण केलें.

मद्रासचें संरक्षण, १७८२.

ह्याप्रकारें १७८४ त जेव्हां **वारन हेस्टिंग्स** हा **इंग्लंडास** परत आला तेव्हां, **हिंदुस्तानांतील ब्रिटिशांच्या** अमलाखालच्या मुलुखांत स्वस्थता करून आणि त्याची मजबुती वाढवून तो तो सोडून आला, आणि **बंगाल्यांतील** लोक त्याला; विजयी, संरक्षक, आणि दोस्त, अशा दृष्टीनें लेखून पूज्य मानूं लागले. परंतु त्यानें आपले उद्देश सिद्धीस नेण्यांत नेहमी रास्तच उपाय योजिले नव्हते. **इंग्लंडांतील ईस्ट इंडिया कंपनीचा** पैका पाठवा म्हणून त्याच्या मागें सतत लकडा होताच, आणि तो पैसा पुरविण्यासाठीं, **हेस्टिंग्स** ह्यानें, **रोहिले** गांवाचे स्वतंत्र **अफघाण** जातीचे लोक होते, त्यांवर हल्ला करण्यासाठीं **अलाहाबादच्या वजीराला**, ४००००० पौंडांइतकी पैक्याची रकम त्यापासून घेऊन, **इंग्लिश** सैन्य कुमकेस दिलें. त्या **रोहिल्यांच्या** मुलुखाची धूळधाणी करून त्यांना जिंकून दास्य करावयास लावलें. शिवाय, **हेस्टिंग्स** ह्यानें तद्देशीय राजांपासून द्रव्य पिळून काढण्यासाठीं त्यांवर जुलूमजबरदस्ती आणि क्रूरपणा केला असें म्हणतात. ह्या, आणखी दुसऱ्या अशाच कृत्यांबद्दल, १७८७ त

वारन हेस्टिंग्स ह्याची चौकशी, १७८७ –१७९५.

हौस आफ् लार्ड्स ह्यांच्या सभागृहांतील कैदी उभे राहण्याच्या कठड्याच्या जागेंत त्याला उभा करून त्यावर दोषारोप केले, आणि **हिंदुस्तानां**तील **इंग्लिशां**चा अमल न्यायाचा आणि दयेचा असावा अशी फार कळकळ वाटत असणारा **बर्क** नांवाचा प्रख्यात वक्ता, हा त्यावर मुख्य आरोप ठेवणारांपैकीं एक होता. त्याची चौकशी १७८८ च्या फेब्रुअरींत सुरू झाली, आणि मध्येंमध्यें खंड पडून एकंदर सातांहून ज्यास्त वर्षांपर्यंत लांबली. शेवटीं १७९५ त **हेस्टिंग्स** निरपराध ठरला. ज्यांनीं त्यावर दोष लादले, त्यांना, हजार वाट्यांनीं, त्याला **हिंदुस्तानां**त ज्या ज्या संकटांतून किंवा अडचणींतून पार पडावें लागलें तीं संकटें किंवा त्या अडचणी, फारच थोड्या कळलेल्या असाव्या, आणि **क्लाइव्ह**च्या मागून **हिंदुस्तानां**त **ब्रिटिशां**चें राज्य स्थापणारा असा तोच मुख्य **इंग्रेज** होय, असें सर्व **इंग्लिश** लोकांनीं त्याला स्मरलें पाहिजे.

असें असतांही, **हिंदुस्तानां**तील **इंग्लिशां**च्या अमलाविषयीं जी चौकशी झाली, तिनें त्या देशाच्या राज्यकारभारांत पूर्वींहून चांगली व्यवस्था झाली. आतां **हौस आफ् कामन्स** ह्यांतील समोरासमोरच्या बाजूंस दोन प्रतापी राजनीतिविशारद पुरुष होते. त्यांपैकीं एक छोटा **पिट्ट** ह्या नांवाचा होता. तो **चाथम**चा **अर्ल** ह्याचा पुत्र होता, आणि तो १७८३ त मुख्य प्रधान झाला. दुसरा **चार्लस जेम्स फॉक्स** ह्या नांवाचा होता. **ब्यूट** ह्याचा पुरस्कारकर्ता असून, पुढें **लार्ड हालंड** ही पदवी पावलेला जो **हेन्री फॉक्स,** त्याचा तो पुत्र होता. **फॉक्स** हा जुगारी आणि दुर्व्यसनी पुरुष होता, परंतु तो हुषार आणि मोठा वक्ता

पिट्ट आणि फॉक्स.

असा मुतसद्दी होता. त्याला आपल्या देशबांधवांविषयीं अतिशय कळकळीची प्रीति होती, आणि जुलूम आणि अन्याय ह्यांविषयीं द्वेष होता. त्यानें **इंडिया बिल** (हिंदुस्तानाविषयीं कायद्याचा मसुदा) नांवाच्या एका **आक्टाचा** मसुदा १७८३ त **कामन्सां**-पुढें आणला. तो **लार्डस** ह्यांनीं झुगारून दिला. आतां **पिट्ट** ह्यानें दुसरें एक **इंडिया बिल कामन्सां**-पुढें आणलें, त्यांत **बोर्ड आफ् कन्ट्रोल,** (नियंतृत्व करणारें कामदारमंडळ) नांवाचें राजकीय प्रकरणांत **ईस्ट इंडिया कंपनीवर** हुकमत ठेवण्यासाठीं आणि **हिंदुस्तानांतील** लोकांचें रक्षण करण्यासाठीं **सरकारी** प्रधानांचें एक नियंतृत्व करणारें मंडल नेमलें. तें **बिल** पसार झालें, आणि त्या काळापासून **हिंदुस्तानावर** पूर्वींहून फार न्यायानें अमल होऊं लागला, आणि **हिंदुस्तान** देश हा खरोखर **ब्रिटिश साम्राज्याचा** एक भाग झाला.

इंडिया बिल पसार होतें, १७८४.

प्रकरण २४.

फ्रान्स देशांतील राज्यक्रांति—नपोलियन आणि इंग्लंड

तिसरा जार्ज, खंड दुसरा, १७८४–१८२०.

ज्या १७८४ सालांत तें **इंडिया बिल** पसार झालें, तें **साल**

इंग्लंडाला फार महत्वाचें होतें, कारण त्या सालच्या **मार्च महि-न्यांत**, एक बलाढ्य प्रधानमंडल नेमलें गेलें, त्यांत **इंग्लंडांतील** अत्यंत प्रतापी राजनीतिविशारद पुरुषांपैकीं एक पुरुष मुख्य प्रधान होता. १७८३ च्या डिसेंबर महिन्यांत जेव्हां छोटा **वुइलियम पिट्ट ह्यानें** सरकारी हुद्दा पत्करला, तेव्हां त्याचें वय अवघें चोवीस वर्षांचें होतें, आणि त्या समयीं **व्हुइग** पक्षांतील लोकांचा **फॉक्स** हा प्रमुख असून, ते सारे **व्हुइग्स** त्या **फॉक्सा**सुद्धां हा **पिट्ट** "केवळ पोर" आहे असें म्हणून हसले, आणि तोच **पिट्ट** सतरा वर्षे मुख्य प्रधान राहील ही कल्पना देखील त्यांच्या मनांत आली नाहीं. **कामन्सांच्या** सभेंत त्याच्या तरफेचा बहुपक्ष देखील नव्हता, आणि पांच वेळां त्याच्या मताविरुद्ध बहुमत होऊन त्यानें काढलेले उद्दू सिद्धीस गेले नाहींत. तथापि तो तसाच झुंजत राहिला, कारण, त्या **कामन्सांच्या** सभे बाहेरचे लोक आपल्या तरफेचे आहेत हें तो जाणून होता, आणि सरकारच्या कारभारांत जे खोटसाळ प्रघात पडलेले होते, ते सुधारून राज्यकारभार चांगल्या प्रकारें करावा इतकाच आपला इरादा आहे असें लोकांच्या प्रत्ययास आणून देऊन, त्या योगें मोठमोठ्या **व्हुइग** घराण्यांतील लांचलुचपतीची वहिवाट आणि इतर आचारभ्रष्टता मोडण्याची त्याला उमेद होती. त्याचा लोकांच्या अनुकूलतेविषयीं तर्क खरा होता; कारण जेव्हां १७८४ च्या मार्च महिन्यांत **पार्लमेंटाचें** विसर्जन झालें, तेव्हां नव्या निवडणुका झाल्या त्यांत त्याला अनुकूल असे बहुत सभासद निवडले गेले, त्यामुळें नवीन **पार्लमेंटांत** त्याच्या तरफेचा मोठाच बहुपक्ष झाला, आणि पुढील आठ वर्षे **इंग्लंडांत**

छोटा पिट्ट मुख्य प्रधान होतो, १७८३–१८००.

स्वस्थता होती, त्या काळांत त्यानें राष्ट्रांतील प्रजेचें कल्याण करणाऱ्या अशा मोठ मोठ्या गोष्टी केल्या.

आडाम स्मिथ नांवाच्या एका पुरुषानें १७७६ त **धि वेल्थ आफ् नेशन्स** (राष्ट्रांची संपत्ति) ह्या नांवाचा आपला ग्रंथ छापून प्रसिद्ध केलेला होता. तो ग्रंथ फारच विलक्षण आणि लक्ष्यांत ठेवावया जोगा होता. त्यांत, प्रत्येक माणसाच्यानें आपल्या श्रमानें जितकें द्रव्य मिळववेल तितकें त्याला मिळवूं दिलें पाहिजे, आणि ज्या कायद्यांनीं कोणत्याही दोहों देशांच्या दरम्यानचा व्यापार दडपला जाईल ते कायदे अहितकारक होत, ह्या गोष्टी, पूर्वी कोणीही प्रतिपादन केल्या नसून पहिल्यानें प्रतिपादन केल्या होत्या. **पिट्ट** ह्यानें त्या ग्रंथाचें अध्ययन केलेलें होतें, आणि त्यानें पहिल्यानें जीं कामें केलीं, तीं हीं; चहा आणि मद्यें ह्यांवरील कर किंवा जकात कमी केली, आणि **वाल्पोलाच्या** मनांत करावयाचें होतें त्याप्रमाणें, सर्व करांचा वसूल करण्याचें काम पूर्वीहून सोपें केलें. ह्या व्यवस्थेनें, जकात टाळून माल चोरून छपवून आणण्याची किंवा पाठविण्याची प्रवृत्ति किंवा मोह कमी झाला, त्यामुळें व्यापारी मांडवीमधून आपआपले माल योग्य त्या जकाती देऊन उघडपणें आणूं लागले, आणि सरकारची जमाबंदी इतकी वाढली कीं, **पिट्ट** हा पुष्कळ जुलुमाचे कर काढून टाकण्याला समर्थ झाला. तो ह्याही पुढें गेला असता, आणि त्यानें **इंग्लंड** आणि **आयर्लंड** ह्यांच्या दरम्यानचा व्यापार कर किंवा जकाती ह्यांपासून मोकळा केला असता. परंतु आतां **आयर्लंडांतील पार्लमेंट, इंग्लंडाची** त्यावर हुकुमत राहिली नसून, आपल्याला पाहिजेत तसे कायदे पसार करूं लागलें. **इंग्लिश** व्यापारी

पिट्ट ह्याची जमाबंदीची व्यवस्था.

आयरिश व्यापाऱ्यांचा मत्सर करीत, त्यामुळें **आयरिशही** आपल्या तर्फे कोणत्याही हांशिलाच्या किंवा मुद्याच्या गोष्टींत आपला हेका सोडण्यारखे नव्हते. **आयर्लंडां**तील स्वदेशभक्त **ग्राटन, फ्लड,** आणि **करेन,** ह्यांनीं **इंग्लंडांत** पसार केलेला अनिर्बंध व्यापाराविषयींचा **कायदा** स्वीकारण्यास नाकारलें, आणि ह्याप्रकारें, **आयरिशांना** जें पाहिजे होतें तें सर्व मिळालें नाहीं म्हणून, त्यांना त्या कायद्यापासून जो लाभ झाला असता तोही त्यांनीं गमावला. **इंग्लंड** आणि **फ्रान्स** ह्यांच्या दरम्यान व्यापारसंबंधी तह करण्याच्या कामांत **पिट्ट** ह्याला विशेष यश आलें. त्या तहानें त्या दोहों देशांच्या दरम्यान येणाऱ्या जाणाऱ्या मालावरील करजकातींपैकीं पुष्कळ करजकाती नाहींशा झाल्या.

आयर्लंड पिट ह्याचा अनिर्बंध व्यापाराविषयींचा कायदा स्वीकारण्यास नाकारितें, १७८५.

पिट्टच्या प्रधानकीच्या ह्या अवर्लीत **इंग्लंड** जितकें आबादान झालें तितकें आबादान तें पूर्वीं फार दिवसांपासून नव्हतें. **अमेरिके**शीं चाललेला झगडा संपला होता, आणि व्यापार तेजीनें तडका चालूं लागला. **हिंदुस्तान** देश हा **इंग्लिश** मालाच्या खपाला नवी पेठ किंवा बाजार खुला झाला, यंत्रांच्या योगें कारखानदार प्रत्येक पदार्थ पूर्वींहून फारच त्वरेनें तयार करण्यास समर्थ झाले, आणि कारखान्यांत सहस्रावधि लोकांना काम मिळूं लागलें. शिवाय **पिट्ट** ह्यानें काटकसरीनें आणि सचोटीनें **राष्ट्रीय कर्ज** कमी करण्याचा उद्योग मांडला. **सरकारचें** उत्पन्न आणि खर्च ह्यांचा हिशेब **तो** छापून प्रसिद्ध करूं लागला, आणि जेव्हां त्याला नवीन कर्ज घ्यावें लागलें तेव्हां तें त्यानें प्रसिद्ध रीतीनें करार करून इतक्या खुलेपणानें घेतलें कीं, त्याला तें कर्ज

राष्ट्रीय कर्ज कमी करण्याचा प्रयत्न.

अतिशय कमी दरानें किंवा वरतवळ्यानें मिळालें, आणि पूर्वी वारंवार सरकारी कामदारांनीं सरकारी पैसा खूप आपल्या खिशांत टाकावा असा जो स्वार्थसाधु प्रकार होता तो अर्जी मोडला. ज्या सनदी गांवांत **पार्लमेंटा**करितां प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार असलेले असे लोक अगदीं थोडे किंवा विरळ असत त्या गांवांचे प्रतिनिधि काढून घेऊन, ते अति मोठ्या कौंटींना आणि **लंडन** आणि **वेस्टमिन्स्टर** ह्या मोठ्या शहरांना ज्यास्त द्यावे अशाकरितां त्यानें **हौस आफ् कामन्स**मध्यें एका **आक्टा**चा मसुदा आणून त्या **हौसाची** (सभेची) सुधारणा करण्याचा देखील प्रयत्न केला. परंतु त्याचा तो मसुदा पसार झाला नाहीं, कारण त्या सनदी गांवांपासून ज्यांना द्रव्य मिळे ते त्या मसूद्यांतील योजनेला आड आले, आणि सारें राष्ट्र इतकें आबादींत होतें कीं लोकांना निवडणुकांविषयीं बिलकूल परवा नव्हती. एकंदरीनें शांतिसुख आणि आबादी ह्यांच्या काळाची सुरवात होऊन जणू तो फार दिवस पुढें टिकेल असा खरोखर रंग दिसूं लागला. राजाला १७८८ सालाच्या अखेरीस दुसऱ्यानें उन्मत्त वायूचा किंवा वेडाचा झटका

पिट्ट ह्याचें रिफार्म बिल्ल म्हणजे पार्लमेंटाची सुधारणा करण्याच्या कायद्याचा मसुदा, नामंजूर होतो, १७८५.

आला, परंतु **पिट्ट** आणि **फॉक्स**, हे दोघे, **प्रिन्स आफ् वेल्स** ह्याचीं स्वभावलक्षणें फार वाईट असल्यामुळें त्याला **राजप्रतिनिधि** केला असतां त्याला अधिकार किती असावा, आणि **पार्लमेंटा**ला त्याला आपल्या लगामीं ठेवण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं, ह्या गोष्टींविषयीं भांडत होते तों तो वेडाचा झटका निघून गेला. **आयर्लंडांत** वेगळें **पार्लमेंट**

दुसरें रिजेन्सि बिल्ल, म्हणजे राजप्रतिनिधि नेमण्याविषयीं आक्टाचा मसुदा, १७८८,

होतें ही, ह्या गोष्टींचा विचार होत असतां, मोठी अडचणशी अनुभवास आली; कारण, **इंग्लिश पार्लमेंट** त्या **प्रिन्स आफ् वेल्स**च्या राजप्रतिनिधि ह्या नात्यानें अधिकाराला, अगदीं रेखलेल्या मर्यादा घालून देण्याविषयीं यत्न करीत असतां, **आयरिश पार्लमेंटा**नें त्या राजपुत्राला राजप्रतिनिधि ह्या नात्यानें राजाचा पूर्ण अखत्यार असावा अशी संमति दिली. सुदैवानें राजाची प्रकृति बरी होऊन त्या वादाचा निकाल लागला, आणि तो **सेंट-पाल**च्या देवळांत, **देवा**ला आपली कृतज्ञता प्रदर्शित करण्यासाठीं गेला, तेव्हां लोकांना मोठा आनंद वाटला. त्यांना **पिट्ट** ह्याच्या अमलाखालीं आपण सुरक्षित आहों असें वाटत असे, आणि त्यांना चाललेल्या व्यवस्थेंत कांहींही फेरफार नको होता. अगदीं एका नव्याच दिशेनें अरिष्ट जवळ येऊन ठेपलें होतें हें त्यांच्या गांवींही नव्हतें. १७८९ सालच्या जुलई महिन्यांत **धि फ्रेंच रेव्होल्यूशन**, म्हणजे **फ्रान्स** देशांतील उलथापालथ किंवा राज्यक्रांति करणारी धुमश्चक्री, उद्भवली, आणि तिनें सर्व **यूरोपखंड** लवंडून पासलें पाडलें, आणि तिच्यापासून पंचवीस वर्षें युद्धें आणि ब्रह्मघोळ चहूंकडे मातला.

फार दिवसांपासून साऱ्या **यूरोपां**तल्या राष्ट्रांतील प्रजांना वाटूं लागलेलें होतें कीं, **सरकार** हें जितकें राजांच्या आणि बडे लोकांच्या सुखाकरितां आवश्यक आहे, तितकेंच तें मध्यस्थित आणि

फ्रेंच रेव्होल्यूशन, म्हणजे फ्रान्स देशांतील उलथापालथ किंवा राज्यक्रांति, १७८९.

काबाडकष्ट करणाऱ्या लोकवर्गाच्या कल्याणाकरितांही आवश्यक आहे. **इंग्लंडांत** ह्या मनोवृत्तीचें समाधान करण्यासाठीं वेळोवेळीं शाहणपणाच्या सुधारणा केलेल्या होत्या; परंतु **फ्रान्स** देशीं मागल्या दीडशें वर्षांपासून लोकांवर

जुलूमजबरदस्ती अधिकाधिक होत आलेली होती. त्या देशांतील कायदे इतके अन्यायाचे होते कीं, धारेकरी (शेतकरी) आणि मजूर ह्यांवर करांचा ढीग लादलेला होता, परंतु बडे लोकांना एक छदामही द्यावा लागत नव्हता, आणि ते, आपल्या वतनवाड्यांपासून पैका पिळून काढणें ह्यावांचून दुसरी कसलीही त्या वतनवाड्यांविषयीं फिकिर न ठेवतां, राजाच्या दरबारीं खुशाल राहत असत. मजूरांना आपल्या जमिनींच्या मालकांच्या जमिनींवर व रस्त्यांवर दरसाल पुष्कळ दिवसपर्यंत कांहीं मजूरी न मिळतां खपावें लागे; शेतकऱ्यांचीं झोंपडीं आणि शेतें नासाडी होऊन पडलीं; आणि त्या शेतकऱ्यांच्या दैनेला सतत दुष्काळ पडून भर पडे. शहरांतून मूर्तिमंत क्रूर दारिद्र्याच्या कुशीला कूस लावून, दुर्व्यसन आणि उधळपट्टी हीं धडका नांदत असत, आणि **फ्रान्स** देश दिवसानुदिवस अधिकाधिक कंगाल होत चालला होता.

फ्रान्सांतील कनिष्ठ वर्गांतील लोकांवर जुलूम जबरदस्ती.

शेवटीं **सोळावा लूइ** हा, त्याच्यापूर्वी दोन राजे राज्य करून गेले त्यांच्याहून नेकीचा असल्यामुळें, त्यानें, **फ्रान्स** देशांतील **"स्टेट्स जनरल"** नांवाची **ग्रेट अस्सेंब्ली** (मोठी सभा), तिनें यत्न करून चांगले कायदे करावे ह्या हेतूनें, पाचारून जमविली. परंतु ती सभा भरविण्यानें लोकांमध्यें असलेला असंतोष निकरावर किंवा आणीबाणीवर आला. त्या **स्टेट्स जनरल**मध्यें असलेले **कामन्स** (सामान्य प्रतीचे) किंवा **"तिसऱ्या पायरीचे"** लोक ह्यांनीं, जे वाद झाले त्यांत आपला दशक वर चढवून किंवा शिरजोर होऊन, तें **स्टे-**

स्टेट्स जनरल नांवाची सभा पाचारण करून भरविली, तारीख ५ मे १७८९.

ट्स जनरल मोडून त्याचें रूप पालटून, त्याचीच **"न्याशनल अस्सेंब्ली"** (राष्ट्रीय सभा) बनविली. त्या **अस्सेंब्लीनें** सर्व कायदा, नीति, किंवा धर्मशास्त्र, आणि व्यवस्था, हीं उलथून टाकण्याचा आरंभ केला. नंतर **पारिस** शहरांत १७८९ त जूलईच्या १४ व्या तारिखेस बंड उठलें, त्या बंडांत, **फ्रेंचांचा बास्टील** नांवाचा प्रचंड तुरुंग होता, त्यावर हल्ला केला, आणि राज्यांत सर्वथैव उलथापालथ होईल ज्यानें असा **कॉम्म्यून** म्हणजे साधारण सत्ता किंवा सार्वजनिक प्रभुत्व करणारा एक जनसमाज, त्या शहरांत अमल करण्यासाठीं उभा केला, किंवा स्थापला. पुढें थोड्या महिन्यांनीं त्या बंडाळ मंडळीनें **व्हर्सेल्स** एथून **लूइ** ह्याला आणलें, आणि तो व्यवहारदृष्टया तीन वर्षेपर्यंत **पारिसांत** कैदी बनून राहिला. शेवटीं, १७९२ त, **आस्ट्रियाचा** बादशाह आणि **प्रुशियाचा** राजा, ह्या दोघांनीं त्या **लूईला** पुनः त्याच्या गादीवर बसविण्याच्या उमेदीनें **फ्रान्स** देशावर स्वारी केली. परंतु **फ्रेंचांची** फौज इतकी बलाढ्य होती कीं ती पुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं, आणि **पारिस** एथील खवळलेल्या बंडाळ लोकांनीं, १७९२ त सेप्टेंबरच्या २१ व्या तारिखेस, राजपक्षीय लोकांच्या झुंडींच्या झुंडींची कत्तल केली, आणि आपल्या राजाला १७९३ त जान्युअरीच्या २१ व्या तारिखेस शिरच्छेद करावयाच्या घोड्यावर नेऊन त्याचा शिरच्छेद करून, त्यांनीं त्या कत्तलीचा शेवट केला. ह्याप्रकारें **सोळावा लूइ** हा मरण पावला, आणि **"धि रेन आफ् टेरर"** (महाभयाचें किंवा कालभैरवाचें राज्य) महाभैरवाची कारकीर्द सुरू झाली. तींत एकामागून एका पक्षानें, आ-

सोळाव्या लूईला कैदेंत ठेवून शेवटीं त्याचा शिरच्छेद होऊन त्याला मृत्यु येतो, १७८९–१७९३.

पल्याशीं मतविरोध ज्यांचा असेल, त्यांना ठार मारलें, आणि इतरां बरोबर, गरीब **मारी आन्टॉयनेट्ट** राणी हिचाही प्राण घेतला.

ह्या सर्व वेळभर **इंग्लंड** जें जें होत होतें तें तें निवांतपणें पाहत होतें. **फ्रेंच** लोकांनीं आपल्यांतील स्वार्थी बडे लोकांविरुद्ध बंड केलें म्हणून पहिल्यानें पुष्कळ **इंग्लिश** लोकांना आनंद झाला. **फॉक्स** हा तर त्या राज्यक्रांतीच्या संबंधानें शेखी मिरवूं लागला, आणि **पिट्ट** ह्याला देखील आरंभीं तो वळवाचा पाऊस लवकरच उमेल असें वाटलें, म्हणून तो त्या प्रकरणांत हात घालावयास लागूं नये अशी फार इच्छा करीत होता. परंतु सरकारचा म्हणून सर्व अधिकार नष्ट झाल्यानें किती लांबच्या थाऱ्याला तें प्रकरण जाईल, हें **बर्क** ह्याच्या तत्काल लक्ष्यांत आलें, आणि बहुत वांस्यांनीं त्या **बर्क**च्याच भाषणांनीं आणि लेखांनीं, शेवटीं **इंग्लंड** जागें होऊन त्या बंडाईपासून काय अरिष्ट उत्पन्न होणार होतें हें त्याच्या नजरेस आलें. ते बंडवाले अधिकाधिक धीट झाले. त्यांनीं **नेदर्लंड्स** देशांत **आस्ट्रियन्स** ह्यांचा पराभव केला. **साव्हॉय** आणि **नीझ** हे प्रांत त्यांनीं घेतले, आणि **इंग्लंडा**शीं तह होऊन **हालंड**चें रक्षण होत होतें असें असतांही त्या **हालंडावर** स्वारी करण्याची त्यांनीं दहशत घातली. तेव्हां **पिट्ट** ह्याला त्या प्रकरणाच्या संबंधानें त्या बंडवाल्या लोकांची कानझाडणी करणें भाग पडलें; आणि १७९३ त **फेब्रुअरी**च्या १ ल्या तारिखेस, म्हणजे सोळाव्या **लूई**च्या मरणानंतर एका महिन्याच्या आंत, **फ्रान्सानें** **इंग्लंड, हालंड,** आणि **स्पेन,** ह्या तिन्हीं राज्यांशीं आपलें युद्ध जुंपलें म्हणून जाहीर केलें.

इंग्लंडावर त्या उलथापालथीचा परिणाम.

पुढील नऊ वर्षे, **फ्रान्सांत** नवीन स्थापित झालेल्या लो-

कसत्ताक राज्याशीं इंग्लंडचें युद्ध सतत चालू होतें. इतर राष्ट्रें पहिल्यानें एका तरफेला, आणि नंतर दुसऱ्या तरफेला, सारा घप्पाघोळ होई अशा प्रकारानें मिळत. पहिल्यानें **इंग्लंड, स्पेन, हालंड, आस्ट्रिया,** आणि **प्रुशिया,** हीं राज्यें एकत्र मिळून त्यांनीं एक कट केला; त्या कटाला खर्चावयास लागणाऱ्या द्रव्याचा मोठा वांटा **इंग्लंडाला** पुरवावा लागला. ह्या दोस्तराज्यांना बिलकूल जय मिळाला नाहीं. जरी **लार्ड हाउ** ह्यानें १७९४ त जूनच्या १ ल्या तारिखेस **ब्रेस्ट** नांवाच्या बंदराबाहेर **फ्रेंचांच्या** अरमारावर मोठा जय मिळविला, तरी जमिनीवर जिकडे तिकडे **फ्रेंच** विजयी होत होते. १७९५ त, त्यांनीं **आम्स्टर्डेम** जिंकून घेतलें, आणि **डच** लोकांचें अरमार तसेंच जिंकून हस्तगत केलें. तेव्हां **हालंडचा स्टाट्होल्डर** (गव्हर्नर, राज्याधिकारी,) हा पळून गेला, आणि **डच** लोकांपैकीं लोकसत्ताकराज्येच्छु होते ते **फ्रेंचांस** मिळाले, आणि त्यांनीं लोकसत्ताक राज्य झालें असा डांगोरा पिटला. **प्रुशियाच्या** राजानें आपल्या वांट्याचें युद्ध **इंग्लंडाहून** पुष्कळ द्रव्याची कुमक होत होती तिजवर चालविलें होतें, तोही त्या कलहापासून मागें सरला, आणि **स्पेनाला इंग्लिश** अरमाराविषयीं मत्सर वाटतच होता, म्हणून तोही **फ्रान्सला** मिळाला. **केप आफ् गुड होप** एथील **डच** लोकांनीं वसविलेला मुलूख, आणि **सिलोन** (सिंहलद्वीप) बेट, आणि **मलाका** हा प्रांत, हीं **इंग्लिशांनीं** ह्याच समयीं हस्तगत केलीं. त्या देशांत

लार्ड हाउ हा फ्रेंचांच्या अरमाराचा पराभव करतो, तारीख १ जून १७९४.

फ्रेंच, आम्स्टर्डेम आणि डच्चांचें अरमार जिंकून घेतात, १७९५.

इंग्लंड, केप आफ् गुड होप, सिलोन, आणि मलाका, हीं हस्तगत करतें, १७९५.

वसाहत करून राहिलेले डच लोक फ्रान्साच्या हातीं पडण्यापासून ह्या प्रकारानें आपला बचाव झाला म्हणून आनंद पावले.

आतां इंग्लंडची दोस्त अशी एकटी आस्ट्रियाच काय ती उरली, आणि ती खर्चाकरितां पंचेचाळीस लक्ष पौंड मागूं लागली. पिट्ट ह्यानें ह्या प्रसंगीं आपल्याच्यानें करवता तर खुशीनें तह केला असता, कारण त्या युद्धाचा खर्च आणि त्यांत झालेलीं नुकसानें ह्यांनीं इंग्लंडावर मोठी आपत्ति गुदरूं लागली होती. तीन वर्षांहूनही कमी काळांत, देशाला लागलेल्या मोठ्या सांडीनें किंवा निचऱ्यानें सर्व आबादानी खुंटली होती; आणि ब्यांक आफ् इंग्लंड नांवाच्या पेढीला, वीस शिलिंगांवरील कोणतीही रकम देणें झाल्यास रोकड सोन्याचें आणि रुप्याचें नाणें ह्यांनीं ती न देतां ब्यांकनोटींनीं देत जावी असा अधिकार देण्यासाठीं पिट्ट ह्यानें १७९७ त एक बिल्ल, म्हणजे कायद्याचा मसुदा, पसार केला नसता तर, गांवगन्नाच्या पेढ्यांतून पुष्कळ पेढ्यांनीं कारवा वर केल्या असत्या. हा पिट्ट ह्यानें पसार करविलेला कायदा बेवीस वर्षे टिकला. असो, त्या तीन वर्षांत कर फार जरब बसले होते, व्यापार अगदीं थकला किंवा खुंटला होता, आणि लागोपाठ दोन सुग्या खडतर झाल्यामुळें भयंकर दुष्काळ पडला. लंडन शहरांतील बंडाळ लोक "भाकर भाकर" म्हणून मोठमोठ्यानें ओरडत राजाच्या रथामागें धांवत; आणि दंगे, संतापलेल्या लोकांच्या सभा, आणि बंडावा किंवा फंदफितूर करण्यास चिथविणारे लेख दररोज वाढूं लागले. बर्मिंग्हम शहरांत, डॉक्टर प्रीस्ट्ली ह्याचा फ्रेंचांविषयीं कन्हवाळा होता म्हणून, त्याचें घर बंडाळ लोकांनीं १७९१ त जाळून जमीनदोस्त केलें.

त्या युद्धाचे इंग्लंडावर झालेले परिणाम.

दुसऱ्या पक्षीं, कारिगरांच्या मंडळ्या आणि अखाडे ह्यांतून कांहीं मंडळ्या आणि अखाडे, **फ्रान्सां**तील उलथापालथ करणाऱ्या बंडवाल्या लोकांविषयीं कऱ्हवाळा प्रदर्शित करूं लागले त्या योगें **पिट्ट** ह्याला धाक पडून, तो कडक अमल करूं लागला. **हेबियस कॉर्पस आक्ट** (शरीर हाजीर कर) ह्या नांवाच्या कायद्याचा अमल तकूब केला, तेणेंकरून चौकशी न करतां माणसांना कैदेंत ठेवतां येऊं लागलें. **टॉम पेन** नांवाच्या ग्रंथकाराचा राजत्व, म्हणजे राजाचा अधिकार, ह्यावर हल्ला करणारा किंवा कडक टीका किंवा निंदा करणारा असा **राइट्स आफ् मान,** म्हणजे मनुष्यमात्राचे हक्क, ह्या नांवाचा ग्रंथ होता तो कोणीं एका पुस्तकें विकणाऱ्यानें छापून प्रसिद्ध केला म्हणून त्याला सजा केली; दुसऱ्या एका पुस्तकें विकणाराला सुधारणेविषयीं एक लहानसा निबंध छापून प्रसिद्ध केल्यामुळें, कैदेंत टाकलें, आणि **हॉर्न, टूक, हार्डी, थेल्वाल,** हे चौघे मुखरीण पुरुष आणि इतर लोक ह्यांवर **पार्लमेंटा**विरुद्ध लोकांना चिथवितात असा आरोप ठेवला, आणि घोर राजद्रोहाचा गुन्हा केला अशा सबबेनें त्यांची चौकशी केली परंतु ते निरपराध ठरले.

पिट्ट हा जुलुमी होतो.

एवढ्यानेंच सर्व संपलें नाहीं, कारण **आयर्लंडा**वर **फ्रेंचां**कडून पुनः स्वारी करण्याचा प्रयत्न झाला. पूर्वी पाहण्यांत आलेंच आहे कीं (६१९ वें पृष्ठ पहा), ज्या कायद्यांनीं **आयरिश पार्लमेंटा**वर **इंग्लिश पार्लमेंटा**ला हुकमत मिळालेली होती, ते कायदे १७८२ त **ग्राट्टन** ह्यानें **लार्ड नार्थ** ह्याकडून जुलमानें रद्द करविण्याविषयीं केलेल्या प्रयत्नांत त्या **ग्राट्टन**ला यश मिळालें होतें, त्यामुळें, **आयरिशां**ना "होम रूल", म्हणजे स्वराज्यव्यवस्था,

मिळालेली होती, आणि त्या योगें त्यांना आवडतील ते कायदे पसार करतां येऊं लागले होते. आतां, त्या **आयरिश पार्लमेंटांत** बसण्याला **क्याथलिक्सांना** सभासद निवडून नेमतां येत नव्हतें

आयर्लंडांत बखेडे उत्पन्न होतात.

त्यामुळें त्या **पार्लमेंटां**तील सभासद बहुतकरून सर्व **प्राटेस्टंट** बडे लोकांपैकीं होते. त्यांमध्यें **क्याथलिक्स** लोक किंवा **आयरिश** शतकरी लोक ह्यांच्याशीं न्यायानें किंवा प्रामाणिकपणानें वर्तन करणारे **ग्राट्टना**सारखे स्वदेशभक्त फारच थोडे होते. ह्याचा परिणाम असा झाला कीं, **क्याथलिक** गृहस्थलोक आणि **आयरिश** धारेकरी हे देशांतरीं असलेल्या जमीनदारांच्या जमिनी धाऱ्यानें करीत असत, त्या लोकांना त्या जमीनदारांचे **आयर्लंडांत** असलेले दिवाण घाण्यांत किंवा चरकांत घातल्याप्रमाणें जुलुमाखालीं चिरडीत, म्हणून त्या लोकांनी धुंदाई किंवा दंगे आणि भालेराई मांडली, आणि स्वराजनिष्ठ **प्राटेस्टंट्स** किंवा **"आरेन्जमेन"** (ह्यांनीं १७९० त आयर्लंडच्या उत्तरेकडील भागांत लाज्जिझ म्हणजे ठाणीं घातलीं), आणि **"युनायटेड आयरिशमेन"** (एकदिल झालेले आयरिश लोक म्हणजे क्याथलिक्स आणि लोकसत्ताकराज्येच्छु प्राटेस्टंट्स) ह्यांच्या दरम्यान एक प्रकारची यादवी किंवा आपआपसांतील युद्ध उत्पन्न झालें. ते **क्याथलिक्स** आणि लोकसत्ताकराज्येच्छु **प्राटेस्टंट्स** लोक १७९१ त **इंग्लंडची आयर्लंडवरील** अवघी सत्ता झुगारून देण्याकरितां एकत्र झालेले होते. त्या **युनायटेड आयरिशमनांचे**, म्हणजे एकवटलेल्या **आयरिशांचे**, मुख्य पुढाईत **हामिल्टन राउवन, वूल्फ टोन,** आणि **लार्ड एड्वर्ड फिट्झ्**

आरेन्ज लाज्जिझ, १७९०.

जेरल्ड, हे होते, त्यांनीं **फ्रेंचांकडे** आम्हांला कुमक करा असा अर्ज केला. तेव्हां असें ठरलें कीं, **जनरल होश** ह्याच्या हुकमतीखालीं एका **फ्रेंच** फौजेनें **आयर्लंडवर** स्वारी करावी. त्या ठरावाप्रमाणें १७९६ त डिसेंबरच्या १६ व्या तारिखेस रात्रीं, १५००० फौज वर चढवून घेऊन अडतीस जहाजें **आयर्लंडांतील शानन** नदीच्या मुखांत आणि **इंग्लंडांतील ब्रिस्टल** बंदरांत शिरण्याचा बेत करून **ब्रेस्ट** नांवाच्या बंदरांतून हकारून निघालीं. जर तीं जहाजें बेताप्रमाणें नेमलेल्या ठिकाणीं येऊन पोहोंचतीं तर तें सारें प्रकरण फारच भयावह झालें असतें; परंतु रात्रीच्या काळोखांत, त्यांतून एक मोठें जहाज समुद्रांत बुडून तळीं गेलें, बाकी राहिलेल्या त्या अरमाराचा कांहीं वांटा वादळानें **बान्ट्री बे** नांवाच्या अखातांत हाकवून लावला, तेथें चार दिवसपर्यंत गडद धुकें पडून तीं जहाजें कोंडलेलीं राहिलीं, आणि तीं सारीं जहाजें **जनरल होशची** व्यर्थ वाट पाहत राहिलीं. तो कधींही येऊन पोंहोंचलाच नाहीं. वादळानें त्याला **ला रोशेल** नांवाच्या बंदरांत माघारें हाकवून नेलें, आणि तें अरमार शेवटीं **आयर्लंडवर** स्वारी न करतां माघारें गेलें.

युनायटेड आयरिशमेन, १७९१

आयर्लंडावर फ्रेंचांची स्वारी, १७९६.

ह्या सर्व संकटांमुळें **पिट्ट** हा तह करण्यास फार उत्सुक झाला, आणि आतां **फ्रान्सांतील सरकाराला "डिरेक्टरी"** असें म्हणत त्या **सरकाराशीं**, जम जमवावा म्हणून त्यानें प्रयत्न केला. परंतु **पारिसांत** नवीन उलथापालथी होत होत्या, आणि **फ्रेंच** लोक परदेशीं त्यांना मिळालेल्या जयांमुळें हर्षानें चढलेले होते, त्यामुळें **बेल्ज्यम, हालंड,** किंवा **आस्ट्रियन्सांपासून इटलीचे** जे भाग

त्यांच्या **कॉर्सिका** बेटांत जन्म पावलेल्या **नपोलियन बोनापार्ट** नांवाच्या तरुण सेनापतीनें जिंकून घेतलेले होते ते भाग, सोडून माघारे देण्याचें ते कबूल करीनात. शिवाय, **डच, स्पानिश,** आणि **फ्रेंच,** ह्यांचीं अरमारें एकत्र करून एका

पिट्ट हा तह करण्याचा व्यर्थ प्रयत्न करतो, १७९६.

जूटानें **इंग्लिश चानल**मधील **इंग्लिशांच्या** जहाजांवर एकदम हल्ला करून त्यांना त्या **चानल**मधून झाडून नाहींशी करून **इंग्लंडाला** संरक्षणाचें साधन राहूं नये असें करण्याचा घाट ते **फ्रेंच** घालीत होते. तेव्हां **इंग्लंडाला** युद्ध चालू ठेवणें, किंवा आपला व्यापार आणि ऐश्वर्य गमावणें, ह्या दोहोंतून कोणती तरी एक गोष्ट करणें भाग होतें. त्यावांचून गत्यंतर उरलें नव्हतें. त्या प्रसंगीं **पिट्ट** ह्यानें **फ्रेंचांचा** पराभव करण्यासाठीं श्रीमान लोक आणि व्यापारी ह्यांकडे द्रव्याचें आर्जवानें मागणें केलें तें त्यांनीं तत्काल मान्य केलें.

आणि आतां असा विचित्र काळ आला कीं, **इंग्लंडचें** जें अरमार **एलिझाबेथ** राणीच्या कारकीर्दीपासून दिग्विजयी झालेलें होतें, त्या अरमारानें त्याला संकटापासून वांचविलें; आणि त्याच्या दर्यावरदी लोकांनीं, **आंग्लियन** नांवाचे समुद्रांतून भटकणारे लोक, धट्टेकट्टे **नार्समेन,** आणि **डेनिश व्हाइकिंग्झ,** हे जे आपले पूर्वज त्यांचें तें प्राचीन शौर्य आम्हीं गमावलें नाहीं, असें प्रत्ययास आणून दिलें. **डचांचें** अरमार तयार होऊन समुद्रांत हकारून निघण्याच्या पूर्वीच **आड्मिरल** (अरमाराचा अध्यक्ष) **सरजान जर्व्हिस,** ह्यानें **नेल्सन** ह्याला आपला **कॉम्मोडोर** (अरमाराच्या तुकडीचा अधिकारी) म्हणून बरोबर घेऊन, **स्पानिश** अरमाराला **केप सेंटव्हिन्सेंट** नांवाच्या भूशलाकेच्या बाहेर गांठून त्या अ-

रमाराचा पराभव करून त्याला केडिझ बंदरांत माघारें हाकवून लावलें. तथापि अझून फ्रेंच आणि डच ह्यांचीं अरमारें न जिंकलीं जातां तशींच राहिलीं होतीं; आणि वारा प्रतिकूळ असल्यामुळें डच्चांचें अरमार फ्रेंचांच्या अरमाराला जाऊन मिळणार होतें तें घडून आलें नाहीं ही चांगली गोष्ट झाली, कारण, त्याच वेळीं स्पिट्हेड आणि नोर एथें इंग्लिश दर्यावरदी लोकांनीं दंगा केला. त्यांना खाणेंपिणें पोटभर मिळत नसे, पगार फार कमी मिळे, आणि फार कडकपणानें वागवीत, त्यामुळें त्यांना खराच जाच होता. अरमाराच्या खात्यानें तें बंड तर निष्ठुरपणानें मोडलें, परंतु त्या दर्यावरदींच्या दुःखांचा शाहणपणानें परिहार केला. त्या बंडाच्या फार बदमाष प्रवर्तक पुढाइतांपैकीं थोड्यांना शिक्षा केल्यावर बाकीचे लोक आपआपल्या कामांवर माघारे गेले, आणि पुढें थोड्या महिन्यांनीं आड्मिरल डन्कन ह्याच्या हुकमतीखालीं तेच लोक हालंडांत काम्पर्डाउन नांवाच्या बंदराबाहेर एका निकराच्या लढाईत शौर्यानें लढले, आणि त्यांनीं डच्चांच्या अरमाराचा पूर्ण पराभव केला.

केप सेन्टव्हिन्सेन्ट एथील लढाई, तारीख १४ फेब्रुअरी, १७९७.

नोर एथील दर्यावरदी लोकांचा दंगा, माहे मे, १७९७.

काम्पर्डाउन एथील लढाई, तारीख ११ आक्टोबर, १७९७.

ह्या अरमाराच्या जयांनीं इंग्लिशांच्या अरमाराचा समूळ नाश करण्याविषयीं केलेल्या प्रयत्नाची अखेरी झाली. परंतु, फ्रेंच लोकांनीं नुकताच काम्पो फॉर्मिओ एथें आस्ट्रियाशीं तह केलेला होता, म्हणून त्यांना एकच बलाढ्य प्रतिस्पर्धी राहिलेला जो इंग्लंड देश त्याचा चुराडा करण्याविषयीं त्यांना अझून फार हुटहूट होती.

नपोलियन बोनापार्ट हा आतां **फ्रेंचांच्या** बहुतेक फौजेचा मुख्य सेनाधिपति झालेला होता, आणि एकीकडे **इंग्लंडच्या** किनाऱ्यांवर हल्ला करण्याची मी तयारी करीत आहें अशी हूल दाखवून दुसरीकडे आपल्याला आपल्या हाताखालची फौज **ईजिप्ट** देशांत घेऊन जाण्याला, आणि **हिंदुस्तानांत इंग्लिशांना** उपद्रव देऊन बेजार करण्यासाठीं तेथून तसेंच पुढें रगडीत जाण्याला, परवानगी देण्यासाठीं **फ्रान्सांत डिरेक्टरी** नांवाच्या नव्या झालेल्या **सरकाराचें** समजूत करून खरोखर तो मन वळवीत होता. वस्तुतः **फ्रान्सचा** सत्ताधीश आपण व्हावें असा त्यानें निश्चय केलेला होता, आणि अझून आपल्याला स्वदेशीं राज्याधिकार बळकावतां येणार नाहीं असें पाहून, परदेशीं मोठमोठे जय मिळवून विजयी पुरुषासारखें आपण परत यावें अशी त्याची इच्छा होती.

ज्या पुरुषानें ह्या त्याच्या बड्या मोहिमेचा सारा घांट बिघडविला, तो **होरेशिओ नेल्सन** नांवाचा **इंग्लंडांतील** अत्यंत प्रतापी **आड्मिरल** (अरमाराचा अधिपति) होता. **नेल्सन** जेव्हां तेरा वर्षांच्या वयांतच **नार्फकशायरांतील** आपल्या बापाची **रेक्टरी** (रेक्टर नांवाचा धर्माधिकारी ह्याचें राहावयाचें गृह) सोडून अरमारखात्यांत शिरण्याकरितां निघाला, तेव्हांपासूनच आपल्या नाविकाच्या धंद्यांत त्यानें आपलें सारें अंतःकरण गढविलेलें होतें. जो पुरुष ह्यापूर्वींच **इंग्लंडचा** अतिभयंकर शत्रु बनून राहिलेला होता, त्याच्या पाठीस लागून त्याचा पराभव करण्यासाठीं, चाळीस वर्षांच्या उमरींत, आतां फार दिवस अनुभव घेऊन हुशार झाल्यावर, त्या **नेल्सनाची** योजना करून त्याला पाठविलें. तेव्हां दोन महिन्यांहूनही कांहीं ज्यास्त वेळ त्या **ने**-

ल्सनानें, ज्या अरमारावरून **नपोलियनाची** फौज हकारून निघालेली होती, तें अरमार धुंडून काढण्याचा निष्फल प्रयत्न केला; परंतु शेवटीं, १७९८ त आगस्टच्या १ ल्या तारिखेस **नाइल** नदीच्या मुखांच्या चिमट्यांतल्या प्रदेशांत **आबूकीर बे** (आबूकीर नांवाचें अखात) ह्यांत तें अरमार नांगरलेलें त्याला सांपडलें. **फ्रेंचांना** त्या समयीं आपलें ठिकाण निर्भय आहे असें वाटलें होतें. परंतु **नेल्सनानें** आपल्या जहाजांपैकीं कांहीं जहाजें थेट किनारा आणि तें **फ्रेंच** अरमार ह्यांच्या दरम्यान पाठवून, त्यानें **फ्रेंचांना** दोहोंदिशांनीं तोफांच्या भडिमारांच्या दरम्यान राखून ती विख्यात "**नाइल नदीवरील लढाई**" जितली. **फ्रेंचांच्या** जहाजांचा फन्ना उडून, त्यांची फौज **इजिप्ट** देशांत समुद्रकांठावर उतरून पडून राहिली. तेव्हां **नपोलियनानें सिरिया** देश जिंकण्याचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला. त्यानें मधलें रेतीचें मैदान ओलांडून जाऊन **जाफ्फा** नांवाचें शहर हल्ला करून घेतलें, आणि तेथून पुढें कूच करून जाऊन त्यानें **एकर** शहराला वेढा घातला, परंतु एथें **सर सिड्नी स्मिथ** ह्याच्या कुमकेनें **तुर्क** लोकांनीं त्याला शौर्यानें मागें हटविलें. नंतर **ईजिप्टांत** माघारा येऊन त्यानें **अलेक्झांड्रिया** शहरानजीक **आबूकीर** एथें **तुर्कांचा** पराभव केला, आणि तदनंतर, **फ्रेंचांचा यूरोपांत** पराभव होतो आहे असें ऐकून, **ईजिप्टांतील** फौजेचें आधिपत्य आपल्या हाताखालच्या सरदारांस देऊन तो **फ्रान्स** देशीं परत गेला. तेथें त्याला १७९९ त नोव्हेंबरच्या ११ व्या तारिखेस **फर्स्ट कॉन्सल** (पाहिली

नाइल नदीवरील लढाई, तारीख १ आगस्ट १७९८.

नपोलियन ह्याला फर्स्ट कॉन्सल केलें, १७९९.

दंडनायक, माजिस्ट्रेट नांवाचा अधिकारी केलें. थोड्या महिन्यांनंतर तो, **इटली** देशांत पुनः **आस्ट्रियन्स** लोकांशीं लढण्यासाठीं गेला, आणि १८०० च्या जून महिन्यांत **मारेंगो** एथें त्यांचा पराभव करून त्यानें त्यांना **लूनव्हिल्ल** एथें १८०१ त फेब्रुअरीच्या १ ल्या तारिखेस तह करण्यास भाग पाडलें.

आतां **इंग्लंड** पुनः एकवेळ एकही दोस्त राहिला नाहीं असें होऊन एकटें राहिलें, कारण **रशिया** जरी थोडावेळ त्याला मिळालेली होती तरी, जहाजांचा झाडा घेण्याच्या हक्काच्या संबंधानें तिच्याशीं तंटा झाला, आणि **बाल्टिक** समुद्रांत युद्ध सुरू झालें. तशांत, **पिट्ट** हा मुख्य प्रधान राहिला नाहीं, त्यानें तें काम सोडलें, त्याचें कारण आम्हांला आतां सांगितलें पाहिजे.

आयरिश लोकांचें १७९८ तलें बंड.

१७९६ त **फ्रेंचांनीं आयर्लंडवर** केलेली स्वारी निष्फल झाल्यादिवसापासून, तो **आयर्लंड** देश फारच अस्वस्थ झालेला होता. एथपर्यंत कीं शेवटीं, १७९८ त एक सुव्यवस्थित बंड उत्पन्न झालें. त्या बंडवाल्यांची १७९८ त जूनच्या २१ व्या तारिखेस **वेक्सफर्ड** परगण्यांत **व्हिनिगर** नावांच्या टेंकडीवर दाणादाण होऊन त्यांची छावणी सर केली. इतकें झालें असून देखील, नंतर **फ्रेंचांच्या** आरमाराच्या एका तुकडीनें **मेयो** परगण्यांत कांहीं **फ्रेंच** फौज आणून उतरली, त्या फौजेचा **आयर्लंडचा लार्ड लेफटेनेंट, लार्ड कॉर्नवालिस,** ह्यानें पराभव केला. **फिट्झ्जेरल्ड** हा ठार मारला गेला. **वूल्फ टोन** ह्याला फांशीं दिलें. परंतु **आयर्लंडांतील** पृथक् **पार्लमेंटाच्या** अमलाखालीं त्या देशांत कधींही स्वस्थता राहणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट झाली. म्हणून **आयरिश पार्लमेंट** अगदीं मोडून टाकून, **आन-**

राणीच्या कारकीर्दीत जसे **स्काट्लंडां**तील प्रतिनिधि **इंग्लिश पार्लमेंटां**त बसण्याकरितां आणले (५३६ वें पृष्ठ पहा), तसे **आक्ट आफ् यूनियन,** म्हणजे **इंग्लंड** व **आयर्लंड** ह्या दोन्हींचा संयोग करण्याविषयीं कायदा, करून, **आयरिश** प्रतिनिधि **इंग्लिश पार्लमेंटां**त बसण्याला आणण्याचा **पिट्ट** ह्यानें निश्चय केला. नंतर धडका लांच देऊन, आणि मुबलग पदव्या आणि किताब वांटून त्यानें तो **आक्ट आफ् यूनियन,** म्हणजे संयोग करण्याविषयीं कायदा, **आयरिश पार्लमेंटां**त पसार करविला.

आयर्लंडाचा इंग्लंडाशीं संयोग होतो, १८००

आणि **प्राटेस्टंट्सां**बरोबरीचे हक्क देण्याचें वचन देऊन, **रोमन क्याथलिक्सां**नाही त्यानें वश करून घेतलें. १८०० त आगस्टच्या २ ऱ्या तारिखेस, त्या "**आक्ट आफ् यूनियन**" नांवाच्या कायद्याला राजाचें अनुमोदन मिळालें, आणि त्या अठराव्या शतकाच्या अखेरीच्या दिवशीं, म्हणजे १८०० त डिसेंबरच्या ३१ ऱ्या तारिखेस, राजानें **ब्रिटिश पार्लमेंट** बंद करून, तेंच **पार्लमेंट** १८०१ च्या जान्युअरींत "**धि इम्पीरियल पार्लमेंट**" म्हणजे साम्राजिक पार्लमेंट, ह्या नांवानें पुनः भरावें असा हुकूम केला. त्या **पार्लमेंटां**तील **कामन्सां**च्या सभेंत शंभर **आयर्लंडां**तील प्रतिनिधि सभासद म्हणून स्थानापन्न झाले, आणि चार **आयरिश बिशप्स,** आणि चोवीस **आयरिश लार्ड्स,** हे **लार्ड्सां**च्या सभेंत स्थानापन्न झाले.

धि यूनिअन जाक (संयुक्त निशाण).

यूनियन जाक नांवाचें **ग्रेट-ब्रिटन**चें संयुक्त निशाण होतें त्यावर **आयर्लंडां**तील साधु **सेन्ट पाट्रिक** ह्याचा **क्रूस,** पूर्वीच्या **सेन्ट जार्जा**च्या आणि **सेन्ट आन्ड्रूच्या क्रूसां**ना मिळविला; आणि त्या काळापासून आतांपर्यंत, **इंग्लंड, स्काट्लंड,**